सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. ३१ मे २०२५ | वर्ष - तिसरे | अंक ५९ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सापाला बिळातून बाहेर काढून चिरडू, मोदींचा दहशतवाद्यांवर जोरदार हल्लाबोल!

रोहतास, बिहार : जर पुन्हा डोके वर काढले, तर सापासारखं बिळातून बाहेर काढून चिरडून टाकू, असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दहशतवाद्यांना उद्देशून इशारा दिला आहे. रोहतास येथील सभेत बोलताना त्यांनी ऑपरेशन सिंदूरचा उल्लेख करत पाकिस्तानलाही स्पष्ट शब्दांत इशारा दिला.

मोदी म्हणाले, पहलगाममध्ये आमच्या बहिणींच्या कपाळावरील सिंदूर पुसणाऱ्यांना आम्ही गप्प बसू देणार नाही. मी जे वचन दिलं होतं, ते आमच्या संरक्षण दलांनी पूर्ण केलं आहे. दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त करण्यात आलेत. भारताची दहशतवादाविरोधातली लढाई थांबणार नाही.

त्यांच्या या भाषणात पाकिस्तानवरही जोरदार प्रहार केला. पाकिस्तानचा इतिहास



म्हणजे दहशतवाद आणि नरसंहार. तीन वेळा आम्ही घरात घुसून उत्तर दिलंय. ऑपरेशन सिंदूर संपलेलं नाही, ही १४० कोटी भारतीयांची गर्जना आहे, असे ते म्हणाले.

पंतप्रधानांनी यावेळी विरोधकांनाही लक्ष केलं. जे लोक जंगलराज आणतात, गरीबांना सोडून देतात, ते आज सामाजिक न्यायाच्या नावाने गळा काढत आहेत. बिहारच्या जनतेने त्यांच्या खोट्या वचनांपासून सावध राहावं, असं आवाहनही त्यांनी केलं.

दरम्यान, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनीही पाकिस्तानला इशारा देत सांगितलं, यावेळी जर पाकिस्ताननं नापाक हरकत केली, तर कदाचित भारतीय नौदलही 'ओपनिंग' करेल.

भारत पुन्हा कोणतीही कारवाई सहन करणार नाही. दहशतवाद्यांचा खात्मा हा केवळ सुरक्षा नव्हे, तर राष्ट्रगौरवाचाही प्रश्न आहे, हेच मोदी आणि त्यांच्या सरकारचं धोरण असल्याचं या भाषणातून ठळकपणे दिसून आलं.

## फेसबुक, इन्स्टाग्राम, गुगल पासवर्ड झाले ऑनलाईन लीक! तुमचा देखील...

मुंबई: तुम्ही जर फेसबुक , इन्स्टाग्राम , गुगलचे युजर्स असाल तर ही बातमी तुम्हाला मोठा धक्का देऊ शकते. कारण, यात तब्बल १८.४ कोटीहून अधिक पासवर्ड ऑनलाइन लीक झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. तर या प्रकारात तुमच्या अकाऊंटचादेखील समावेश असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे तुमच्या अकाऊंटची प्रायव्हसी सुरक्षित आहे की नाही, याविषयी पुढे विस्ताराने जाणून घ्या. नुकत्याच एका रिसर्चरद्वारे मोठी माहिती समोर आली आहे, ती म्हणजे एक ऑनलाइन प्लॅटफॉर्मवरून मोठ्या प्रमाणात पासवर्ड आणि संवेदनशील डेटा लीक झाल्याचं समोर आलं आहे.

## कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभाग सज्ज
### ५ हजार नागरिकांची तपासणी; ५० खाटा राखीव

विरार : कोरोना व्हायरस भारतात पुन्हा परतला आहे. देशामध्ये कोरोना रुग्णांची संख्या १ हजार २०० पर्यंत पोहोचली असून काही राज्यात मृत्यूचे प्रमाणसुद्धा वाढत आहे. तसेच राज्यात मुंबई, ठाणे व इतर काही परिसरात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव झालेल्या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर वसई-विरार शहर पालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत शहरात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढू नये व कोरोनाची लागण झालेल्या लोकांना इतरांपासून दूर ठेवता यावे यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पालिकेची रुग्णालये, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, आपला दवाखाना, आयुष्यमान आरोग्य केंद्र, सार्वजनिक गर्दीची ठिकाणे व वस्त्या इत्यादी ठिकाणी नागरिकांची वैद्यकीय तपासणी मोहीम सुरु करण्यात आली आहे. आतापर्यंत ५५११ नागरिकांची तपासणी करण्यात आली असून ९६ जणांची रॅपीड टेस्ट करण्यात आली आहे. या तपासणीत एक कोरोना बाधित रुग्ण आढळला असून त्याला उपचारानंतर घरी पाठविण्यात आले आहे. कोरोना विषाणूचा फैलाव होऊ नये या दृष्टीने शासकीय तसेच खासगी रुग्णालयांत दाखल होणाऱ्या रुग्णांची माहिती, कोरोनाची लक्षणे असलेले रुग्ण माहिती महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत घेण्यात येत आहे.

महानगरपालिकेमार्फत कोरोनाबाधित रुग्णांसाठी स्वतंत्र खाटांची व विलगीकरणाची व्यवस्था करण्यात आली आहे. जीवदानी रुग्णालय चंदनसार येथे २५ व फादरवाडी रुग्णालय, वसई पूर्व येथे २५ स्वतंत्र खाटांची व्यवस्था करण्यात आली आहे. रुग्णांना ऑक्सिजनचा पुरवठा पुरेशा प्रमाणात व्हावा यासाठी उपाययोजना करण्यात आली आहे. आपत्कालीन वेळेला पालिकेने उभारलेल्या ५ ऑक्सिजन प्रकल्पांमधूनही ऑक्सिजनची तातडीने व्यवस्था करण्यात येणार आहे.

# महिला आयोग अध्यक्षपद राजीनाम्याच्या प्रश्नावर चाकणकरांचं थेट उत्तर, राजीनामा मागणं ही विरोधकांची भूमिकाच

पुणे: वैष्णवी हगवणे प्रकरणानंतर महाराष्ट्र महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांच्यावर राजीनाम्याची मागणी होत असताना त्यांनी अखेर यावर आपली स्पष्ट भूमिका मांडली आहे.

त्या म्हणाल्या, राजीनामा मागणं ही विरोधकांची भूमिकाच असते. पंतप्रधान मोदींपासून गृहमंत्र्यांचा देखील राजीनामा मागितला जातो. त्या नाशिकमध्ये 'महिला आयोग आपल्या दारी' या उपक्रमाअंतर्गत जनसुनावणीसाठी उपस्थित होत्या. त्या दरम्यान त्यांनी पत्रकारांनी विचारलेल्या अनेक प्रश्नांची उत्तरं दिली.

कुटुंब एकत्र ठेवणं हेच आमचं प्रमुख उद्दिष्ट आहे

रुपाली चाकणकर म्हणाल्या, कोणत्याही कुटुंबातून आलेल्या तक्रारीकडे आम्ही सामोपचाराने पाहतो. कुटुंब एकत्र ठेवणं हेच आमचं प्रमुख उद्दिष्ट आहे. गैरसमज दूर करून संवाद साधणं आणि कायद्यानुसार तीन वेळा काउन्सिलिंग



करणं गरजेचं असतं. त्या पुढे म्हणाल्या की, कुटुंबव्यवस्था टिकवणं हेच आमचं काम आहे; तोडणं नव्हे, जोडणं गरजेचं आहे.

परिणय फुके प्रकरणावर स्पष्टीकरण

परिणय फुके प्रकरणासंदर्भात चाकणकर म्हणाल्या की, या प्रकरणात महिला आयोगाकडे कोणतीही तक्रार प्राप्त झाली नव्हती. मात्र मीडियातून मिळालेल्या व्हिडिओंच्या आधारे नागपूर पोलीस आयुक्तांना पत्र पाठवून आम्ही चौकशीची मागणी केली आहे. पीडित महिलेशी चार ते पाच वेळा संपर्क केला गेला आहे. जेव्हा तक्रार येते, तेव्हा आयोगाकडून कारवाई केली जाते.

त्यांनी पुढे स्पष्ट केलं की, स्थानिक पोलीस स्टेशन, बरोसा सेल आणि कौटुंबिक न्यायालयात तक्रार दिल्यानंतर जर न्याय मिळत नसेल, तर महिला आयोग तुमच्यासाठी आहे. आम्ही सर्व तक्रारी गांभीर्याने घेतो आणि आवश्यक ती कारवाई करतो. तुम्ही पाठपुरावा करा, आयोग तुमच्या न्यायासाठी कटिबद्ध आहे.

## आषाढी एकादशीला 'या' वाहनांना टोलमाफी

मुंबई : वारीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांना संरक्षण देण्यासाठी त्यांचा समूह विमा काढण्यात येईल. वारकऱ्यांना वैद्यकीय सेवा पुरवण्यात येतील. लवकरच होणार असलेल्या आषाढी वारी संदर्भात प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ही माहिती दिली. आषाढी वारीनिमित्त केलेल्या उपाययोजना आणि वारकऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृहात विशेष बैठक पार पडली होती. त्याविषयीची अधिक माहिती प्रसारमाध्यमांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. वारी मार्गातील अडथळे दूर केले जातील. पावसामुळे वारी मार्गाचे नुकसान झाले असेल तर आवश्यक ती डागडुजी तातडीने केली जाईल. वारी मार्ग कुठेही खराब झाला असल्यास मुरूम, खडी आणि डांबरीकरण करून त्याची तातडीने डागडुजी करावी, वारकऱ्यांना मुबलक पाणी, विजेची जोडणी, पालखी तळावर वॉटरप्रूफ तंबू उपलब्ध करून द्यावे.

## बुलेट ट्रेनसाठी विरार स्थानकाच्या कामाला सुरूवात!
### ३५.३२ मीटर रुंद व ५० मीटर रुंद स्लॅब कास्टिंग सुरू

मुंबई : अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पातील विरार स्थानकाच्या पायाभरणीचे काम सुरू झाले आहे. पहिल्या स्लॅबचे कास्टिंग सुरु झाले असून तो ३५.३२ मीटर लांब आणि ५० मीटर रुंद आहे. या कामासाठी १५५५ घन मीटर काँक्रीट वापरण्यात येणार आहे.

महाराष्ट्र-गुजरातदरम्यान ५०८ किमी लांबीच्या या प्रकल्पाचे काम गुजरातसह महाराष्ट्रातही वेगाने सुरू आहे. बीकेसी स्थानकानंतर विरार हे दुसरे स्थानक आहे. ठाणे, पालघर आणि मुंबई या जिल्ह्यांतून बुलेट ट्रेन धावणार असून हा प्रकल्प दोन राज्यांमधील महत्त्वाचा आर्थिक दुवा ठरणार आहे. या प्रकल्पाचे राज्यातील काम गुजरातपेक्षा उशिराने सुरू झाले असले तरी त्याने आता वेग पकडला असल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. त्यातील पहिल्या बीकेसी स्थानकाचे काम आधीच सुरू झाले आहे. महामुंबईतील ३ जिल्ह्यांमधून ही बुलेट ट्रेन धावणार असल्याने तो दोन राज्यांमधील महत्त्वाचा इकॉनॉमिक कॉरिडॉर



ठरणार आहे.

बुलेट ट्रेनची उभारणी तीन पॅकेजमध्ये करण्यात येत असून तिसऱ्या पॅकेजमध्ये महाराष्ट्र-गुजरात सीमेवरील १३५ किमी शिळफाटा आणि झारोळी गावादरम्यानच्या मार्गिका आणि ठाणे डेपोसह ठाणे, विरार, बोईसर स्थानक उभारणीचा समावेश आहे. यातील विरार स्थानकाची पायाभरणी सुरू झाली असून एकूण ९ स्लॅबनंतर बुलेट ट्रॅक टाकण्यासाठी काम सुरू होणार आहे.

महाराष्ट्र-गुजरातदरम्यान ५०८ किमी लांबीच्या बुलेट ट्रेन प्रकल्पाचे काम गुजरातसोबत महामुंबईमध्ये देखील वेगाने सुरू आहे. या प्रकल्पाचे राज्यातील काम गुजरातपेक्षा उशिराने सुरू झाले असले तरी त्याने आता वेग पकडला असल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. त्यातील पहिल्या बीकेसी स्थानकाचे काम आधीच सुरू झाले आहे. महामुंबईतील ३ जिल्ह्यांमधून ही बुलेट ट्रेन धावणार असल्याने तो दोन राज्यांमधील महत्त्वाचा इकॉनॉमिक कॉरिडॉर ठरणार आहे.

असं असणार विरार स्थानक

विरार स्थानकाच्या तळमजल्यावर तिकीट आरक्षण केंद्र, सरकते जिने, लिफ्ट, प्रतीक्षागृह, प्रवासी सुविधा केंद्र, सुरक्षा तपासणी, प्रथमोपचार केंद्र, दुकाने असतील. पहिल्या मजल्यावर ४ ट्रॅक असतील. त्यांच्या दोन्ही दिशांना प्लॅटफॉर्म असणार आहे.

# पिककर्ज पुरवठ्यासाठी कालबद्ध कार्यक्रम राबवा- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर, दि.२९(जिमाका)- जिल्ह्याचा सन २०२५-२६ करीता ३३ हजार ५०० कोटी रुपयांचा वार्षिक पतआराखडा तयार करण्यात आला आहे. आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते या पतआराखड्याचे विमोचन करण्यात आले. शेतकऱ्यांना वेळेत पिक कर्ज पुरवठा होण्यासाठी बँकांनी कालबद्ध पद्धतीने कार्यक्रम राबवावा, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सर्व बँकांना दिले.

जिल्हा नियोजन समिती सभागृहात जिल्हा बँकर्स समितीच्या तिमाही बैठकीत हा कार्यक्रम पार पडला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य



कार्यकारी अधिकारी अंकित, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेचे प्रकल्प अधिकारी अशोक शिरसे, भारतीय रिझर्व बँकेचे अमितकुमार मिश्रा, बँक ऑफ महाराष्ट्रचे विभागीय व्यवस्थापक विवेक नाचणे, नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक सुरेश पटवेकर, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक प्रेषित मोघे तसेच सर्व बँकांचे, महामंडळे व शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्याचा सन २०२५-२६ चा वार्षिक पतआराखडा यावेळी सादर करण्यात आला. हा पतआराखडा एकूण ३३ हजार ५०० कोटी रुपयांचा असून त्यात प्राधान्यक्षेत्रासाठी १६ हजार ७०० कोटी रुपयांचा आराखडा आहे. त्यात पिक कर्ज २४०० कोटी रुपये, मुदत कर्जे ३२०० कोटी रुपये असे एकूण कृषीक्षेत्रासाठी ५६०० कोटी रुपये, इतर प्राधान्य क्षेत्रासाठी १४०० कोटी रुपये , सुक्ष्म व लघु उद्योग क्षेत्रासाठी ९७०० कोटी रुपये असे एकूण प्राध्यान्य क्षेत्रासाठी १६ हजार ७०० कोटी रुपये, तर इतर (प्राधान्य नसलेल्या क्षेत्रासाठी) १६ हजार ८०० कोटी रुपये असे एकूण ३३ हजार ५०० कोटी रुपयांचा आराखडा सादर करण्यात आला. तसेच सन २०२४-२५ मध्ये गाठलेल्या आर्थिक उद्दिष्टांचाही आढावा यावेळी घेण्यात आला. माहिती देण्यात आली की, जिल्ह्यात सार्वजनिक व सहकारी बँका असे मिळून एकूण ५१२ शाखांचे जाळे आहे. प्राधान्य क्षेत्रासाठी ठरविण्यात आलेल्या १३ हजार ९०० कोटी रुपयांच्या वार्षिक पतपुरवठ्याच्या तुलनेत १५ हजार ८०६ कोटी रुपयांचे वितरण झाले. हे एकूण ११४ टक्के आहे. त्यात कृषी क्षेत्रासाठी ४हजार ७५० कोटी रुपयांच्या तुलनेत ५ हजार २८९ कोटी रुपयांचे वितरण झाले. गत वर्षी पिक कर्ज वितरणाचे उद्दिष्ट २४०० कोटी रुपये इतके होते प्रत्यक्षात ते २ हजार १३० कोटी रुपये म्हणजेच ९० टक्के झाले, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, जिल्ह्यात विविध क्षेत्रात बँकानी अर्थसहाय्य करणे आवश्यक आहे. महिलांच्या स्वयंरोजगारासाठी स्वयंसहायता गटांना केला जाणारा पतपुरवठा चांगला असून त्याद्वारे महिलांना रोजगार व्यवसायाची संधी उपलब्ध होत आहे. ज्या क्षेत्रात रोजगाराच्या संधींना वाव आहे तेथे अर्थ पुरवठा वाढवला पाहिजे. पिक कर्ज वाटप हे योग्य त्या वेळेत होणे आवश्यक आहे. त्यासाठी कालबद्ध कार्यक्रम राबवून शेतकऱ्यांना वेळेत अर्थ पुरवठा व्हावा. जेणे करुन त्यांना पैसा वेळेत कामात यावा.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकीत आणि प्रकल्प व्यवस्थापक अशोक शिरसे यांनीही आपले मनोगत यावेळी मांडले.

## आषाढी वारीपूर्वी कोविड पोहचला सोलापूरात!
### २ नवे रुग्ण, प्रशासन सतर्क

सोलापूर : आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर राज्यभरातील वारीतील सहभागींसाठी जय्यत तयारी सुरू असतानाच सोलापूर जिल्ह्यातून चिंता वाढवणारी बातमी समोर आली आहे. माळशिरस तालुक्यातील राऊतनगर-अकलूज आणि माळीनगर येथे दोन कोरोनाबाधित रुग्ण आढळून आल्याने आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रियांका शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, सदर रुग्णांना प्रकृती अस्वस्थ वाटू लागल्याने ते खासगी ऐपेक्स आणि ऱ्हीदम हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल झाले होते. खाजगी लॅबमध्ये तपासणीनंतर दोघेही कोरोना पॉझिटिव्ह आढळले. यानंतर आरोग्य विभागाने तत्काळ संबंधित कुटुंबातील सर्वांची तपासणी केली. यातील एका रुग्णाने प्रवास केल्याचेही निष्पन्न झाले आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव वाढू नये म्हणून जिल्हा प्रशासनाने आषाढी वारीच्या तयारीदरम्यान विशेष दक्षता घेण्याचे आदेश दिले आहेत. यासाठी २५,००० रॅट किट्स, १०,००० आरटीपीसीआर ट्यूब्स, १०,००० एन-९५ मास्क, ५०,००० सर्जिकल मास्क, ५०० पीपीई किट्स, १००० सॅनिटायझरच्या बाटल्या आणि १०,००० हॅन्ड ग्लोज मागवण्यात आले आहेत.

# सकारात्मकपणे काम करणारी आजची तरुणाई सर्वांसाठी प्रेरक : माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे
## राज्यातील कर्तृत्ववान तरुणाईस यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार प्रदान

छत्रपती संभाजीनगर, दि. ३० : समृद्ध समाज निर्मितीसाठी यशवंतराव चव्हाण सेंटरच्या माध्यमातून शेती, युवक, महिला, शिक्षण, आरोग्य अशा विविध क्षेत्रात खूप मोठे सामाजिक कार्य सुरू आहे. या माध्यमातून सपर्पित भावनेने, लक्ष केंद्रित करत, जिद्द, चिकाटी, मेहनत घेत, अडचणीत तग धरून राहत, सकारात्मक आणि सातत्य ठेवत काम करणारी ही आजची तरुण पिढी ससर्वांसाठी प्रेरक आहे. भारताचे उद्याचे भविष्य असणाऱ्या तरुणाईस आज यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार देत असताना अभिमान वाटतो, असे प्रतिपादन राज्याचे माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी यावेळी केले.

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी विविध क्षेत्रात विधायक, भरीव व विशेष कामगिरी करणाऱ्या युवक-युवतींना दिल्या जाणाऱ्या यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार सोहळ्याचे आज एमजीएम परिसरातील



रुक्मिणी सभागृहात मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजन करण्यात आले होते. यावेळी राज्याचे माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

या पुरस्कार वितरण सोहळ्यास अध्यक्षस्थानी यशवंतराव चव्हाण सेंटरच्या जिल्हा केंद्राचे अध्यक्ष अंकुशराव कदम, मानद कार्यक्रम व्यवस्थापक दत्ता बाळसराफ, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, कार्यकारिणी सदस्य डॉ.अपर्णा कक्कड, लेखक दासू वैद्य, संयोजक नीलेश राऊत, केतकी नेवपुरकर, गौरव सोमवंशी,विभागप्रमुख संतोष मेकाळे व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ. टोपे म्हणाले, आज विविध क्षेत्रात काम करणारे हे सगळे तरुण समाजाच्या भल्यासाठी काम करत आहेत. विशेषत: सामान्य नागरिकांचे जीवन सुखमय आणि आनंददायी होण्यासाठी ही तरुणई आपापल्या क्षेत्रात सामाजिक बांधिलकी जपत सातत्यपूर्ण कार्यरत आहे. या सर्वांनी आपल्या कामांतून 'नोकरी मागणारे होण्यापेक्षा नोकरी देणारे व्हा' हाच संदेश दिलेला आहे. यशवंतराव चव्हाण सेंटर विविध उपक्रमांच्या माध्यमातून समाजासाठी कार्य करणाऱ्या सर्वांना प्रेरणा आणि बळ देण्याचे काम करत आहे.

आज विविध क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या या सर्व पुरस्कार प्राप्त तरुणाईचे मी मनापासून अभिनंदन करतो. भारताला संतांच्या विचारांची फार मोठी परंपरा आहे. भगवान बुध्दाने उदात्त धर्माची दिलेली शिकवण जगासाठी मार्गदर्शक ठरलेली आहे. अशा समृद्ध विचार परंपरा लाभलेल्या देशात जाती धर्माच्या नावाने होणारे वाद बघून मन विषन्न होतं. वडीलधाऱ्या माणसाने तरुणांना या विषयी योग्य मार्ग दाखवला पाहिजे. आपण कुठे चुकत आहोत, हे दाखवून दिले पाहिजे. यशवंतराव चव्हाण सेंटरने यासाठी पुढील काळात काम केले पाहिजे. संधीची नवनवीन क्षितिजे उपलब्ध होत असताना आता या तरुणांनी न थांबता, अथक परिश्रमातून नवनवीन विक्रम स्थापित केले पाहिजेत, असे यशवंतराव चव्हाण सेंटरच्या जिल्हा केंद्राचे अध्यक्ष अंकुशराव कदम यांनी यावेळी सांगितले.

मानद कार्यक्रम व्यवस्थापक दत्ता बाळसराफ यावेळी बोलताना म्हणाले, आज यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार प्राप्त करणारे सगळे युवक युवती समाजाच्या भल्यासाठी अनेक महत्वाच्या विषयावर काम करत आहेत. माध्यमे याची दखल घेत असतील किंवा नाही. मात्र, आज यशवंतराव चव्हाण सेंटरने यांच्या कामाची दखल घेतली आहे. आपली आवड जोपासत ही सगळी तरुण मंडळी आपले सर्वस्व झोकून देऊन काम करत आहेत. या अशा समाजातील तळागाळात काम करणाऱ्या व्यक्तींमुळे महाराष्ट्र चालतो आहे.

आज झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात ७ विविध विभागांमध्ये एकूण १६ पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. महाराष्ट्रातील युवकांच्या कार्याचे मूल्यमापन होऊन त्यांचा गौरव व्हावा आणि प्रोत्साहन मिळावे, हे या पुरस्कारांचे उद्दिष्ट आहे.

पुरस्काराचे स्वरूप : रोख २१ हजार रु., स्मृतीचिन्ह व मानपत्र असे यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्काराचे स्वरुप आहे.

यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार २०२४-२५ सालचे मानकरी खालीलप्रमाणे आहेत :

साहित्य : १. विनायक होगाडे (कोल्हापूर) २. मृदगंधा दीक्षित (पुणे),

सामाजिक : ३. आकाश टाले (नागपूर) ४. ऋतुजा जेवे (बुलढाणा)

इनोव्हेटर : ५. सुश्रुत पाटील (पालघर) ६. पद्मजा राजगुरू (परभणी)

क्रीडा : ७. ओजस देवतळे, नागपूर (क्रीडा प्रकार : धनुर्विद्या) ८. हृतिका श्रीराम, सोलापूर (डायव्हिंग)

पत्रकारिता : ९. प्रथमेश पाटील (पुणे) १०. ज्योती वाय. एल. (मुंबई)

उद्योजक : ११. जयेश टोपे (नाशिक) १२. शिवानी सोनवणे (पुणे)

रंगमंचीय कलाविष्कार : १३. कृष्णाई उळेकर, धाराशिव (लोककला) १४. तन्वी पालव, सिंधुदुर्ग (शास्त्रीय नृत्य) १५. ऋतुजा सोनवणे, जळगाव (शास्त्रीय संगीत) १६. कल्पेश समेळ, रायगड (नाट्य)

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक नीलेश राऊत यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यशश्री मुळे हिने केले तर आभार विभागप्रमुख संतोष मेकाले यांनी केले. महाराष्ट्र गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली तर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## स्वामी विवेकानंद विद्यालयात सावरकरांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.३० मे -**

उमरग्यात स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालयात त्यांच्या १४२ व्या जयंतीचे औचित्य साधून अभिमानपूर्वक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी सावरकरांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका सविता लोहार होत्या, तर प्रमुख अतिथी म्हणून सहशिक्षक प्रणित सूर्यवंशी यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात सविता लोहार यांनी सावरकरांविषयी माहिती दिली. कार्यक्रमाला सहशिक्षक गोविंद जमादार, महेश कुलकर्णी, स्वप्निल पतंगे, संजय कोथळीकर, आनंद कुलकर्णी यांच्यासह सर्व शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संजय कोथळीकर यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. तर आभार प्रदर्शन आनंद कुलकर्णी यांनी केले.



### संक्षिप्त वृत्त...



### होर्टी येथे विद्यार्थी स्नेहमेळावा संपन्न

**इटकळ, दि.३० मे -**

माणसाच्या आयुष्यात शालेय जीवन ही अशी आठवण असते, जी माणसाच्या हृदयात कायम घर करून राहते. अशाच आठवणींना उजाळा देण्यासाठी शिक्षण प्रसारक मंडळाचे, लाल बहादूर शास्त्री विद्यालय होर्टी (ता.तुळजापूर) येथील १९९९-२००० इयत्ता दहावी, च्या विद्यार्थ्यांनी एकत्र येत सोमवार (दि.२६) स्नेह मेळाव्याचे आयोजन केले होते. त्याकाळचे वर्ग शिक्षक रवींद्र उपासे व सुभाष गायकवाड हे दोन्ही शिक्षक स्नेह मेळाव्यात उपस्थित होते. २५ वर्षांपूर्वी त्या काळात विद्यार्थ्यांचे जीवन घडवणाऱ्या शिक्षकांचा सन्मान चिन्ह व पुष्पगुच्छ, शाल देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सुषमा लोंढे, वैशाली गायकवाड, करुणा बिडवे, नितीन गायकवाड, प्रशांत बिराजदार, रमेश घोडके, ज्ञानेश्वर राजमाने, बाळकृष्ण बिराजदार, विश्वनाथ तूगावे, जगु मोरे, रवींद्र उबाळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय मोटे यांनी केले.

### सिद्रामप्पा जळकोटे यांचे निधन

**इटकळ, दि.३० मे -**

तुळजापुर तालुक्यातील मौजे केशेगाव येथील ज्येष्ठ नागरीक वि.का.स.सो.लि. केशेगावचे माजी चेअरमन सिद्रामप्पा शिवबसप्पा जळकोटे यांचे अल्पशा आजाराने गुरुवार दि.२९ मे रोजी रात्री ११ वाजता निधन झाले आहे.



सिद्रामप्पा जळकोटे यांचा गावच्या जडणघडणीत त्यांचा महत्वाचा वाटा होता. सेवानिवृत्त मुख्याध्यापक नागनाथ जळकोटे व सहशिक्षक शिवशंकर जळकोटे यांचे ते वडील आहेत. त्यांचावर आज (दि.३०) रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे, जावई, नातु, नात जावई, पणतु असा मोठा परीवार आहे.

# जिल्ह्यात सर्कलनिहाय वीज अटकाव यंत्र बसवावेत

## अनिल जगताप यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० मे -**

अवकाळी वादळी वाऱ्यासह गडगडाटी पावसामुळे जिल्ह्यात शेतकरी आणि जनावरांचे प्रचंड नुकसान होत असून, वीज पडून होणाऱ्या मृत्यूच्या घटनांत दरवर्षी वाढ होत आहे. या पार्श्वभूमीवर शेती अभ्यासक अनिल जगताप यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे जिल्हा परिषद सर्कलनिहाय वीज अटकाव (रोधक) यंत्र बसवण्याची मागणी केली आहे.



यावर्षी मागच्या आठ दिवसापासून जिल्ह्यात वादळी वारा, विजेच्या तांडवासह मान्सून पूर्व पावसाने कहर केला असून विज पडून शेतकऱ्याचे तसेच जनावराची हानी झाल्याची नोंद झालेली आहे. मात्र वीज पडण्यापासून रोखण्यासाठी असणारे वीज अटकाव यंत्र मात्र जिल्ह्यात केवळ चारच ठिकाणी आहे. मागील पाच वर्षात हे अटकाव यंत्र बसवले गेले नाही. धाराशिव जिल्ह्यात उमरगा तालुक्यातील माडज येते तर कळंब तालुक्यातील मोहा येथे तसेच धाराशिव तालुक्यातील आंबेजवळगा येथे व तुळजापूर तालुक्यातील मसला खुर्द येथे केवळ चारच वीज अटकाव यंत्र बसवलेली आहेत.

वीज पडून होणारी जीवितहानी व पशुधन वाचवण्यासाठी जिल्ह्यात जिल्हा परिषद सर्कल वाईज वीज अटकाव यंत्र बसवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. विज पडून २०२० पासून झालेली मनुष्यहानी व दगावलेली जनावरे यांची संख्या लक्षात घेतली तर आपल्या लक्षात येईल सन २०२० ला वीज पडून तीन व्यक्ती मयत झाल्या आहेत. तर १७७ जनावरे मयत झाली आहेत. २०२१ ला वीज पडून एक व्यक्तीमह झाली असून २६१ जनावरे दगावली आहेत. २०२२ ला चार वीज पडून व्यक्ती मृत्युमुखी पडले आहेत. तर १२७ जनावरे दगावली गेली आहेत. सन २०२३ ला चार व्यक्ती मृत्युमुखी



पडले असून ४६ जनावरे दगावली आहेत. सन २०२४ ला वीज पडून चार व्यक्ती दगावले आहेत. तर १७१ जनावरे मयत झाली आहेत. २०२५ मध्ये २१ मे पर्यंत दोन व्यक्ती वीज पडून मृत्युमुखी झालेले आहेत. तर ३६ जनावरे दगावली गेली आहेत. याचा अर्थ वीज पडून धाराशिव जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात मनुष्यहानी तसेच पशुधन मयत झालेले आहे यासाठी वीज अटकाव यंत्राची धाराशिव जिल्ह्यात अत्यंत गरज आहे.

वीज पडून मृत्युमुखी पडलेल्या शेतकऱ्यांना व मयत झालेल्या जनावराला अद्यापही बऱ्याच प्रमाणात शासकीय मदत मिळाली नाही तीही तातडीने द्यावी अशी मागणी अनिल जगताप यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

## बसस्थानकाच्या बोगस कामाप्रकरणी महाविकास आघाडीचे बोंब मारो आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३० मे -**

येथील जुने बसस्थानकचे टॅपरुप (टेन्सल फॉर्बीक) हे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे व इतर कामे बोगस व निवीदेच्या रकमेपेक्षा डबल खर्च दाखवुन महाराष्ट्र शासनाची व महामंडळाची फसवणुक केली असुन याबाबत संबंधीत अधिकारी, ठेकेदार व इतर यांच्यावर कायदेशीर कारवाई होत नसल्याने दि.३ जून रोजी महाविकास आघाडीचे बसस्थानक समोर बोंब मारो आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा तहसीलदार यांना दिलेल्या निवेदना केला आहे

सदरील निवेदनात असे म्हटले आहे की, श्री क्षेत्र तुळजापूर येथील जुने बसस्थानक पाडुन तेथे जे नविन बसस्थानक करण्यात आले असुन सदरील काम चालु झाल्यापासुन अत्तापर्यंत निकृष्ट दर्जाचे, बोगस व अंदाज पत्रकाप्रमाणे काम न करता तसेच मुळ अंदाजपत्र निविदाच्या डबल खर्च दाखवुन एस.टी. महामंडळ, महाराष्ट्र शासन यांची फसवणुक करुन कोटयावधी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. याबाबत आपण योग्यती चौकशी करुन संबंधीत अधिकार ठेकेदार यांच्याकडुन अपहार झालेली रक्कम वसुल करण्यात यावी तसेच सदर काम हे वाळु न वापरता दगडापासुन बनविलेले माती मिक्स टस्ट वापरुन बांधकाम करयात



आलेले आहे. त्याबाबत वारंवार निवेदन दिले होते. सदर निवेदनावर आज तागायत कोणतीही कार्यवाही झाले नाही तसेच वरील विषयाच्या अनुषंगाने तुळजापूर येथील जुने बसस्थानकचे टॅपरुप (टेन्सल फॉर्बीक) हे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असुन याची चौकशी करुन सर्व संबंधीतावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी याबाबत वारंवार सर्व संबंधीतांना तक्रारी निवेदन देवुनही अद्याप संबंधीतावर कोणतीही कार्यवाही होत नसल्याने महाविकास आघाडी व घटक पक्षाच्या वतीने दि.३ जून रोजी लोकशाही मार्गाने जुने बसस्थानक आवारात बोंब मारो आंदोलन करण्यात येणार आहे.

या निवेदनावर धीरज पाटील, अमोल कुतवळ, ऋषिकेश मगर, शाम पवार, सुनील जाधव, सुधीर कदम, दीपक थोरात, नरेश पेंदे, किरण यादव, आकाश शिंदे, अजय साळुंके, प्रदीप मगर, अक्षय कदम, अनमोल साळुंके, नागनाथ भांजी, उत्तम अमृतराव, महादेव देवकर, प्रदीप मगर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## विनापरवाना गांजा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्या आरोपीवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.३० मे -**

अवैधरीत्या गांजाची विक्री करण्याच्या उद्देशाने गांजा जवळ बाळगणाऱ्या एका व्यक्तीविरुद्ध वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई दि.२९ मे रोजी सकाळी २.४० वाजता करण्यात आली.

फुलचंद साहेबा शिंदे (रा. लाखनगाव, ता. वाशी) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी फुलचंद शिंदे याच्या राहत्या घरात छापा टाकण्यात आला असता ७.०१० कि.ग्रॅम वजनाचा, अंदाजे १ लाख ४० हजार २०० रुपये किंमतीचा हिरव्या रंगाचा, ओला-सुका व उग्र वास असलेला गांजा आढळून आला.हा अंमली पदार्थ आरोपीने कोणतीही अधिकृत परवानगी न घेता स्वतःच्या फायद्यासाठी विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगलेला असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## अरुंद शेत रस्ते होणार १२ फुटांचे; ६० वर्षानंतर 'महायुती'चा ऐतिहासिक निर्णय

### निर्णयाचा मा.आ. सुजितसिंह ठाकूर यांच्याकडून स्वागत...

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.३० मे -**

महाराष्ट्राचा आधुनिक शेती व वाढत्या यांत्रिकीकारणाचा वेग लक्षात घेऊन महसूल विभागाने बांधावरील अरूंद शेतरस्ते बारा फूटांचे करण्याचा अतिशय क्रांतिकारी व ऐतिहासिक निर्णय घेतल्याबद्दल भाजपा नेते मा.आ. सुजितसिंह ठाकूर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर हावनकुळे व महायुती सरकारचे आभार मानले आहेत.

बांधावरून जाणारे सध्याचे पारंपारिक अरुंद शेतरस्ते आधुनिक कृषी अवजारांची ये-जा सुलभ व्हावी, तसेच शेतीमाल योग्य वेळेत बाजारपेठेत पोहचावा यासाठी ३ ते ४ मीटर, म्हणजे जवळपास १२ फूट करण्यात येणार आहेत.



पारंपरिक शेत रस्ता बांधणीच्या १९६६ च्या निर्णयानंतर प्रथमच म्हणजे, सुमारे ६० वर्षांनी महाराष्ट्राच्या आधुनिक शेतीसाठी हा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनातून शेतकरी हिताची पायाभरणी होत असून, सर्वंकष सर्व बाबींचा विचार करून हा निर्णय धडाकेबाज व कार्यक्षम महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या विभागाने घेतला आहे.

विशेष म्हणजे, शेतरस्त्यांच्या जागांमध्ये अतिक्रमणासह भविष्यातील खरेदी विक्रीच्यावेळी अन्य शेतीविषयक वाद उद्भवू नयेत म्हणून या शेतरस्त्याची नोंद जमिनीच्या ७/१२ मध्ये होणार आहे. हे शेतरस्ते जलदगतीने पूर्ण करण्यासाठी अर्ज प्राप्त झाल्यापासून ९० दिवसांच्या आत प्रकरण निकाली काढण्याबाबत शासन आदेश जारी केले आहेत.

शेतकऱ्यांना आधुनिक शेती व उत्पन्नवाढीसाठी या निर्णयाचा निश्चितच शेतकऱ्यांना लाभ होईल, असे मा.आ. सुजितसिंह ठाकूर यांनी म्हटले आहे.

## नुकसानीचे पंचनामे करुन बाधित शेतकऱ्यांना भरपाई द्या : चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३० मे -**

अवकाळी पावसामुळे तुळजापुर तालुक्यात मोठ्या प्रमाणात फळपिकांचे नुकसान झाले आहे. त्याचबरोबर शेतातील माती वाहुन गेल्याने शेत जमिनीचेही मोठे नुकसान झाले आहे. सरकारने तात्काळ या नुकसानीचे पंचनामे करुन बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी राज्याचे माजी मंत्री व तुळजापुर तालुक्याचे माजी आमदार मधुकरराव चव्हाण यांनी केली आहे.

गेल्या पंधरा दिवसांपासुन तुळजापुर तालुक्यात अवकाळी पावसाने अक्षरशा धुमाकुळ घातला आहे. दररोज पडत असलेल्या या अवकाळी पावसामुळे तुळजापुर तालुक्यात द्राक्ष तसेच पपईच्या बागा उध्वस्त झाल्या आहेत. खुदावाडी, अणदुरसह तालुक्यातील अनेक गावांतील फळपीके उध्वस्त झाली आहेत. या अवकाळी पावसामुळे टरबुज पिकाचे तर अक्षरशा चिखल झाले आहे. सध्या तालुक्यातील शेत शिवारामध्ये पाणीच पाणी थांबले आहे. या अवकाळी पावसामुळे बागायती तसेच जिरायत क्षेत्रातील पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे असे राज्याचे माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी म्हटले आहे. तालुक्यातील १८६ हेक्टर पेक्षा जास्त क्षेत्रावरील फळ पिकांचे नुकसान झाले आहे. त्याचबरोबर या पावसामुळे शेतातील माती वाहुन गेल्याने शेतजमिनीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. खुदावाडीतील पपईच्या १४ पेक्षा जास्त बागा भुईसपाट झाल्या आहेत त्याचबरोबर अणदुर शिवारातीलही पपई तसेच द्राक्षांच्या बागांचे मोठे नुकसान झाले आहे.

सरकारने तात्काळ या नुकसानीचे पंचनामे करून तालुक्यातील बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी केली आहे.

## १०० वर्षांपूर्वीचे पवित्र बेलाचे झाड वादळी वाऱ्यात जमीनदोस्त; डुकरांचा विजेच्या शॉकने मृत्यु



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३० मे -**

नळदुर्ग शहरात दि.२९ मेच्या मध्यरात्री जोरदार वादळी वाऱ्यासह पडलेल्या अवकाळी पावसाने जनजीवन विस्कळीत झाले असून, शहरातील एक ऐतिहासिक व धार्मिकदृष्ट्या महत्त्वाचे असलेले १०० वर्षांपूर्वीचे बेलाचे झाड मुळासकट उपटून पडल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.

हे झाड लिंगायत समाजाच्या स्मशानभूमीलगत होते व अनेक वर्षांपासून लिंगायत व हिंदू समाजासाठी धार्मिक कार्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत होते. मृत व्यक्तीच्या अंत्यविधीसाठी आवश्यक असणारी बेलाची पाने तसेच श्रावण महिन्यात महादेव पूजेसाठी वापरण्यात येणारी पाने याच झाडावरून संपूर्ण नळदुर्ग शहरातील भाविकांना पुरवली जात होती.

वादळी वाऱ्यामुळे हे झाड विजेच्या तारांवर कोसळले, ज्यामुळे तारा तुटून जमिनीवर आल्या आणि त्याच्या संपर्कात आलेल्या चार ते पाच डुकरांचा विजेचा शॉक लागून मृत्यू झाला. सुदैवाने मोठा मानवी अपघात टळला आहे.

सध्या नळदुर्ग व परिसरात दररोज वादळी वारे व विजांसह तुफान पाऊस सुरू आहे.

ज्याचा जनजीवनावर गंभीर परिणाम झाला आहे. प्रशासनाकडून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत वृद्धाचा मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.३० मे -**

अंदोरा शिवारात पायी चालणाऱ्या ७० वर्षीय वृद्धास अज्ञात वाहनाने धडक दिल्याने त्यांचा मृत्यू झाला आहे. हा अपघात दि. २७ मे रोजी सायंकाळी ६.३० वाजता घडला असून, संबंधित वाहन चालक अपघातानंतर घटनास्थळावरून न थांबता फरार झाला आहे.

भास्कर सरदार काळे (वय ७०, रा. कन्हेरवाडी पाटी आंदोरा, ता. कळंब) हे अंदोरा शिवारातून पायी जात असताना अज्ञात वाहन चालकाने हायगिअरने व निष्काळजीपणे वाहन चालवून त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात भास्कर काळे गंभीर जखमी होऊन त्यांचा मृत्यू झाला.

अपघातानंतर वाहन चालक थांबला न करता घटनास्थळावरून पळून गेला.

## हातभट्टीसाठी ओळखल्या जाणाऱ्या पाटील तांड्यातून वेदांत राठोडचे दैदिप्यमान यश



दहावीत ९३ टक्के गुण; पत्रकार संघाकडून गौरव...

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३० मे -**

ज्या पाटील तांड्याची ओळख ही हातभट्टी दारू गाळपासाठी आहे, त्याच ठिकाणातील वेदांत सतीश राठोड याने दहावीच्या परीक्षेत तब्बल ९३ टक्के गुण मिळवून एक प्रेरणादायी कामगिरी केली आहे. त्याच्या या यशाबद्दल नळदुर्ग शहर पत्रकार संघ यांच्या वतीने त्याचा सत्कार करून गौरव करण्यात आला.

वेदांतचे पहिले ते आठवीपर्यंतचे शिक्षण सोलापूर येथील भारती विद्यापीठात झाले असून नववी व दहावीचे शिक्षण अणदुर येथील जवाहर विद्यालयात झाले आहे. अत्यंत सामान्य परिस्थितीत, दारू गाळपासाठी ओळखल्या जाणाऱ्या परिसरात राहूनही मेहनत, चिकाटी आणि पालकांचे पाठबळ यांच्या जोरावर मिळवलेले वेदांतचे हे यश कौतुकास्पद व समाजासाठी प्रेरणादायी आहे. वेदांतच्या गौरव समारंभात सुहास येडगे, तानाजी जाधव, विलास येडगे, उत्तम बनजगोळे, दादासाहेब बनसोडे, वेदांतचे वडील सतीश राठोड, रघुनाथ नागणे, अमर भाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

# कळंब बसस्थानकात घाणीचे साम्राज्य : प्रवाशांचे हाल; प्रशासनाचे दुर्लक्ष



**तभा वृत्तसेवा / अनिल गाडे**
**कळंब, दि.३० मे -**

धाराशिव जिल्ह्यातील एक प्रमुख बसस्थानक असलेल्या कळंब येथील बसस्थानक सध्या अत्यंत दुरावस्थेत असून प्रवाशांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. विदर्भ आणि मराठवाड्यातील अनेक भागांमध्ये लांब पल्ल्याच्या एस.टी. बसगाड्या येथे थांबत असल्यामुळे येथे नेहमीच मोठी प्रवासी गर्दी असते. मात्र, या ठिकाणी अस्वच्छता, वाहक-चालकांच्या मनमानी कारभारामुळे कोलमडलेली सेवा आणि सुरक्षेच्या अभावामुळे प्रवाशांचा त्रास दिवसेंदिवस वाढत आहे.

स्थानक परिसरात स्वच्छतेचा अभाव स्पष्टपणे जाणवतो. कचराकुंड्या ओसंडून वाहत असून, सार्वजनिक स्वच्छतागृहांचीही अवस्था दयनीय आहे. यामुळे दुर्गंधी आणि साथीचे आजार पसरण्याचा धोका निर्माण झाला आहे. वाहक आणि चालकांच्या मनमानीमुळे बसेस वेळेवर थांबत नाहीत वा सुटत नाहीत. यामुळे प्रवाशांना तासनतास वाट पाहावी लागते. काही वेळा ठराविक गाड्या इच्छित मार्गावर न नेताच रद्द केल्या जातात, असा आरोप प्रवाशांनी केला आहे. सर्वात चिंताजनक बाब म्हणजे स्थानक परिसरात चोरीच्या घटना वाढल्या आहेत. विशेषतः महिलांवर टवाळखोरांकडून होणाऱ्या छेडछाडीचे प्रमाणही वाढले आहे. संध्याकाळनंतर महिला प्रवाशांना या ठिकाणी थांबणे धोकादायक ठरू लागले आहे. या सर्व प्रकारांकडे आगारप्रमुखांचे पूर्णपणे दुर्लक्ष झाल्याचे चित्र आहे. प्रवाशांनी वारंवार तक्रारी करूनही त्यावर कोणतीही ठोस कारवाई होत नाही.

स्थानिक नागरिकांनी यासंदर्भात आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

## संक्षिप्त

### अमोल मिटकरी हळकुंड घेऊन पिवळा झालेला नवरदेव ओबीसी नेते नवनाथ वाघमारे

**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**



मिटकरीला भोकायला अजित पवारांनी ठेवलेला आहे - वाघमारे मिटकरी स्वतःला ओबीसी म्हणून घेतात आणि जरांगेचे बूट उचलतात असे ओबिसी नेते नवनाथ वाघमारे यांनी म्हटलेअमोल मिटकरी हळकुंड घेऊन पिवळा झालेला नवरदेव आहे अशी टीका ओबीसी नेते नवनाथ वाघमारे यांनी केलीय.. मिटकरी ला अजित पवारामुळे विधान परिषद मिळाली आहे..मिटकरी च्या गावातली ग्रामपंचायत स्वतःच्या ताब्यात नाही, मिटकरीला भोकायला अजित पवारांनी ठेवलेला आहे, मिटकरी स्वतःला ओबीसी म्हणून घेतात आणि जरांगेचे बूट उचलतात अशी खोचक टीका वाघमारे यांनी केलीय..

**ऑन स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका**

**प्रत्येक पक्षाने ओबीसींना स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत तिकीट द्यावी, वरीजनल ओबीसींनाच ओबीसी मतदान करणार आहेत घुसखोरी करणाऱ्या ओबीसींना तिकिटे देऊ नये अशी मागणी नवनाथ वाघमारे यांनी केलीय.**

**ऑन लाडकी बहीण**

**सरकारी कर्मचारी असणाऱ्या लाडक्या बहिणीने या योजनेचा फायदा घेऊ नये, गोरगरीब महिलांसाठी ही योजना असून, या लाडक्या बहिणीने या योजनेचा लाभ घेतलाय त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे..**

### जालना जिल्ह्यात पाळीव प्राण्यांच्या अंत्यविधीसाठी स्वतंत्र स्मशानभूमीची तयारी – तरंग कांबळे यांच्या मागणीला यश

**तभा वृत्तसेवा**
**अंबड /प्रतिनिधी**



अंबड राज्यातील पाळीव प्राणी जसे की कुत्रे, मांजरे, पांढरे उंदीर इत्यादी यांच्या अंत्यविधीसाठी स्वतंत्र स्मशानभूमीची मागणी अखेर मान्य करण्यात आली आहे. अंबड येथील सामाजिक कार्यकर्ते आणि लोकआत्मा न्यूज चॅनल चे संपादक श्री. तरंग लक्ष्मणराव कांबळे यांनी ३० एप्रिल २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात ई-मेलद्वारे सादर केलेल्या मागणीला शासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.या मागणीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांनी महानगरपालिका, नगरपरिषद व नगरपंचायत प्रशासनांना आदेश दिले आहेत की, त्यांच्या कार्यक्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापन केंद्राच्या शेजारी पाळीव प्राण्यांच्या अंत्यविधीसाठी आवश्यक जागा उपलब्ध करून द्यावी. यासंदर्भातील परिपत्रक शासनाने २५ एप्रिल २०२५ रोजीच काढले आहे.जिल्हा निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांनी दिनांक २३ मे २०२५ रोजी स्वाक्षरीत पत्राद्वारे संबंधित यंत्रणांना ही कार्यवाही तातडीने पार पाडण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच अर्जदार श्री. तरंग कांबळे यांनाही यासंदर्भात माहिती देण्यात आली आहे.

श्री. कांबळे यांनी या निर्णयाचे स्वागत करताना सांगितले की, ''पाळीव प्राण्यांचे देखील आपल्या कुटुंबातील सदस्यासारखेच स्थान असते. त्यांच्या अंत्यविधीसाठी सन्मानपूर्वक जागा असणे ही संवेदनशील समाजाची गरज आहे.'' या निर्णयामुळे जिल्ह्यात प्राणीमित्र आणि नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

# दुष्काळी अनुदान वाटपात शेतकऱ्यांचे पैसे लाटणाऱ्या दोषीवर कठोरात कठोर कारवाई करा : आ . लोणीकर

## परतुर विधानसभा मतदारसंघातील विकास कामाच्या संदर्भात आमदार लोणीकर यांची जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनात आढावा बैठक संपन्न

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

अंबड, घनसावंगी, भोकरदन आणि जाफ्राबाद तालुक्यांमध्ये १२,००० बोगस शेतकऱ्यांच्या नावाने अनुदानाची रक्कम वळती करण्यात आली. यामध्ये बीड, अहिल्यानगर आणि बुलढाणा जिल्ह्यांतील शेतकऱ्यांची नावे यादीत घुसवण्यात आली. विशेष म्हणजे, एकाच शेतकऱ्याच्या नावे अनेकदा पैसे जमा करण्यात आले. यासाठी तहसीलदारांचे लॉगिन आणि पासवर्ड वापरण्यात आले, परंतु त्यांनी याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप आहे. तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यकांनी संयुक्त पाहणी न करता बोगस अहवाल सादर केले, ज्यावर तहसीलदार आणि उपविभागीय अधिकाऱ्यांनी नियंत्रण ठेवणे अपेक्षित होते. परंतु, यादी फेरतपासणीच्या जबाबदारीकडे हलगर्जीपणा दाखवण्यात आला, ज्यामुळे डीबीटीद्वारे बोगस खात्यांमध्ये पैसे जमा झाले. तहसीलदारांचे लॉगिन आणि पासवर्ड वापरून तलाठ्यांनी बोगस नावे अपलोड केली. याबाबत तहसीलदारांनी लक्ष न दिल्याने त्यांचा सहभाग किंवा निष्काळजीपणाचा संशय आहे. अंबड आणि अहिल्यानगर येथील एका तलाठी दांपत्याने नातेवाइकांची नावे आणि बँक खाते क्रमांक ऑनलाइन पोर्टलवर अपलोड केल्याचे उघड झाले. यादी अपलोड करण्यापूर्वी तहसीलदार आणि उपविभागीय अधिकाऱ्यांनी फेरतपासणी न केल्याने बोगस लाभार्थ्यांना अनुदान मिळाले. लोणीकर यांनी आरोप केला आहे की, संबंधित अधिकारी पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न करू शकतात, त्यामुळे त्यांना तात्काळ निलंबित करणे आवश्यक असल्या चे मत महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री परतुर विधानसभा मतदार संघाची विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांना केले. ते दिनांक ३० मे २०२५ रोजी शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे आयोजित परतूर विधानसभा मतदारसंघातील विकास कामांच्या आढावा बैठकी दरम्यान बोलत होते. आमदार बबनराव लोणीकर यांच्या या गंभीर आरोपावर जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी या प्रसंगी आमदार बबनराव लोणीकर यांना माहिती दिली की जानेवारी २०२५ मध्ये उपविभागीय अधिकारी पुलकित



सिंह, रोहयोच्या उपजिल्हाधिकारी मनीषा दांडगे आणि नायब तहसीलदार श्रीमती लुणावत यांच्या नेतृत्वाखाली त्रिसदस्यीय चौकशी समिती गठित केली. या समितीला अंबड आणि घनसावंगी तालुक्यांतील १६१ गावांतील (घनसावंगी: १२५ गावे, अंबड: ३६ गावे) अनुदान वाटप याद्यांची फेरतपासणीचे काम सोपवण्यात आले. समितीने तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहायकांनी अपलोड केलेल्या याद्यांचे तपासणी केली, ज्यामध्ये २५,५१४ बनावट शेतकऱ्यांच्या नावे ५६ कोटी ४९ लाख ५४ हजार ११२ रुपये वितरित झाल्याचे उघड झाले. अंबड तालुक्यात १८,४४९ आणि घनसावंगीत ७,०६५ बोगस लाभार्थ्यांना अनुक्रमे ४१ कोटी ४९ लाख आणि १४ कोटी ९९ लाख रुपये वितरित. दुबार अनुदान ५,४४९ लाभार्थ्यांना ८ कोटी ७२ लाख ६९ हजार ८२१ रुपये दुबार वितरित, यापैकी घनसावंगीतून १ कोटी ८ लाख रुपये वसूल झाले आहे. क्षेत्रवाढ आणि शासकीय जमीन ३,०५९ लाभार्थ्यांनी खोटी क्षेत्रवाढ दाखवून ५ कोटी ९७ लाख, तर ३९ जणांनी शासकीय जमीन दाखवून १० लाख ८० हजार रुपये उचलले. तलाठ्यांनी तहसीलदारांचे लॉगिन आयडी आणि पासवर्ड वापरून बनावट याद्या अपलोड केल्या. समितीने अंबड तालुक्यातील तपासणी जवळपास पूर्ण केली आहे, तर घनसावंगी तालुक्यातील १२५ गावांपैकी बहुतांश गावांचे तपास पूर्ण झाले आहेत.चौकशी पूर्ण करण्यासाठी समितीला आणखी तीन आठवड्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे, म्हणजेच जून २०२५ पर्यंत अंतिम अहवाल अपेक्षित आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी जालना जिल्ह्यातील इतर तालुक्यांमध्येही (उदा., जालना, परतूर, भोकरदन, जाफ्राबाद) समान गैरव्यवहाराची शक्यता लक्षात घेऊन तपासणीचे आदेश दिले आहेत.

जालना जिल्हा परिषदेचे परतुर येथील उपविभागीय कार्यालय ची इमारत पाडण्यात आली असून मोकळी झालेली जागा जालना जिल्हा परिषदेने शासकीय प्रकल्पाकरिता भाडेतत्त्वावर देण्याची गरज आहे कारण सदरील जागा भूखंड माफिया बळकवण्याची दाट शक्यता असल्याची भीती यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केली. जालना जिल्हा परिषदेचा सदरील जागेवर हक्क सांगताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की जालना जिल्हा परिषदेची इमारत जिल्हा परिषदेच्या स्थापनेपासून परतूर येथे उपलब्ध असून सदरील इमारतीचे लाईट बिल पाणीपट्टी जालना जिल्हा परिषदेने भरलेली असल्याने सदरील जागेवर जालना जिल्हा परिषदेचा हक्क असून शासकीय प्रकल्प करता सदरील जमीन भाडेतत्त्वावर देण्याचा सूचना देखील यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी केल्या. सदरील प्रकरणात वकील भूखंड माफीया अशी संगणमत करून सूत जुळवू शकतात अशी भीती देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी व्यक्त केली. पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की परतुर विधानसभा मतदारसंघात मंठा आणि परतूर या दोन्ही शहरात भूखंडमाफीया मोठ्या प्रमाणावर शासकीय जागा बळकवण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु एक इंच ही जागा भूखंड माफी यांना बळकवता येणार नाही. याकरिता जिल्हाधिकारी जालना यांनी लक्ष देणे गरजेचे आहे.

महाराष्ट्र सरकारने राज्यभरात राबविलेल्या वाळू धोरणाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी स्वागत करत राज्यभरात बांधकाम होत असलेल्या घरकुलांना मोफत वाळू देण्याच्या बाबतीत प्रशासनाने घेतलेल्या भूमिकेची आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी कौतुक केले. परंतु मंदिर बांधकाम, रस्ते बांधकाम, सर्वसामान्य नागरिकांच्या घराचे बांधकाम, गावातील नाल्या सभागृह सभा मंडपाचे बांध या सर्व शेतकऱ्यांच्या विहिरीचे बांधकाम करिता महसूल भरून घेऊन वाळू उपलब्ध करून देण्याचे निर्देश देखील यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी जिल्हाधिकारी जालना यांना दिले. जालना जिल्ह्यातील नद्यांमधून दररोज हजारो हायवा भरून लाखो ब्रास वाळू वाळू माफिया जिल्हा बाहेर विक्रीसाठी नेत असल्याचा गंभीर आरोप यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी केला. सदरील वाळू चोरी रोखण्याबाबत आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश दिले.

## स्वामी विवेकानंद विद्यालयात १८ वर्षानंतर माजी विद्यार्थ्यांनी दिला जुन्या आठवणींना उजाळा

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/ प्रतिनिधी**

येथील स्वामी विवेकानंद विद्यालयात १८ वर्षानंतर विद्यार्थी एकत्र येत जुन्या आठवणींना उजाळा दिला. सन २००६-२००७ मध्ये शिकत असलेल्या स्वामी विवेकानंद विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन स्नेहमिलन साजरे केले. सर्व माजी विद्यार्थी व शिक्षक वृंदांना फेटे बांधून गुरुवार (ता. २९) रोजी शहरातील माऊली मंगल कार्यालयात संगीत खुर्ची, गाण्याच्या भेंड्या व विविध खेळ खेळून मनसोक्त आनंद घेतला. दुपारी स्नेहभोजन घेऊन शालेय जीवनातील आठवणीला माजी विद्यार्थ्यांनी उजाळा दिला. यावेळी सूत्रसंचालन विजय राठोड यांनी केले व श्रीमती मोनिका राठोड यांनी कार्यक्रमाची रूपरेषा सांगून सुरुवात केली तसेच शिक्षकांनी मार्गदर्शन केले. यांनी बोलतांना शाळेचे माजी मुख्याध्यापक अंकुशराव मोरे यांनी सांगितले की, कोणी शिक्षक झाले तर कोणी स्पर्धा परीक्षामार्फत नोकरीला लागले. सर्व आपल्या जीवनात व्यस्त असताना देखील स्नेहमिलन घडवून आणला व या माध्यमातून आपल्या जीवनातील जुन्या आठवणींना उजाळा करून दिला. त्यामुळे मैत्रीचे नाते अधिक घट्ट झाल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.त्यामध्ये कपिल बोराडे, सुभाष बोराडे, विजय बोराडे, किशोर झोल, कृष्णा खरात, मोसीन बागवान, अमोल ठोकरे, प्रकाश चव्हाण, रवी बोराडे,



राजेश खंदारे, संभाजी काकडे,अजय वाघ, संजय चव्हाल, इमरान पठाण, ,संतोष बोराडे,सिद्धेश्वर निर्वल, असे गणेश घनवट, सचिन शिंदे,अशोक खराबे, मुजा खराबे ,सचिन मोरे, सोहेल शेख ,प्रशांत प्रधान,सचीन आघाव,बाळासाहेब टाके, लक्ष्मण काकडे, रणवीर सुरवसेमुलीमधून वर्षा केंद्रे, भारती लोमटे, मीना खंडागळे, शिल्पा बोरकर, माधुरी घुगे, ज्योती जोहरे, शांता घायाळ, रेखा पूरी, स्वाती वैद्य, श्रद्धा सोनटक्के, प्रियंका मगर,राधा घोगरे, रेखा शिंदे,रहीसा शेख यांनी मनोगत व्यक्त केले. शिक्षक वर्ग, मोरे सर,मगर सर,आघाव सर,व्हि.बी.जाधव, एस. एन. मोरे.सर,रमेश शिंदे, खराबे सर,सुधाकर घुगे,पंढरीनाथ काकडे यांनीही मार्गदर्शन केले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विजय बोराडे ,प्रकाश चव्हाण,कृष्णा खरात, सुभाष बोराडे,किशोर झोल यांनी परिश्रम घेतले तर आभार प्रदर्शन विजय राठोड यांनी मानले.

## बदनापूर नगरपंचायत सलाईनवर, विविध आजाराचा धोका वाढला, सर्वत्र दुर्गंधीचे साम्राज्य नगरपंचायत बेफिकीर

### वरीष्ठ अधिकाऱ्यांसह लोकप्रतिनिधींनी दखल घेण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**बदनापूर / शिवप्रसाद दाड**





रोगराई पसरून कोणीही याचे बळी पडू नये यासाठी शासनाकडून विविध योजना राबविण्यात येत आहे असे आदेशही शासनाकडून काढण्यात आले आहे, त्याची काटेकोरपणे अमलबजाणी झालीच पाहीजेत असे कठोर निर्देश असताना देखील बदनापूर शहरात मोठ्याप्रमाणात घाणीचे साम्राज्य आणी सर्वत्र दुर्गंधी पसरलेली आहे नाल्या तुंबल्या आहे साडपाणी मुख्य रस्त्यावर घाण कचरा आदी गंभीर बाबीकडे संबंधित प्रशासन कानाडोळा करत असल्याचा आरोप होत आहे. दरम्यान घाणीमुळे आणी पसरलेली दुर्गंधी मुळे विविध प्रकारचे साथीचे आजार वाढत आहे अनेक प्रकारच्या जातीचे डासांचा उगम होत आहे. सध्या सर्व दवाखाने हॉस्पिटल मध्ये मोठी गर्दी पहायला मिळत आहे, असे असले तरी बदनापूर. येथील नगरपंचायत गाफील होऊन बेफिकीर आणी मुकबदीर बनली आहे ज्या मुळे नागरीकांत प्रचंड संताप पहायला मिळत आहे तसेच ग्रामपंचायत विरुद्ध नागरीकांत मोठा रोष वक्त होत आहे. शासनाचे आदेश असताना. देखील बदनापूर नगरपंचायत केराची टोपली दाखवत आहे. वरीष्ठांकडून योग्य दखल घेऊन विषय चौकशी समीती गठीत करून संबंधित दोषीविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी बदनापूर ग्रामस्थांनाकडून करण्यात येत आहे.

## जाफराबाद पोलिसांची कारवाई: चोरीची स्विफ्ट डिझायर गाडी जप्त, गेवराईतील गुन्ह्याचा उलगडा

**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/प्रतिनिधी**

जाफराबाद, दि. २८ मे २०२५: जाफराबाद पोलीसांनी पेट्रोलिंगदरम्यान तत्परता दाखवत एक चोरीची स्विफ्ट डिझायर गाडी जप्त केली आहे. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक एस.डी. तायडे, पोलीस हेड कॉन्स्टेबल आनंद डोईफोडे आणि पोलीस कॉन्स्टेबल विजय जाधव यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. सदर गाडी गेवराई (जि. बीड) येथून दि. १२ मे २०२५ रोजी चोरीला गेल्याचा गुन्हा गेवराई पोलीस स्टेशन येथे नोंदवला गेला होता. पोलीस उपनिरीक्षक एस.डी. तायडे यांच्या नेतृत्वाखाली जाफराबाद येथे नियमित पेट्रोलिंग सुरू असताना, एका पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट डिझायर गाडीवर (पासिंग नंबर: चक १२ चथ ५६५३) संशय आला. या गाडीची हालचाल संशयास्पद वाटल्याने त्यांनी तात्काळ याबाबत माहिती पोलीस निरीक्षक प्रताप इंगळे यांना दिली. इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने गाडीची कसून चौकशी केली असता, ही गाडी गेवराई येथून चोरीला गेल्याचे



उघड झाले. गेवराई पोलीस स्टेशन येथे याप्रकरणी गुन्हा नोंद असल्याची माहितीही समोर आली. चौकशीअंती गाडी जप्त करून जाफराबाद पोलीस स्टेशन येथे आणण्यात आली आहे. या कारवाईमुळे गेवराई येथील चोरीच्या गुन्ह्याचा तपास पुढे सरकण्यास मदत होणार आहे. जाफराबाद पोलिसांच्या या तत्परतेमुळे परिसरात कायदा व सुव्यवस्थेचा विश्वास वाढला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक प्रताप इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.पोलीस निरीक्षक प्रताप इंगळे यांनी सांगितले की, नियमित पेट्रोलिंग आणि संशयास्पद गोष्टींवर लक्ष ठेवणे यामुळे अशा कारवाया यशस्वी होतात. त्यांनी पथकातील सर्व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आणि नागरिकांना आवाहन केले की, कोणतीही संशयास्पद बाब आढळल्यास तात्काळ पोलिसांना कळवावे. या घटनेमुळे जाफराबाद पोलिसांच्या कार्यक्षमतेचे कौतुक होत आहे.सदर गाडीच्या चोरीप्रकरणी गेवराई पोलीस स्टेशन येथील गुन्ह्याच्या तपासाला आता गती मिळण्याची शक्यता आहे. जाफराबाद पोलीस या प्रकरणातील आरोपींचा शोध घेण्यासाठी गेवराई पोलिसांशी समन्वय साधत आहेत. चोरीच्या या प्रकरणाचा पुढील तपास काय दिशा घेतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# चोरी, घरफोडी करणारे सराईत आरोपी व चोरीचा माल घेणारा इसम जेरबंद

## आरोपींच्या रु.६४,५००/- किंमतीचा मुददेमाल जप्त स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**

जालना जिल्हयात चोरी व घरफोडी करणाऱ्या इसमांचा शोध घेवुन कारवाई करण्याचे मा. पोलीस अधीक्षक साहेबांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांना सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी पथकातील अधिकारी व अंमलदार यांना चोरी व घरफोडी करणाऱ्या इसमांचा शोध घेवुन त्यांचेवर कारवाई करण्याच्या सुचना देवुन मार्गदर्शन केले होते. त्यानुषंगाने दिनांक २९/०५/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना गुप्त बातमीदार यांचे मार्फतीने माहिती मिळाली की, सराईत आरोपी नामे आकाशसिंग नरसिंग बावरी, रा. गुरुगोविंदसिंगनगर, जालना याने व त्याच्या साथीदाराने मिळुन राणीउचेगांव, जालना येथील मोटार मॅकेनिकचे दुकान फोडुन त्यातील मुददेमाल चोरी केला आहे. त्यानुषंगाने आरोपी नामे आकाशसिंग नरसिंग बावरी, वय-३५ वर्ष रा. गुरुगोविंदसिंगनगर, जालना व त्याचे साथीदार नामे मुकिंदरसिंग निक्कासिंग टाक, वय-४० वर्ष, रा. गुरुगोविंदसिंगनगर, जालना, राजसिंग



कालुसिंग टाक, वय-२० वर्ष, रा. जमुनानगर, जालना याचा शोध घेवुन त्यांना ताब्यात घेवुन त्यांच्याकडे गुन्हयाच्या अनुषंगाने चौकशी केली असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली देवुन आरोपीतांनी एम.आय.डी.सी. फेज क्र. ०३, गांधीनगर, गुंडेवाडी, पानशेंद्रा येथुनही लोखंडी जॅक, व्हिटेज जॅक, कटर मशीन, जॅक लिव्हर, विदुयत मोटार, लोखंडी सळया, मोटार पंप असे आरोपीतांनी चोरी करुन घेवुन गेले असुन सदर चोरी केलेला मुददेमाल त्यांनी इसम नामे राजेक मुबारक शेख, वय-२४ वर्ष, रा. संजयनगर, जुना जालना यास विक्री केला असल्याचे सांगितल्याने आरोपी नामे राजेक शेक यास ताब्यात घेवुन त्याच्या ताब्यातुन रु.६४,५००/- किंमतीचे लोखंडी जॅक, व्हिटेज जॅक, कटर मशीन, जॅक लिव्हर, विदुयत मोटार असा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपीतांनी केलेल्या गुन्हयाच्या अभिलेख पडताळला असता अंबड पोलीस ठाणे गु.र.क्र. १६०/२५ कलम ३०३(४) भा.न्या.सं., तालुका पोलीस ठाणे गु.र.क्र.२७७/२०२५ कलम ३०३(४) भा.न्या.सं., सदर बाजार पोलीस ठाणे गु.र.क्र.१४५/२०२५ कलम ३०३(२), भा.न्या.सं. चंदनझिरा पोलीस ठाणे गु.र.क्र. १२/२०२५ कलम ३०३(२) भा.न्या.सं., गु.र.क्र.२९/२०२५ कलम ३०३(२) भा.न्या.सं. या ठाण्यांतील एकुण ०५ गुन्हे उघड झाले आहे.

## अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती निमित्त पाहेगावात विविध उपक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद – जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे



तभा वृत्तसेवा
जालना /प्रतिनिधी

२९मे २०२५ : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त आज पाहेगाव (ता. जालना) येथील जोगेश्वरी माता मंदिर परिसरात विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात महाआरती, शंखनाद, भक्तिगीते, स्वच्छता अभियान तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्यांपैकी महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी आपल्या प्रभावी भाषणातून उपस्थितांना प्रेरणा दिली. भाजपा जालना महानगरचे जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या एक अष्टपैलू, दूरदृष्टी असलेल्या, लोकहितासाठी आयुष्य वेचणाऱ्या राजमाता होत्या. त्यांनी गड किल्ले, घाट, मंदिर, विहिरी, धर्मशाळा, शिक्षण संस्था यांची उभारणी करून समाजाचा विकास साधला. त्या काळात स्त्रियांना नेतृत्वाची संधी मिळणे कठीण होते, पण त्यांनी लोकाभिमुख राज्यकारभारातून एक आदर्श निर्माण केला. आज त्यांच्या विचारांचा वारसा आपण पुढे नेण्याची गरज आहे. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेत नव्या पिढीने शिक्षण, स्वच्छता, सामाजिक न्याय आणि महिलांचा सन्मान या बाबतीत पुढाकार घ्यावा. गावपातळीवर असे कार्यक्रम हे समाजमन जागृत करणारे असतात आणि तेच आपल्याला हवे आहे.'' असे हि ते म्हणाले. कार्यक्रम प्रसंगी कपिल दहेकर, तालुकाध्यक्ष संजय डोंगरे, श्री.सुनील पवार, वसंत शिंदे, बद्रिनाथ भसांडे, डॉ. तुकाराम कळकुंबे, परसराम तळेकर, गोवर्धन कोल्हे, मुकेश चव्हाण, रामजी शेजुळ, सतीश केरकळ, गजानन खरात, राजाराम जाधव, पांडुरंग आहेरकर, दौलत भुतेकर, नागेश अंभोरे, बाबासाहेब चाळगे, गोपाल चौधरी, दत्ता जाधव, अर्जुन मोहिते, लहू राठोड, राज जाधव, संदीप चव्हाण, कैलास मोहिते, रायमलजी (पुण्य नगरी), लासिराम राठोड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेऊन या कार्यक्रमाला यशस्वी केले. संपूर्ण परिसरात भक्तीमय आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले होते.

## अग्रलेख...

# चर्चा तर होणारच!

कोणत्याही गोष्टीच्या वाटचालीचे 'काळ' हे महत्त्वाचे माध्यम असते. म्हणजे असे की, जसजसा काळ पुढे सरकत जातो, तसतसे कोणत्याही एखाद्या गोष्टीच्या वाटचालीचे टप्पेही बदलत जातात. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी एका माध्यम समूहासोबतच्या मुलाखतीच्या कार्यक्रमात राजकारणाच्या अधोगतीचा मुद्दा अधोरेखित केला आणि राजकारणाचा स्तर घसरत चालल्याबद्दल चिंता व्यक्त केली. पण राजकारणाचा स्तर घसरत चालला किंवा राजकीय संस्कृतीची अधोगती होत आहे, हा काही त्यांनी नव्याने केलेला गौप्यस्फोट नसल्याने फडणवीस यांच्या त्या वक्तव्याचे आश्चर्य वाटावे किंवा धक्का बसावा, अशी स्थिती आज राहिलेली नाही. महाराष्ट्राच्या राजकारणास सुसंस्कृततेची परंपरा आहे. महाराष्ट्रातील राजकीय नेत्यांनी या राज्यात देशाला आदर्श वाटावी अशी राजकीय संस्कृती रुजविली आहे आणि त्यामध्ये व्यक्तिद्वेषाला थारा नाही, अशी वक्तव्ये गेल्या अनेक दशकांत अनेक राजकीय नेत्यांच्या मुखातून महाराष्ट्राने ऐकलेली आहेत. वैचारिक मतभेदांमुळे व्यक्तिगत स्नेहाला बाधा येत नाही, असेही अनेक जण वारंवार बोलत राहिले आहेत, पण या इतिहासावरही सातत्याने प्रश्नचिन्हेच उमटविली गेली. राजकारणाचा स्तर घसरत चालल्याबद्दल फडणवीस यांनी नव्याने व्यक्त केलेल्या जुन्याच चिंतेमुळे पुन्हा एकदा या प्रश्नाने नव्याने डोके वर काढले आहे, हीच या चर्चेची नव्याने समोर येणारी बाब ठरेल. कदाचित आता पुन्हा एकदा, राजकारणाच्या संस्कृतीचा इतिहास उगाळला जाईल. म्हणूनच महाराष्ट्राच्या राजकारणातील संस्कृतीच्या ऱ्हासाच्या काळासोबत घसरत गेलेल्या टप्प्यांचा मागोवा घेणे गरजेचे ठरते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुलाखतीदरम्यान राज्यातील घसरत्या राजकीय संस्कृतीचा संदर्भ स्पष्ट करताना २०१९ मधील विधानसभा निवडणुकीनंतर तत्कालीन शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दगाफटका करून पाठीत खंजीर खुपसल्याचा उल्लेख केला आहे. तेव्हापासून राजकारणाची संस्कृती बिघडली असे त्यांनी म्हटले असले, तरी बिघडलेल्या त्या संस्कृतीचे चटके त्याही आधीपासून खुद्द फडणवीस यांनीच सोसलेले आहेत. महाराष्ट्राने ते अनुभवले आहेत. २०१९ च्या निवडणुकीत जनतेने भाजपा-शिवसेना युतीला सत्तास्थापनेचा स्पष्ट कौल दिला आणि काँग्रेसप्रणीत आघाडीला सत्तेपासून रोखण्याचा स्पष्ट जनादेश दिला, तरीही उद्धव ठाकरे यांनी केवळ भाजपाला मुख्यमंत्रिपदापासून रोखण्यासाठी व फडणवीस यांच्या नेतृत्वाचे खच्चीकरण करून सत्ता संपादन करण्यासाठी काँग्रेसप्रणीत आघाडीसोबत जाण्याचा निर्णय घेतला, ही टोचणी फडणवीस यांच्या मनास खोलवर वेदना देत असते, हे लपून राहिलेले नाही. ठाकरे यांनी विश्वासघात केलाच; पाठीत खंजीरही खुपसला, या भावनेचा पुनरुच्चार ते करत असतात. ज्या राजकारणाच्या संस्कृतीचे गोडवे राष्ट्रवादी काँग्रेसचे तत्कालीन अध्यक्ष शरद पवार सातत्याने गात असतात, त्या शरद पवारांनीच उद्धव ठाकरे यांना त्या राजकीय कोलांटउडीसाठी प्रोत्साहन दिले होते, ही बाब महाराष्ट्रास ठाऊक आहे. उद्धव ठाकरे यांनी पाठीत खंजीर खुपसल्याची जी भावना देवेंद्र फडणवीस वारंवार बोलून दाखवितात, तो खंजीर पवार यांच्या प्रेरणेतूनच ठाकरे यांनी हाती घेतला असावा. कारण मुख्यमंत्रिपद आपल्याला मिळेल अशी आपली अपेक्षाच नव्हती; पवार यांनीच आग्रह केल्यामुळे हे पद आपल्या पदरात पडले, असे ठाकरे यांनी त्यानंतर अनेकदा जाहीरपणे सांगितले आहे. राजकारणाच्या इतिहासातील ज्या संस्कृतीचे गोडवे पवार आदी जुने नेते वारंवार गात होते, त्याच काळात पाठीत खंजीर खुपसण्याच्या राजकारणाचा जन्म झाला होता, हेही महाराष्ट्र जाणतो. त्यामुळे राजकारणाचा स्तर खालावत चालल्याची फडणवीस यांनी व्यक्त केलेली खंत गेल्या पाच-सहा वर्षांत जन्माला आलेली नाही, तर या प्रक्रियेचा जन्म कितीतरी दशकांपूर्वीच महाराष्ट्रात झाला आहे, याची नोंद घ्यावी लागेल. फडणवीस यांनी या मुद्याला नव्याने हात घातल्यामुळे यापुढे जेव्हा राजकारणाच्या पातळीची चर्चा होईल, तेव्हा हा इतिहास दुर्लक्षून चालणार नाही. राजकारणाचा घसरता स्तर, बिघडलेली संस्कृती, राजकारणाचे गुन्हेगारीकरण यांसोबतच राजकारणाचे टोळीकरण हे सारे टप्पे काळासोबत महाराष्ट्राने गेल्या काही दशकांत अनुभवले आहेत. महाराष्ट्राच्या राजकारणातील संस्कृतीचा उदोउदो जेव्हा ऐन बहराला आला होता, तेव्हा याच राज्याच्या राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाची चर्चा जोरात सुरू झाली होती. गुन्हेगारी विश्व आणि राजकीय नेत्यांचे संबंध या तेव्हा ऐरणीवर असलेल्या चर्चेच्या केंद्रस्थानी महाराष्ट्रातीलच काही प्रभावशाली राजकीय नेते होते, हा फार जुना भूतकाळ नाही. सुमारे पाच दशकांपूर्वी सन १९८० च्या दशकात, महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध तत्त्वज्ञ, विचारवंत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या, राज्यातील घसरत्या राजकीय संस्कृतीविषयी खंत व्यक्त करणाऱ्या सखोल चिंतनाचे दाखले आजही दिले जातात. याचा अर्थ, राजकारणाचा स्तर खालावत असल्याचा मुद्दा १९८० च्या दशकापासून किंवा त्याही अगोदरपासून महाराष्ट्राच्या चिंतेचा विषय ठरला आहे, हे स्पष्ट आहे. तसेही राजकारणाचा घसरलेला स्तर ही काही एकट्या महाराष्ट्राच्या राजकीय चिंतेची बाब राहिलेलीच नाही. एकूणच संपूर्ण राजकीय विश्वातच या चिंतेचे सावट पसरलेले असून राज्य, देशच नव्हे, तर जगातील जवळपास सर्वच देशांतील सामान्य जनता या चिंतेचे उसासे टाकत जुन्या राजकारणासोबत वर्तमानाची तुलना करताना आढळत असते. प्रसिद्ध समाजवादी विचारवंत एस. एम. जोशी हे महाराष्ट्रातील एक आदरणीय राजकीय नेते म्हणून ओळखले जातात. १९८४ मध्ये त्यांच्या ८२ व्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या चाहत्यांनी त्यांच्या सहस्रचंद्र दर्शन सोहळ्याचा घाट घातला. त्याचे औचित्य साधून एक गौरव ग्रंथही प्रसिद्ध करण्यात आला. त्या ग्रंथातच तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी राजकारणाच्या अधोगतीविषयी प्रकट चिंतन केले होते. राजकारणातच नव्हे, तर एकूणच संसदीय लोकशाही पद्धती अंतर्गत कार्यपद्धतीचीच अधोगती होत असल्याची खंत त्यांनी या लेखात मांडली होती. भारतामध्ये निवडणुकीनंतर एक पक्ष सत्तेवरून दूर झाला तर दुसरा सक्ष पर्यायी पक्ष सत्तेवर यावा, अशी परिस्थिती सध्या दिसत नाही. नजीकच् भविष्यातही ती उद्‌भवेल असे वाटत नाही, ही तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यां तेव्हाची भविष्यवाणी पुढे सातत्याने आठवावी, अशी राजकीय परिस्थिती सर्वत्र दिसत गेली; महाराष्ट्रही त्याला अपवाद राहिला नाही. २०१९ मध्ये उद्धव ठाक यांनी केलेली राजकीय कृती म्हणजे त्या भविष्यवाणीचेच पुढचे वास्तव ठरा त्याआधीच्या पाच वर्षांत, भाजपासोबत सत्तेत असूनही ठाकरे यांच्या पक्षा विरोधी पक्षाहूनही प्रखर अशी विरोधकांची भूमिका वठवून फडणवीस सरकार जेरीस आणले होते, तेव्हाही अनेकांस राजकारणाच्या अधोगतीचा विचार अस्वस करतच होता. राजकारणाच्या केंद्रस्थानी असलेल्या सत्तेचे आकर्षण विलक्ष प्रक्षोभक आहे. सगळ्या तऱ्हेच्या वासना आणि मोहांना चेतविणारे आहे. त्यामु पक्षापक्षांमध्ये अवांतर गट निर्माण होतात आणि ते एकमेकांचे पाय ओढू लागता आयाराम-गयाराम, दलबदलूंचे पीक त्यातूनच फोफावत जाते. ज्या पक्षाची स असते तेथे आयारामांची गर्दी वाढते आणि ज्या पक्षांची शक्ती क्षीण होते, ते गयाराम उत्पन्न होतात. यातूनच गुन्हेगारीकरण वाढते व ध्येयशून्य राजकारणा जन्म होतो, असे त्या लेखात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी म्हटले हो बुधवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्या मुलाखतीत राजकारणाच् अधोगतीची चिंता व्यक्त केली, तेव्हा तर्कतीर्थांनी चार दशकांपूर्वी व्यक्त केले विचार म्हणजे आजच्या राजकारणाविषयी वर्तविलेली भविष्यवाणीच होती, या खात्री पटल्याखेरीज राहात नाही. त्यामुळे राजकारणाची अधोगती ही काळासोब अधिकाधिक खालच्या स्तरावर सरकणारी एक शाश्वत प्रक्रिया आहे, हेच स्प झाले आहे. केवळ संस्कृतीचे आणि इतिहासाचे गोडवे गाऊन या प्रक्रिये पसरणारी पाळेमुळे रोखता येणार नाहीत, हेदेखील एव्हाना स्पष्ट झाले आ तरीही, चर्चा तर व्हायलाच हवी. ■


## प्रासंगिक

**अरुण म्हात्रे**

# गुलजार, द ग्रेट!

देशातच नव्हे तर जगात आपली ओळख निर्माण करणाऱ्या प्रख्यात कवी गुलजार यांना ज्ञानपीठ पुरस्कार प्रदान होणे ही त्यांच्याबरोबरच प्रत्येक चाहत्यासाठी, संगीतप्रेमीसाठी आनंदाची बाब आहे, असे मला वाटते. 'गुलजार' असे एकेरी संबोधनच त्यांच्यावरील अतीव आणि आंतरिक प्रेमाची साक्ष देण्यास पुरेसे आहे. हिंदी आणि उर्दूमध्ये कविता, गीते लिहिली असली, तरी त्याची मराठीशी घट्ट नाळ जोडलेली असणे, हीदेखील आपल्याला त्याच्याशी जोडणारी मोठी बाब म्हणता येईल. गुलजार कुसुमाग्रजांच्या कवितांचे भाषांतर करू शकला. तर, दुसरीकडे शांताबाईंनी त्याच्या 'त्रिवेणी'चे मराठीत भाषांतर केले. याचे त्याने तोंडभरून कौतुकही केले. एकमेकांबरोबर असणारे असे नाते फार देखणे असते. तो मराठी वाचतो. आपल्याला उर्दू ऐकवतो. या अर्थाने तो कायमच खूप मराठीमय वाटतो. या संदर्भात बोलायचे तर आपण सत्यदेव दुबे यांच्या पंक्तीत त्याचे नाव घेऊ शकतो. दुबे हिंदी असले तरी आयुष्य संपूर्ण मराठी नाट्यसृष्टीला वाहून घेतले होते, तसेच गुलजारचेही आहे. तो उर्दू वा हिंदीला मानतो तेवढेच मराठीलाही मानतो. किशोर कदम आणि गुलजार एकत्रितपणे हा सुंदर प्रयोग करतात.

माझ्याप्रमाणेच आपल्यापैकी प्रत्येकाचा त्याच्या गाण्यांशी अगदी जवळचा, जिव्हाळ्याचा संबंध आहे. चित्रपटांमधील त्याची गाणी अनेकांच्या हृदयाचा ठाव घेणारी, त्याच्याशी जोडून ठेवणारी आहेत. काही कार्यक्रमांच्या निमित्ताने मंचावर एकत्र आलो असता त्यांच्याशी संवाद साधण्याचे प्रसंगही मला लाभले. अर्थातच वैयक्तिकदृष्ट्या ती माझ्यासाठी फार मोठी बाब आहे. त्याच्या गाण्यांविषयी काय आणि किती बोलणार...! 'बंदिनी'मधील त्याचे पहिले गाणे कोण विसरु शकेल? 'मोरा गोरा अंग लैलै...' पासून त्याच्या गाण्यांनी रसिकांच्या मनाचा ठाव घेतला, तो सिलसिला अजूनही संपलेला नाही. 'इजाजत', 'मौसम', 'आंधी...' किती यादी देणार? अनेक गाणी आपल्या ओठांवर असून ती त्याची आहेत तितकीच आपल्या प्रत्येकाची आहेत. ती सहज ओठांवर येतात. हलकेच गुणगुणाविशी वाटतात. कवी म्हणून मला नेहमी वाटते की, गाणी लिहिणे ही एक कला आहे. यमके जुळवत काहींना ती जमते. बरेच गीतकार या पद्धतीने गाणी लिहितात. मात्र, गुलजार असे कधीच करत नाही.



त्याचे गाणे आशयाच्या अंगाने येते. त्याच्या कवितेत कृत्रिम गोष्टीदेखील जिवंत रूप घेऊन येतात. त्याच्या कवितेत रात्र ढळत नाही तर हातून निसटते. एखादा क्षण हातून हलकेच ओघळतो. त्याची कविता वाट बघणारी तिन्हीसांज दाखवते. काव्यशास्त्रामध्ये याला आम्ही 'व्यक्तिकरण' म्हणतो. ही बाब गुलजारला फार छान जमली आहे. म्हणूनच त्याच्या कवितेतील पाऊस आपल्याला जवळचा मित्र भेटावा तसा भेटतो. तो 'मेरा कोई सामान लौटा दो...' म्हणतो तेव्हा ते सामान आठवणी, भूतकाळातील घटना, सहवास या सगळ्यांचे गाठोडे असते. वस्तू, सामान, निसर्ग, आठवणी या सगळ्यांना व्यक्तिरूप देणारी, आपलेसे करणारी, अधिक जवळ आणणारी त्याची ही शैली फार देखणी आहे. म्हणूनच ती तुम्हा-आम्हा प्रत्येकाला आवडणारी आहे. याच हक्काने आपण त्याला एकेरी नावाने बोलवतो. शैलेंद्र, निदा फाजली, साहिर यांच्या श्रेणीत बसणारे हे एक जवळचे नाव आहे. खरे सांगायचे तर, कवितेच्या प्रांतातील आम्ही सगळेच साहिरनंतर आदराने पाहतो ते नाव म्हणजे गुलजार.

'मेरे अपने' नावाचा चित्रपट मला आठवतो. यात हाती काम नसणाऱ्या युवकांच्या प्रश्नाला हात घातला होता. त्या काळात भारतभर बेरोजगार युवकांच्या चळवळी सुरू झाल्या होत्या. नोकरीसाठी तरुण वाट मिळेल तिथे पळत होते. या सगळ्याचे चित्रीकरण यात अगदी नेमकेपणाने दिसते. ही शिकलेली तरुण मुले हाती काम नसल्यामुळे गुंडगिरीकडे कशी वळतात, त्यांचे गट कसे होतात, ते कसे गुन्हेगारी करू लागतात हे प्रभावीपणे सांगण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. गुलजारची ग्रेट गोष्ट म्हणजे त्याने हे सगळे प्रत्यक्ष सुरू होते, त्याच काळात एका कथानकातून विषय रुपेरी पडद्यावर आणला. आपल्याकडे 'अधांतर' नावाचे नाटक जवळपास याच विषयावर बेतलेले आहे. पण ते रंगमंचावर यायला जवळपास २० वर्षे लागली. जयंत पवार यांनी ते लिहिले आणि गिरणी कामगारांचा प्रश्न मंचावर आणला. पण 'मेरे अपने' हा चित्रपट त्याच्या किती तरी आधी गुलजारने पडद्यावर आणला होता. यातील एक वृद्धा या तरुणांना सांभाळते आणि सन्मार्गी आणण्याचा प्रयत्न करते. पुढे 'अंकुश'मध्ये याच प्रश्नाला हात घालण्यात आला, पण गुलजारने त्याआधीच हाताला काम नसणाऱ्या युवकांच्या समस्येला तोंड फोडले. कोणीतरी आपल्याला आपले म्हणावे, ही या तरुणांच्या मनातील भावना त्याने शब्दांवाटे मांडली. गुलजारने अशा अनेक मानवी भावनांना वाट मोकळी करून दिली.

'सब कुछ ठीकठाक है...' हे त्याचे गाणेही असेच लक्षात राहिले आहे. खरे तर परिस्थिती अगदीच विपरीत असते. काहीच नीट नसते. आयुष्य भरकटलेले असते. तरीही चित्रपटातील तरुण 'सब कुछ ठीकठाक है' म्हणतात तेव्हा एक प्रकारे परिस्थितीवर प्रहार होतो, नैराश्य व्यक्त होते आणि हे सगळे उपहासात्मक शैलीत होते. म्हणजेच कधी गुलजार पराकोटीच्या तरल शैलीत लिहिताना दिसतो तर दुसरीकडे तो असेही काही लिहून जातो. तो 'आंधी'मधील गाणी लिहितो आणि तोच नंतर 'बिडी जलै ले..' लिहितो. ही रेंज अफलातून आहे. खरेच तो अस्सल मुंबईकर झाला आहे. मुंबईचे सगळे वातावरण त्याच्या रक्तात मिसळून घेतल्यामुळे तो करतो ते सामान्य माणसाला जवळचे वाटते.

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे गुलजारने एस. डी. बर्मन, सलील चौधरी, लक्ष्मीकांत-प्यारेलाल, आर. डी. बर्मन, मदनमोहन ते अगदी ए. आर. रेहमान यांच्याबरोबरही काम केले आहे. ही रेंज असामान्य म्हणावी लागेल. कवी म्हणून गुलजारचा हा गुण मला अत्यंत मोलाचा वाटतो. गाणी लिहिताना संगीतकारांशी संबंध येतो तेव्हा प्रत्येकाची निकड वेगळी असते. प्रत्येक संगीतकार गाण्याचे वेगळे मीटर सांगत असतो. त्याला कसे गाणे हवे आहे, ते स्पष्ट करत असतो. सगळ्याच कवींना प्रत्येकाला हवे तसे गाणे देणे शक्य होत नाही. आपण 'तेथे पाहिजे जातीचे...' म्हणतो; तसे येथे असते. या धर्तीवर पाहता गुलजार सांगाल ते सगळे देणारा माणूस आहे, असे मला वाटतो. तो कोणत्याही मीटरमध्ये लिहू शकतो. आजही मी 'मिली' वा 'घर'मधील गाणी ऐकतो तेव्हा तो किती आपल्या मानसिकतेशी जोडलेला आहे, हे समजते. त्याची प्रत्येक ओळ आपल्या मनाने कधी ना कधी अनुभवलेली असते. म्हणूनच त्याची गाणी जाणकारांबरोबर सर्वसामान्यांनाही आवडतात. अभिजात, समीक्षक वर्गाला त्याचे काव्य आवडते, तसेच सामान्यातील सामान्यही त्याचा आस्वाद घेऊ शकतो. या कसोटीवर उतरत असल्यामुळेच गुलजार ग्रेट ठरतो. ■

(लेखक प्रसिद्ध कवी आहेत)

## वेध

**रेवती जोशी-अंधारे**

# अकरावी प्रवेशाचा फार्स!

ठरावीक निर्णय आणि प्रक्रिया पूर्वनियोजित असल्यामुळे त्या सुरळीतच व्हाय हव्यात, ही अपेक्षा करणं चुकीचं आहे का? हा प्रश्न अशासाठी की, गे कित्येक वर्षे दहावी बोर्डाच्या परीक्षेचे निकाल जाहीर होतात आणि म अकरावीच्या प्रवेशाला सुरुवात होते. पण, गेल्या किमान तीन दशकांमध्ये आप कनिष्ठ महाविद्यालयातील प्रवेशासाठी एक फूलप्रूफ, अचूक व्यवस्था लावू शक नाही. एखाद्या वर्षी गोंधळ झाला तर समजता येईलही; पण किमान १५ ला विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची प्रक्रिया म्हणजे दरवर्षीचा फार्स झाला आहे. त्रस्त पालक आ गोंधळलेल्या विद्यार्थ्यांच्या रांगा हे चित्र दरवर्षी थोड्याफार फरकाने बघायला मिळतं

गेली काही वर्षे नागपूरसह मुंबई, पुणे, छत्रपती संभाजी नगर अशा मोठ् शहरांमध्येच अकरावीची केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया होती. यावर्षी संपू राज्यामध्ये शहरी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे प्रवेश याच प्रक्रियेतून हो आहेत. अर्ज भरण्याच्या पहिल्याच दिवशी संकेतस्थळ बंद पडले, लॉग इन होऊ शक नाही आणि एकूणच यंत्रणेचा फज्जा उडाला. राज्यस्तरीय ऑनलाईन केंद्रिभूत प्रवे प्रक्रियेमुळे सर्व विद्यार्थ्यांना समान संधी, प्रवेश प्रक्रियेदरम्यान होणाऱ्या गैरव्यवहारा आळा, कनिष्ठ महाविद्यालयाच्या क्षमतेनुसार प्रवेश आणि अवाजवी शुल आकारणीला निर्बंध, ही 'ऑन पेपर' उद्दिष्टं ठेवून केलेल्या या सुरुवातीची व्यवहा अंमलबजावणी शक्य होत नसल्याचे मान्य करावे लागेल. दरवर्षी प्रवेश प्रक्रिया लांब असल्याने अकरावीचे वर्ग सुरू होण्यास अनेकदा सप्टेंबर उगवतो. आता विद्या संख्या सहा पटींनी वाढली. राज्यभरात दहावीच्या परीक्षेला साधारणपणे १५ ते १ लाख विद्यार्थी बसतात. त्यापैकी जवळपास १४ लाख उत्तीर्ण होतात आणि अकराव वर्गात प्रवेश घेण्यासाठी प्रयत्न सुरू करतात. ऑनलाईन अर्ज नोंदणी सुरू झाल्याव १४ लाखांपैकी बहुतांश विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्यासाठी संकेतस्थळावर लॉग-इन के एकाच वेळी इतक्या मोठ्या प्रमाणात लॉग-इनचा परिणाम यंत्रणा कोलमडण्या झाला. हा तांत्रिक बिघाड दुरुस्त करण्यासाठीचा वेळ लक्षात घेऊन प्रवेश प्रक्रिया पुढकलण्यात आली. शहरी भागात सर्वच विद्यार्थ्यांना नामांकित कनिष महाविद्यालयांमध्येच प्रवेश हवा असतो. त्यासाठी विद्यार्थी पुढच्या फेरीसाठी वाट बघ राहतात आणि प्रक्रिया लांबत राहते. विद्यार्थी मिळेल त्या महाविद्यालयात प्रवेश घेऊ मोकळे होतात. वास्तविक या महाविद्यालयांमध्ये ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया करण्या फारशी गरज नसते; पण करायचेच असेल तर त्यांना चांगल्या आणि समान पायाभू सुविधा देण्यासाठी खटाटोप करायलाच हवा. इंटरनेट घरोघरी पोहोचलेलं असलं, त ऑनलाईन फॉर्म भरताना, किती साईझचा फोटो, इतर कागदपत्रांच्या व्यवस्थित स्कॅ केलेल्या इमेजेस आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे विषयांची अचूक निवड करण्यासा मुलांना मार्गदर्शन करायला कोणी नसतं. याचा फायदा घेऊन, सायबर कॅफेतील 'तज्ञ पालकांना लुबाडायला तयारच असतात. शहरी भागात सगळ्या सोयीसुवि असतानाही पालक-बालकांना इतका मनस्ताप होत असेल तर ग्रामीण भागाती मुलांविषयी बोलायलाच नको. हे सरकारी यंत्रणेचं अपयश आहे. बरं, इतकी झटाप करूनही ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतील गोंधळ सुरू राहिल्यास, ग्रामीण भागाती विद्यार्थ्यांचे जीव आणि वर्ष दोन्ही टांगणीला लागतं.

या सगळ्या प्रक्रियेत महत्त्वाचे आहेत विषय किंवा ब्रॅन्च! मोठमोठ्या शिक्ष संस्थांच्या आणि शिक्षण मंडळाने नेमून दिलेल्या अभ्यासक्रमांच्या समांतर चालणा व्यवस्था शिकवणी किंवा कोचिंग क्लासेसची आहे. कोचिंग क्लासेस आ महाविद्यालयांचा 'मिलाफ' सर्वज्ञात आहे. प्रवेशाची प्रक्रिया पूर्ण करण्या जबाबदारीसुद्धा कोचिंग क्लासचे प्रोफेशनल्स घेतात. मग, अकरावी आणि बारा अशी दोन वर्षे विद्यार्थी महाविद्यालयाकडे फिरकतसुद्धा नाही. प्रॅक्टिकल्स किं तत्सम एखाद्या परीक्षेसाठी जायचे असेल तर गोष्ट निराळी! पण, कोचिंग क्लासेसम मात्र या मुलांची उपस्थिती आवश्यक असते. ही सुविधा केवळ विज्ञान आणि वाणिज शाखेत प्रवेश घेणाऱ्यांसाठी आहे. कला शाखेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मा महाविद्यालयात जाण्याला पर्याय नाही. कोचिंग क्लासेसमध्ये भरभक्कम शुल्क देण्या सक्षम पालकांच्या पाल्याला टक्के कमी असले तरी चालतात. 'सब घोडे बारा टके' न्याय तिथे लागतो. हे कडू असलं तरी हेच व्यवहारातील सत्य आहे. प्रवेश प्रक्रियेती या गोंधळातून निष्पन्न होतच नाही आणि होणारही नाही. इतका सगळा द्रावि प्राणायाम होऊनही महाविद्यालयांमध्ये जागा रिकाम्या राहतात आणि दुसरीक विद्यार्थी महाविद्यालयीन प्रवेशापासून वंचित राहतात. हे व्यस्त प्रमाण कसं साधायच हा व्यवस्थेपुढचा प्रश्न आहे. शिक्षण व्यवस्था उभी करणं म्हणजे भरमसा महाविद्यालयांना शेकडो जागांची परवानगी देणं नाही तर असलेल्या व्यवस्थेम दर्जात्मक सुधारणा करणं आहे, हे आपण लक्षात घेऊ तेव्हाच बदल होतील. तोपर्य या सगळ्या 'देण्याघेण्या'च्या व्यवहारात शिक्षण होरपळत राहणार आहे. ■

९८५०३३९२४

## दखल

**मोरेश्वर बडगे**

# भाजपाचे स्वबळाचे संकेत?

भाजपाचे चाणक्य आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह नुकतेच महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येऊन गेले. या दौऱ्यानंतर राजकारण तापलं आहे. तसे पाहिले तर आता मोठ्या निवडणुका नाहीत. व्हायच्या आहेत त्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत. त्या साडेचार वर्षांपासून रखडल्या आहेत. वेगवेगळ्या कारणाने लोक न्यायालयात गेले आणि निवडणुका रखडल्या. मुंबई महापालिकेवर तीन वर्षांपासून प्रशासक आहे. तब्बल २९ महापालिका, ३४ जिल्हा परिषदा, ३३६ पंचायत समित्या, २४८ नगर परिषदा तसेच ४१ नगर पंचायत... इथे काही वर्षांपासून निवडणुका झाल्या नाहीत. कुठे ओबीसी आरक्षण तर कुठे प्रभाग रचना मुद्यावर न्यायालयात आव्हान दिल्यामुळे या निवडणुका होऊ शकल्या नाहीत. सर्वोच्च न्यायालयापुढे हा विषय आला तेव्हा न्यायालयही हादरले असणार. येत्या चार महिन्यात निवडणुका घ्या, असा आदेशच या न्यायालयाने दिला. त्यानंतर धावपळ सुरू झाली आहे. राज्य निवडणूक आयोग, राज्य सरकार आणि तमाम राजकीय पक्ष या साऱ्यांची दमछाक सुरू आहे. इतक्या निवडणुका घ्यायच्या म्हणजे मोठी सर्कस. मिनी विधानसभाच म्हणायची. दिवाळीच्या मागेपुढे या निवडणुका होतील, असा अंदाज आहे. काय होणार या मिनी विधानसभा निवडणुकीत? या निवडणुका महायुती म्हणूनच लढल्या जातील असे कालपर्यंत बोलले जात होते. मात्र, या निवडणुका आणि खासकरून मुंबईच्या निवडणुका भाजपा स्वबळावर लढेल, असे संकेत अमित शाह यांच्या ताज्या भेटीत मिळाल्याची जोरदार चर्चा आहे. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे बंधू एकत्रितपणे या निवडणुका लढवणार आहेत का? हे दोन भाऊ एकत्र आले तर किमान मुंबई महापालिका निवडणुकीत चमत्कार करू शकतात, असे मानले जाते. पण ते एकत्र येतील का? ज्या कारणाने ते एकमेकांपासून दूर गेले त्याच कारणाने ते एकत्र येणे अवघड आहे. मात्र, मीडियाला चघळायला हा विषय सोपा आहे. एक मात्र नक्की, लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत शरद पवारांनी फुंकलेली महाविकास आघाडी नावाची गाजराची पुंगी यावेळी वाजणार नाही. आघाडीच्या नेत्यांनी मागेच ती मोडून खाल्ली आहे.

महापालिका निवडणुका भाजपासाठी यावेळी महत्त्वाच्या झाल्या आहेत. त्याला कारणही तसेच आहे. भाजपाला कुठल्याही परिस्थितीत मुंबई महापालिकेची निवडणूक जिंकायची आहे. एकूण २२७ वार्डांची मुंबई



महापालिका तब्बल २६ वर्षे शिवसेनेच्या हातात राहिली आहे. त्या जोरावर शिवसेना दादागिरी करत आली. मुंबई महापालिकेची शेवटची निवडणूक गेल्या वेळी २०१७ साली झाली, त्यावेळी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होते. राज्यात युतीचे सरकार होते. मात्र त्यावेळी शिवसेना आणि भाजपा वेगवेगळे लढले होते. भाजपाला ८२ जिंकता आल्या तर शिवसेनेने त्याच्या दोन जागा जास्त म्हणजे ८४ जागा जिंकल्या. त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना 'जुगाड' करून मुंबई महापालिकेत सत्ता मिळवता आली असती. मात्र फडणवीसांनी उद्धव ठाकरेंना झुकते माप दिले. भाजपाला पुढे ते महागात पडलं. आठ वर्षांत पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. खूप काही बदलले आहे. ठाकरेंच्या शिवसेनेचीही तूटफूट झाली आहे. भाजपा या आपल्या सच्च्या मित्राला सोडून शरद पवारांची संगत करणाऱ्या उद्धव ठाकरे यांना त्यांच्याच आमदारांनी शिक्षा केली. मोठे बंड झाले. सरकार पडले. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले. ठाकरे यांच्या हातून सत्ता गेली, पक्ष गेला, निवडणूक चिन्ह गेले. तरीही त्यांची मस्ती जिरली नाही. 'वडिलांचा पक्ष चोरला' म्हणून उद्धव ठाकरे अजूनही 'हाय तोबा' करीत असतात. उद्धव आणि त्यांची सेना तसे पाहिले तर संपल्यात जमा आहे. धुगधुगी बाकी आहे. मुंबई महापालिका हिसकली तर उबाठा पूर्ण संपते. त्यामुळेच फडणवीसांनी जोरदार चक्रव्यूह रचला आहे. मात्र शिवसेनेचे सुप्रीमो आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईसाठी वेगळी तयारी सुरू केल्याने वेगळाच पेचप्रसंग उभा राहू शकतो. शिंदे यांनी ठाकरेंचे तब्बल ५० पेक्षा माजी नगरसेवक फोडले आहेत. आता त्यांनी भाजपाकडे १०७ जागांवर दावा सांगितला आहे. निम्म्या जागा शिंदेसेनेला सोडल्या तर उद्या ते महापौरपदावर दावा ठोकू शकतात. भाजपाला तर यावेळी कुठल्याही परिस्थितीत मुंबईवर आपला महापौर बसवायचा आहे. भाजपा आणि फडणवीस यावेळी तडजोड करण्याच्या मानसिकतेत नाहीत. त्यामुळे मुंबईच्या जागावाटपावर संघर्ष होऊ शकतो. मुंबईपुरत्या काही जागी 'मैत्रीच्या लढती' घेऊन मार्ग मोकळा केला जाऊ शकतो. २०२९ सालची निवडणूक भाजपाला पूर्णपणे स्वबळावर लढायची आहे. शत-प्रतिशत भाजपा त्याचे ट्रेलर म्हणून भाजपा या महापालिका निवडणुकांकडे पाहत आहे. स्वबळाची चाचणी करायला भाजपाने सांगितले त्यामागे तोच हेतू आहे. मुंबईमध्ये मराठी टक्का घटला, अशी ओरड नेहमीच कानावर येते. मुंबईमध्ये फक्त १८ टक्के मराठी मतदार उरले आहेत, असे सांगितले जाते. मात्र काहींच्या मते, आजही मुंबईमध्ये ३७ टक्के मराठी मतं आहेत. १९ टक्के मुस्लिम मतदार आहे. १७ टक्के उत्तर भारतीय तर १५ टक्के मारवाडी, जैन आदी हिंदी भाषी आहेत. ही १९ टक्के मुस्लिम मतं कशी वळतात, त्यावर मुंबईचा निकाल वळू शकतो. उद्धव ठाकरे या 'हिरव्या' मतां'वरच ठाकूरकी दाखवत आहेत, हे विसरता येत नाही. अमित शाह यातून कसा मार्ग काढतात ते पाहायचे. कारण शिंदे यांना गमावणे भाजपाला परवडणार नाही. त्यामुळे शेवटपर्यंत ताणून धरले जाईल. महायुती मैदानात दिसेल का? ते शेवटच्या टप्प्यात दिसेल. महापालिका निवडणुकीत मतदारसंघ फार मोठे नसतात. लहानशीही लाट चालली तर निकाल फिरतो. यावेळीही ती शक्यता नाकारता येत नाही. बंडखोर मोठ्या संख्येने मैदानात दिसतील.

मुंबई, ठाणे आणि पुणे या तीन महापालिका 'सोन्याच्या कोंबड्या' आहेत. मुंबईत अजितदादांच्या राष्ट्रवादीची फारशी ताकद नाही. मात्र पुण्यात आहे. एकनाथ शिंदे यांचा ठाण्यात जोर आहे. मात्र यावेळी भाजपामधूनही ठाण्यासाठी आवाज निघू लागला आहे. उद्धव ठाकरे यांची पूर्वीसारखी हवा आता राहिलेली नाही. तरीही ठाकरेसेनेला गृहीत धरता येणार नाही. ठाकरे बंधू एकत्र आले तर ते 'गेमचेंजर' ठरू शकते. मात्र, हे दोघे भाऊ एकत्र येण्याची शक्यता अंधुक आहे. फक्त मीडियामध्ये चर्चा आहे. पण त्या भावांची कुठे इच्छा आहे? 'ठाकरे ब्रँड' संपणार नाही, असा दावा नुकताच केला गेला. तो संपला की नाही संपला ते महापालिका निवडणूक निकालच सांगू शकेल. काश्मिरातील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २६ पर्यटक मारले गेले. मोदी सरकारने त्याचा बदला घेतला; त्या घटनेला बरेच दिवस लोटले. मात्र 'ऑपरेशन सिंदूर'ने निर्माण झालेले देशभक्तीचे वातावरण अजून मिटलेले नाही. या हवेचा भाजपा कसा फायदा उठवतो ते पाहायचे. ■

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

### पाकिस्तानातील स्थैर्याची चिंता

भारताने सिंधू नदीचा पाणी करार स्थगित करण्याची घोषणा केल्यावर काही जणांकडून मानवतावादी सूर उमटू लागला की शेजारील राष्ट्रात स्थैर्य असणे हे भारताच्याही हिताचे आहे वगैरे. पाण्याअभावी पाकिस्तानात जर उपासमार होऊ लागली तर त्यामुळे जो उद्रेक होईल त्याची झळ भारतालादेखील सोसावी लागेल असा एकूण हा विचार आहे. भारताने नुकताच पाकिस्तानला मार दिला. पण त्याचा काय परिणाम झाला? तिथे विजयोत्सव साजरा करून हारलेल्या जनरलची पदोन्नती करून त्याला फिल्ड मार्शल हे सर्वोच्च सन्मानाचे पद बहाल करण्यात आले. आता त्यांच्याकडे अधिक प्रभावी डिफेन्स सिस्टिम व मिसाईल खरेदी करण्याच्या गोष्टी त्यांचे विश्लेषक करीत आहेत. अजूनही त्यांना हे भान आलेले दिसत नाही की आपला देश कर्जबाजारी झालेला असताना भारतद्वेष थांबवून अंतर्गत आर्थिक सुधारणा करण्यावर भर दिला पाहिजे. गरीब राहू, मार खाऊ, पण भारतात कारवाया करतच राहू हे त्यांचे धोरण आहे. त्यामुळे पाकिस्तान गरीब राहिला तरी वैर करतच राहणार आणि आपण दयाळूपणे पाणी देत राहिलो तरी त्यातून निर्माण होणारा पैसा वापरून उलट आणखी कुरापती वाढवणार. त्यामुळे अधूनमधून पाकिस्तानची खुमखुमी जिरवतच राहावे लागेल. म्हणूनच आपण पाकिस्तानला पाणी देत राहून त्यांच्याकडील स्थैर्याची चिंता करण्याचे काही कारण नाही.

**रवींद्र पंडित**/ ८४२४९८४३५०

●● ●●

### नदीजोड प्रकल्पात वाशीम जिल्ह्याचा समावेश करा

महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनेत नदीजोड प्रकल्प ही एक प्रमुख योजना आहे. या प्रकल्पांतर्गत विदर्भातील वैनगंगा, नळगंगा पैनगंगा या नद्या जोडून विदर्भातील नागपूर, अमरावती, यवतमाळ, वर्धा, अकोला, बुलढाणा, वाशीम या जिल्ह्यातील लाखो हेक्टर जमीन सिंचनाखाली येत आहे. त्याचप्रमाणे पिण्याच्या पाण्याचा महत्त्वाचा प्रश्न या प्रकल्पामुळे निकाली निघणार आहे. याशिवाय या प्रकल्पामुळे निरनिराळे उद्योग उभारून रोजगाराचा प्रश्न पण सुटत आहे. त्यामुळे या

## वाचक पत्रे

जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये, युवकांमध्ये एक सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली आहे. प्रत्येक जण या प्रकल्पाचे कालवे कसे कसे जातील याचे मनामध्ये आराखडे बांधत आहे. महत्त्वाचे म्हणजे या प्रकल्पाचे काम युद्धपातळीवर सुरू होत आहे. परंतु विदर्भातील इतर जिल्ह्यांप्रमाणे वाशीम जिल्ह्याला तेवढे झुकते माप दिसत नाही. कारण या प्रकल्पामध्ये वाशीम जिल्ह्याचा नंतर समावेश झाला आहे असे वाचण्यात आले. वास्तविक पाहता वाशीम जिल्ह्यामध्ये पैनगंगा ही प्रमुख नदी आहे. या नदीचा उगम अजिंठा डोंगरांमध्ये उगम होऊन ती मेहकर तालुक्यातून वाशीम जिल्ह्यात प्रवेश करताना पश्चिम पूर्व अशी वाहते व या नदीच्या उत्तर आणि दक्षिण या दोन्ही दिशेला शेतकऱ्याची लाखो हेक्टर जमीन आहे. विशेष म्हणजे यामध्ये प्रामुख्याने वाशीम जिल्ह्यातील संपूर्ण रिसोड तालुक्याचा समावेश होतो. या तालुक्यातील जवळपास १०० लहान-मोठ्या खेड्यांचा समावेश होतो आणि प्रत्येक खेड्याला छोट्या मोठ्या नद्या आहेत. परंतु या नद्यांना पावसाळ्याशिवाय इतर ऋतूत पाणीच राहत नाही. तेव्हा या प्रकल्पाचे काम सुरू होताना स्थानिक लोकप्रतिनिधी व इतर शेतकऱ्यांनी यामध्ये लक्ष घालून संपूर्ण वाशीम जिल्ह्याला या नदीजोड प्रकल्पाचा कसा फायदा होईल हे शासनाच्या निदर्शनास आणून द्यावे, जेणेकरून संपूर्ण वाशीम जिल्हा या प्रकल्पामुळे सुजलाम् सुफलाम् होईल.

**धनंजय पांडे**/९४०४९१७८४७

●● ●●


### मंदिरे श्रद्धेसोबत विकासाचेही केंद्रे

मंदिर हा शब्द उच्चारला तरीही मनाला शांतता, स्थिरता आणि आनंदाची अनुभूती प्राप्त होते. मंदिरे केवळ मनःशांती देत नाही तर जीवन सकारात्मकतेने जगण्यासाठी ऊर्जा देतात. तसेच समाज आणि राष्ट्राच्या विकासात आणि संकटात महत्त्वाची भूमिका बजावतात. याची अनेक उदाहरणे देता येतील. परंतु आज श्री काशी विश्वनाथ मंदिराविषयी बघू. श्री काशी विश्वनाथ मंदिरात २४ वर्षांत १२ पट भाविकांची संधख्या वाढली आणि तेथील संपत्तीचा स्रोतसुद्धा चारपट वाढला. हे धन समाजोपयोगी कार्यात वापरण्यात आले. उदाहरणार्थ सात नवीन उड्डाणपूल, तीन रिंगरोड, दो चारपदरी रस्त्यांची निर्मिती करण्यात आली. त्यामुळे काशीस आजूबाजूचे जिल्हे व अन्य राज्यांशी संपर्क सुलभ झाल शहरातही नवीन उड्डाणपूल बांधण्यात आले. त्यामु दळणवळणाच्या अडचणी दूर झाल्या. २४ वर्षांपूर्वीच्या काशीत आणि आताच्या काशीत हायटेक बदल झालेला आ पूर्वी जिथे केवळ सामान्य आजारांवर उपचार होत होते, ति आज सीटी स्कॅन, एमआरआयसारख्या सुविधा उपलब्ध झाल्य आहेत. रुग्णांना फिरावे लागत नाही. सांगण्याचे तात्पर्य हे की, आज तेथे औद्योगीकरण, दळणवळण आणि आरोग्यसे यामध्ये आमूलाग्र बदल झाला आहे. आज काशीची ओळ केवळ धार्मिक नगरी म्हणून राहिलेली नाही. इथे लक्षा घेण्याचा मुद्दा हा की, तिथे झालेल्या आमूलाग्र परिवर्तना लागणारे धन मंदिराच्या दानपेटीतील होते. हे केवळ एव मंदिराचे उदाहरण आहे. इतर ठिकाणीही अशा प्रकारचे प्रयत होत असतात. त्यामुळे मंदिरामुळे केवळ श्रद्धा नव्हे, त देशाच्या अर्थव्यवस्थेलाही चालना मिळते आणि मंदिरां देशाच्या विकासात मोठा वाटा आहे, हे सिद्ध होते. ■

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# बिंदुसरा प्रकल्प १०० टक्के क्षमतेने पूर्ण भरला



बीड :- मागील काही दिवसाच्या पावसाने मे महिन्यातच पाली येथील बिंदुसरा धरण भरले असून छोट्या चादरीवरून वाहू लागले आहे. (छाया-कृष्णा शिंदे)

# जिल्हा परिषद अभियंता संवर्गाची गुणवत्ता विकास कार्यक्रम कार्यशाळा संपन्न

## गुणवत्तापूर्ण कामातून अभियंते जिल्हा परिषदेची विश्वासहर्ता निर्माण करणार-वासुदेव सोळंके

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० मे**

या कार्यशाळेच्या माध्यमातून अभियंत्यामध्ये तांत्रिक गुणवत्ता वाढी बरोबरच ग्रामीण भागातील दर्जेदार पायाभूत सुविधा निर्माण करण्यास चालना मिळणार आदित्य जीवने, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड ग्रामीण विकासास सहाय्यभूत ठरणारी अभियंत्यांची महाराष्ट्रातील प्रथम कार्यशाळा बीड जिल्हा परिषदेमध्ये संपन्न झाल्याने गुणवत्तापूर्ण कामे होणार वासुदेव सोळंके, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

मुख्यमंत्री - देवेंद्रजी फडणवीस यांनी यशदा पुणे येथे २६ एप्रिल २०२५ रोजीच्या ग्रामविकास विभागाने आयोजित केलेल्या कार्यशाळेत जिल्हा परिषदेकडून गुणवत्तापूर्ण व गतीने कामे संदर्भात निर्देश दिले.

मंत्री ग्राम विकास जयकुमार गोरे यांनी यशदा येथील कार्यशाळेत जिल्हा परिषडकांडून लोकाभिमुख, सुकर व गतिमान कामे करण्याचे निर्देश दिले.उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड जिल्हा अजित पवार यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये कामाची गुणवत्ता राखण्या करीता सक्त सूचना दिलेल्या आहेत त्यामुळे आजची कार्यशाळा महत्वपूर्ण ठरली.

यशदा, पुणे येथे मुख्य कार्यकारी अधिकारी,अति.मुख्य कार्यकारी अधिकारी व प्रकल्प संचालक यांची दि.२७,२८ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या कार्यशाळेत मा.मुख्यमंत्री यांनी जिल्हा परिषद अंतर्गत विविध विकास कामांमध्ये दर्जा वाढ आणि गुणवत्ता विकास राखण्यासाठी सुचना दिल्या होत्या.

ग्रामविकास मंत्री यांनी जिल्हा परिषदेकडून गतीने व गुणवत्तापूर्वक कामे व्हावे यासाठीच्या सुचनेसह अपेक्षा व्यक्त केल्या.प्रधान सचिव,ग्रामविकास विभाग यांनी गतिमान प्रशासन व गुणवत्तापूर्वक कामे होण्याच्या अनुषंगाने अधिकाऱ्यांसोबत चर्चात्मक मार्गदर्शन केले.त्याअनुषंगाने दि.२९.०५.२०२५ रोजी जिल्हा परिषद,बीड येथे अभियंता संवर्ग



गुणवत्ता विकास प्रशिक्षण आयोजित करण्यात आले.ज्यामध्ये एकनाथ डवले, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी त.उ. द्वारे उद्घाटनपर मार्गदर्शन केले.उद्घाटन झाल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी व अति.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व अभियंत्यांना जिल्हा परिषद अंतर्गत विविध विकास कामांमध्ये दर्जा वाढ आणि गुणवत्ता विकास राखण्यासाठी मार्गदर्शन केले.सदरील प्रशिक्षणामध्ये १.गुणवत्ता नियमावली व तपासणी २. योग्य स्थळ निश्चिती (जागेची निवड) ३.नियोजन आराखडा ४. तंत्रज्ञाचा प्रभावी वापर ५. अभिलेख्याची योग्य मांडणी, जतन व ई- ऑफिस ६. कामाच्या प्रशासकीय प्रक्रियांचे सुलभीकरण ७. वित्त व लेखा विषयक बाबी इ चा समावेश होता. सदरील प्रशिक्षण स.१० ते रा.७ पर्यंत पार पडले. सदरील प्रशिक्षण श्री रणखांब ( राज्य गुणवत्ता निरीक्षक) यांनी तांत्रिक मार्गदर्शन केले. प्रशिक्षण पार पडल्यानंतर सर्व अभियंत्यांची छोटी परीक्षा घेण्यात आली त्यातील उच्चतम गुण मिलेलेल्या अभियंत्यांचा सन्मान करण्यात आला. सर्व उपअभियंता(बां) यांनी अनुभव कथन व चांगल्या कामांचे सादरीकरण सादरीकरण केले. त्यामध्ये पाटोदा उप अभियंता श्री. अण्णासाहेब येवले यांनी उत्कृष्ट सादरीकरणाचा बहुमान मिळवला. शेवटी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल जि.प. अभियंता संघटनेने मुख्य कार्यकारी अधिकारी व अति.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा सत्कार करून आभार मानले. सदरील प्रशिक्षण यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी प्रवीण मिसाळ, बालासाहेब डांगे व सचिन बेद्रे व श्रीकांत देशमुख यांनी नियोजन केले.प्रवीण मिसाळ शाखा अभियंता तथा सचिव जिल्हा परिषद अभियंता संघटना - महाराष्ट्रात प्रथमच जिल्हा परिषदेच्या वतीने अशा प्रकारच्या उच्चतम कार्यशाचे आयोजिन करण्यात आले व या कार्यशाळेच्या माध्यमातून तांत्रिक क्षमतेमध्ये वृद्धी होण्यास नक्कीच मदत होणार आहे. आम्ही गुणवत्तापूर्ण कामे करण्यासाठी कटिबद्ध राहू.

महत्वाचे मुद्दे

१.QR Ûmao online नोंदणी. २. कामकाजमध्ये तंत्रज्ञानाचा वापर व ई-ऑफिस प्रणाली

३. QR Ûmao online परीक्षा.

४. गुणवत्ता चाचणीचे प्रात्यक्षिके

५. उत्कृष्ट सादरीकरणाचा सन्मान. ६. जिल्हा परिषद अभियंत्यांची महाराष्ट्रातील प्रथम कार्यशाळा.

# आ.संदीप क्षीरसागरांच्या हस्ते बिंदुसरा धरणात जलपूजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० मे**

बीड तालुक्यातील पाली येथे असलेला बिंदुसरा धरण प्रकल्प मान्सुनपूर्व पावसानेच १०० टक्के क्षमतेने भरला असून आ.संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि.३०) रोजी बिंदुसरा धरणात जलपूजन करण्यात आले.



मागील काही दिवसांपासून होत असलेल्या सततच्या मान्सूनपूर्व पावसाने बीड शहराला लागून असलेल्या पाली येथील बिंदुसरा धरणात १०० टक्के पाणीसाठा झाला आहे. धरण पूर्ण क्षमतेने भरले असून पाणी ओसंडून वाहत आहे. पावसाळ्यापूर्वीच धरण पूर्ण क्षमतेने भरले असल्याने नागरिक आणि शेतकर्यांमधून समाधान व्यक्त केले जात आहे. परंतु यासोबतच नदीकाठच्या नागरिकांनी पूरपरिस्थिती संदर्भात सतर्क राहून खबरदारी घेण्याचेही आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे. दरम्यान आ.क्षीरसागर यांनी बिंदुसरा धरणाची सुरक्षेच्या दृष्टीने पाहणी केली. यावेळी महसूल विभाग, जलसंपदा विभाग, जायकवाडी विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंचायत समिती विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# दुकाने फोडून चोरी करणारे सराईत गुन्हेगार गजाआड

## माजलगाव शहर पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.३० मे**

शहरात विविध ठिकाणी दुकानाचे शटर वाकवून चोऱ्या करणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना माजलगाव शहर पोलिसांनी मंगळवारी अटक केली. त्यांच्याकडून ११ हजार रुपये रोख मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि. ४ मे रोजी पहाटेच्या सुमारास माजलगाव शहरातील जुना मोंढा भागातील धनंजय दत्तात्रय धपाटे यांच्या औषधी दुकानाचे व खुर्शीद रशीद शेख यांच्या हॉटेलचे शटर फोडून ११ हजार रुपये व साहित्य चोरुन नेले होते. दि.८ रोजी पहाटेच्या सुमारास गोविंद भगवान जाधव यांच्या कापड दुकानाचे शटर तोडून चोरट्यांनी दुकानातील नगदी पाच हजार रुपये व १५ जिन्स पँट असा एकूण २४ हजार २५० रुपयांचा माल चोरुन नेला होता. या प्रकरणी व्यापाऱ्यांच्या तक्रारीवरुन माजलगांव शहर ठाण्यात अज्ञातांविरुध्द गुन्हा दाखल झाला होता. या प्रकरणी माजलगाव शहर पोलिसांनी तपास करुन मुख्य बाजारपेठेत दुकाने फोडून चोरी करणारे सराईत गुन्हेगार सुरेश अशोक मोरे (वय ३०, रा.लालबाग जालना), विजय कैलास खरे (वय ३० रा. कन्हैयानगर जालना), अमित नंदलाल धागडिया (रा. खरपुडी ता. जि. जालना), गोपीसिंग प्रल्हादसिंग टाक, रा. गुरुगोविंदसिंग नगर जालना) यांना निष्पन्न करत या गुन्ह्यात सुरेश अशोक मोरे, विजय कैलास खरे या दोघांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी त्यांच्याकडून नगदी ११ हजार रुपये हस्तगत करण्यात आले आहेत. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. राहुल सुर्यतळ, पोलीस उपनिरीक्षक के. बी. माकणे, पोहेकॉ. गणेश नांगरे, किशोर जाधव यांनी ही कारवाई केली.

# विद्यार्थ्यांनो, व्यसन नको-विजयी व्हा!!

## ३१ मे : जागतिक तंबाखूविरोधी दिन

तंबाखू म्हणजे काय ? : - तंबाखू ही एक प्रकारची वनस्पती आहे ( निकोटीना टॅबुकुमा ) , जिच्या पानांमध्ये निकोटीन हे व्यसन निर्माण करणारे रसायन असते . ती सुकवून धूम्रपान , गुटखा , खर्रा , मावा , मिश्री अशा अनेक प्रकारांमध्ये वापरली जाते .

तंबाखूचे उपयोग : - पूर्वी पारंपरिक औषधांमध्ये , कीटकनाशक म्हणून काही प्रमाणात , धार्मिक विधींमध्ये ( काही भागांत ) वापर होई ; औद्योगिक वापर - धूम्रपान , गुटखा , सिगारेट , बीडी यासाठी तंबाखू वापरली जाते .

तंबाखूवर आधारित उद्योग :- सिगारेट आणि बीडी उत्पादन करणाऱ्या कंपन्या , गुटखा व तंबाखू मिश्रित सुपारी कंपन्या , मिश्री उत्पादन उद्योगात , प्रक्रिया व पॅकेजिंग उद्योगात तंबाखू वापरली जाते .

तंबाखूचा इतिहास : - तंबाखूचा वापर हजारो वर्षांपूर्वी अमेरिकन खंडात सुरू झाला . युरोपियन लोकांनी १६ व्या शतकात तंबाखू युरोपमध्ये आणली . भारतात मुघल काळात तंबाखूचा प्रसार झाला.

चीन हा सर्वात मोठा उत्पादक देश असून भारत , ब्राझील , अमेरिका , इंडोनेशिया , झिम्बाब्वे हे तंबाखू उत्पादन करणारे विविध देश आहेत . महाराष्ट्रात तंबाखू उत्पादन मुख्यतः विदर्भ व मराठवाडा या भागात होते . यवतमाळ , अमरावती , बुलढाणा , नागपूर , चंद्रपूर , बीड , नांदेड या जिल्ह्यात मुख्यता उत्पन्न होणाऱ्या तंबाखूचे प्रकार पुढीलप्रमाणे आहेत . १) बीडी तंबाखू : महाराष्ट्रात प्रामुख्याने याच प्रकाराची लागवड केली जाते . २) चिखली तंबाखू - बुलढाण्यातील एक विशेष प्रकार आहे . ३ ) गुल तंबाखू - मिश्रीसाठी हा प्रकार वापरला जातो.

तंबाखूचे दुष्परिणाम : निकोटीनमुळे व्यसन लागते . हृदयविकार , फुफ्फुसाचे आजार , तोंडाचा , घशाचा, फुप्फुसाचा कर्करोग होऊ शकतो . याशिवाय अपचन , त्वचेचे आजार व इतर अनेक हानिकारक परिणाम होतात .

तंबाखूच्या सेवनामुळे होणारे विविध आजार व उपाय : - तंबाखूच्या सेवनामुळे कर्करोग , टीबी , सी ओ पी डी (फुफ्फुस विकार ) , दात व हिरड्यांचे आजार , गर्भपात / अपत्यांवर परिणाम होऊ शकतो . यावर उपाय म्हणून व्यसनमुक्ती केंद्रात उपचार केले जाऊ शकतात , यासह निकोटीन रिप्लेसमेंट थेरपी , मानसोपचार सल्ला , योग व ध्यान इत्यादी उपाय केले जाऊ शकतात .

भारतात तंबाखूसेवन विरोधी कायदे सुद्धा आहेत .

उदा. सी ओ टी पी ए कायदा , २००३ - या कायद्यानुसार सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान निषिद्ध असून सिगारेट व इतर तंबाखू युक्त पदार्थांच्या उत्पादनावर बंधनासाठी हा कायदा आहे . अनेक राज्यांमध्ये गुटखा बंदी आहे . तंबाखू उत्पादने विक्रीवर वयोमर्यादा ही अठरा वर्ष ठरविण्यात आली आहे . पॅकेजिंगवर इशारे आणि चित्र बंधनकारक आहे . शाळा-कॉलेज परिसरात विक्रीवर बंदी आहे . याशिवाय भारत सरकारच्या अनेक उपाययोजना आहेत . यात मुख्यता एन टी सी पी प्रोग्राम - नॅशनल टोबॅको कंट्रोल प्रोग्राम असून मोफत हेल्पलाइन १८००-११-२३५६ हा आहे . याशिवाय प्रबोधन मोहिमा व जनजागृती , शालेय स्तरावर प्रशिक्षण कार्यक्रम,तंबाखू मुक्त शाळा अभियान इत्यादी उपक्रम राबविले जातात .

जागतिक तंबाखू विरोधी दिनाचा इतिहास :- हा दिवस दरवर्षी ३१ मे रोजी साजरा केला जातो . १९८७ मध्ये थक्ज ( जागतिक आरोग्य संघटना ) ने प्रथम हा दिवस जाहीर केला.हा दिवस का साजरा केला जातो ? :- तंबाखूच्या दुष्परिणामांबद्दल जनजागृती करणे , तंबाखूमुक्त जीवनशैलीचा प्रचार व प्रसार करणे , सरकार व समाज यांच्यातील सामंजस्य वाढवणे , युवकांना व्यसनांपासून दूर ठेवणे हा या मागचा मुख्य उद्देश आहे.महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आवाहन :- तंबाखू सेवनाला नकार द्या . मित्रांना व्यसनमुक्तीसाठी प्रेरित करा . सोशल मिडिया द्वारे जनजागृती करा . महाविद्यालयात प्रबोधन उपक्रम राबवा. स्वयंसेवक म्हणून काम करा.

३१ मे या दिवशी होणारे कार्यक्रम :- व्याख्याने व कार्यशाळा आयोजित केल्या जातात . जनजागृती रॅली , पोस्टर व निबंध स्पर्धा , डॉक्युमेंटरी फिल्म स्क्रीनिंग , तंबाखूमुक्ती प्रमाणपत्र वाटप इ उपक्रम राबविले जातात.२०२५ सालची थीम ( घोषवाक्य ) :- तंबाखू विरोधी लोकांमध्ये जनजागृती व्हावी या उद्देशाने यावर्षीचे घोषवाक्य प्रोटेक्टिंग चिल्ड्रेन फ्रॉम टोबॅक्को इंडस्ट्री इंटरफरन्स ( तंबाखू उद्योगाच्या हस्तक्षेपापासून मुलांचे संरक्षण ) हे आहे.जागतिक तंबाखू विरोधी दिन हा आरोग्य , शिक्षण , आणि समाज प्रबोधनाचा एक महत्वाचा भाग आहे . तंबाखूमुळे होणारे आजार आणि त्याचे दुष्परिणाम टाळण्यासाठी समाजात व्यापक जनजागृती होणे अत्यावश्यक आहे . आपण सर्वांनी तंबाखूविरोधी लढ्यात सामील होऊन , एक निरोगी आणि व्यसनमुक्त समाज निर्माण करायला मदत करावी.

**चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
**तहसीलदार , बीड**

# दत्तप्रसाद अजमेरा यांच्या बाजूने सहनिबंधकांनी दिलेला निकाल महानिबंधकांनी अखेर रद्द ठरवला

**पूनरिक्षण अर्जामुळे नारायण व नरसिंग रांदड यांना मोठा दिलासा**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० मे**

शहरातील गुरूवार पेठ भागातील दत्तप्रसाद हरिरामजी अजमेरा यांनी अंबाजोगाई पिपल्स को-ऑप बँकेकडून ५० लाख रूपयांचे कर्ज घेतले होते. ते थकल्यामुळे बँकेने वसुलीची कारवाई केली. दत्तप्रसाद अजमेरा यांनी त्यांचे घर विक्री करण्याचा ठराव नरसिंग व नारायण रांदड यांच्या सोबत केला. त्यानूसार रांदड यांनी अंबाजोगाई पिपल्स बँकेकडे गृहकर्जाची मागणी करून सर्व कर्ज प्रक्रिया पुर्ण केली. या कर्जास जामीनदार म्हणून स्वतः अजमेरा सुद्धा होते. या कर्जाच्या रक्कमेतून रांदड यांनी अजमेरा यांच्या कर्ज खात्यात रक्कम भरून गृह खरेदीची प्रक्रिया पुर्ण करून गृह कर्जाचे गहाणखत केले. रांदड यांनी सावकारांचे महानिबंधक, पुणे यांचेकडे सहनिबंधक, लातूर यांच्या निर्णयाच्या विरोधात धाव घेतली होती. याप्रकरणी सावकारांचे महानिबंधक तथा अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या निकालामुळे रांदड बंधू यांना मोठा दिलासा मिळाला आहे. तर या प्रकरणातील गैरअर्जदार दत्तप्रसाद अजमेरा यांच्यासाठी हा निकाल म्हणजे एकप्रकारे धक्का असल्याचेच सर्वत्र बोलल्या जात आहे.

या प्रकरणात दत्तप्रसाद अजमेरा यांनी रांदड व अंबाजोगाई पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेविरूद्ध महाराष्ट्र सावकारी नियम अधिनियम २०१४ कलम नियमन आदी कलम १८ (२) प्रकरण जिल्हा सहनिबंधक सहकारी संस्था, बीड यांच्याकडे दाखल केले. सदरच्या प्रकरणात अजमेरा यांनी खरेदी खत व गहाण खत रद्द करण्याची मागणी केली होती. या प्रकरणात संपुर्ण न्यायिक प्रक्रिया, साक्ष जवाब नोंदविण्यात आले. या प्रकरणात आलेल्या सर्व बाबीं व बँकेच्या व्यवहारास सावकारी म्हणता येणार नाही. असा महत्त्वपूर्ण निर्णय देवून दत्तप्रसाद अजमेरा यांचे प्रकरण फेटाळले होते. या निकालाच्या नाराजीने अजमेरा यांनी विभागीय सहनिबंधक, लातूर यांच्याकडे अपील दाखल केले होते. या प्रकरणात सुनावणी घेवून मुख्यतः दत्तप्रसाद अजमेरा व रांदड यांच्यात झालेले खरेदीखत व बँकेकडे झालेले गहाणखत हे दोन्ही दस्ताऐवज एकाच दिवशी झाले असल्यामुळे झालेला व्यवहार हा सावकारीत झाला असल्याची शंका व्यक्त झाल्यामुळे हे अपील मंजूर केले. या अपीलातील निर्णयामुळे न्याय मिळवून घेण्यासाठी रांदड यांनी मा.उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात याचिका दाखल केली. या प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेवून मा.न्यायमुर्ती किशोर पंत यांनी विभागीय सहनिबंधक, लातूर यांचे आपील क्रमांक ०२/२३ प्रकरणामध्ये दिनांक ३१/०७/२०२४ च्या आदेशास ६ आठवड्यांची स्थगिती देऊन सदरचे प्रकरण हे सावकारांचे महानिबंधक, पुणे यांचेकडे दाखल करण्याचे आदेश दिले होते. या नुसार रांदड यांनी सावकारांचे महानिबंधक, पुणे यांचेकडे पूनरिक्षण अर्ज ४२/२०२४ दाखल केले. या प्रकरणात सावकारांचे महानिबंधक, पुणे यांनी पुनरिक्षण अर्जदार यांचा पुनरिक्षण अर्ज, दाखल केलेले लेखी स्वरूपातील म्हणणे, युक्तीवाद, गैरअर्जदार यांचे आव्हानीत आदेश, सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे यांचे अवलोकन केले असता महानिबंधक हे १५ निष्कर्षांप्रत पोहोचले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# श्री रेणुका देवी मंदिर घाटात भाविकांची कार ५० फूट खोल दरीत कोसळली

**तभा वृतसेवा**
**माहुर, दि.३० मे-**

प्रसिद्ध तिर्थक्षेत्र देवभूमी माहूर गडावरील आदिशक्ती आदिमाया श्री रेणुकादेवीच्या दर्शनासाठी आलेले मंगरूळ दस्तगीर येथील सहा भावीक दर्शनादी करून आपल्या कारने परत जात असताना सुरू असलेल्या जोराच्या पावसामुळे रस्त्याचा नीट अंदाज न आल्याने चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने अपघाती वळणरस्ता म्हणून ओळखला जाणाऱ्या घातक 'यु टर्न' जवळ सदरील अनियंत्रित कार उसळून सरळ ५० फूट खोल थेट दरीत कोसळल्याची क्षणभर काळजाचा ठोका चुकविणारी अत्यंत थरारक अपघाताची घटना गुरुवारी रात्री १०:३० वाजताच्या सुमारास घडली.नशिब बलवत्तर म्हणून रात्रीच्या काळ्याकुट्ट अंधारात घनदाट जंगलातील खोल दरीत एवढ्या उंचीवरून खाली कोसळल्यानंतर अपघातग्रस्त कार झाडांना अडकल्याने कारमधील सहा भाविक किरकोळ जखमी होऊन बालंबाल बचावले व मोठा अनर्थ टळल्याने ''देव (झाड) तारी त्याला कोण मारी!' या उक्तिची प्रचिती आली.



## सहा भाविक किरकोळ जखमी

माहूर गडावरील श्री रेणुका माता मंदिराच्या पायथ्याशी असलेला भगवान श्री परशुराम मंदिराकडे जाणारा रस्ता नुकताच बनविण्यात आला असून,कठीण नागमोडी वळणरस्ता हा भाविकांसह सर्वच वाहनचालकांसाठी दिवसेंदिवस अपघात पॉईंट ठरत चालला आहे.

इंग्रजी वर्णाक्षर 'यु' आकाराच्या नागमोडी कठीण वळणावरून वाहन चालवताना चालकांना एकाचवेळी गाडीचा वेग, बाजु, तोल व लक्ष या चौफेर बाबतीत दक्ष राहत अगदी कसरत करत वाहन चालवावे लागते. त्यात आता भरीवर भर म्हणून या वळणावरती सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्याच्या काठावर लावलेल्या सुरक्षा रक्षक कठड्याच्या प्लेटा काढण्यात आल्याने अनेक वाहने तेथे अपघातग्रस्त झाल्याच्या घटना घडल्या आहेत. गुरुवारी रात्री मान्सूनपूर्व अवकाळी पावसाचा तडाखा परिसरात जोर धरुन होता.

दरम्यान, अमरावती जिल्ह्याच्या धामनगाव (रेल्वे) तालुक्यातील मंगरूळ दस्तगीर येथील काही भाविक देवदर्शनानंतर रात्री साडेदहाच्या सुमारास परतीच्या प्रवासाला निघाले होते.सदरील अपघात वळणावरून कार जात असताना जोरदार पावसामुळे चालकास रस्त्याचा नीट अंदाज न आल्याने कार सरळ ५० फूट खोल दरीत कोसळली.कार मध्ये बसलेले सौरभ महेंद्र मरोडकर वय (२७), आकाश गजानन खालकोने वय (२८), सुयोग सुरेंद्र चव्हाण (२८), रोशन शरदराव मरोडकर (३३), अक्षय प्रमोद हळदे (२७), भूषण संदीपराव पिंपळे( २५) सर्व राहणार मंगरूळ दस्तगीर हे कारमधील सहा जण कार चक्क झाडाला अडकल्याने कार खोल दरीत न गेल्याने केवळ किरकोळ जखमी झाले व मोठा अनर्थ टळला. 'देव ( झाड) तारी त्याला कोण मारी!' या उक्तिप्रमाणे अपघातग्रस्त कार आणि खोल दरी च्या मधात ' झाडं ' साक्षात देवदुत बनून उभी राहिल्याने हे सहाही जण म्त्युच्या दाढेतून अगदी थोडक्यात बचावले. भयाण रात्रीची वेळ आणि सुरू असलेल्या पावसामुळे यावेळी या मार्गावरुन वाहतूक थंडावलेली असल्यामुळे दुर्दैवाने या अपघातवेळी याठिकाणी बचावासाठी कोणीही उपलब्ध नव्हते. अपघातातील जखमींनी कसेबसे रस्त्यावर येऊन एका खाजगी वाहनाद्वारे माहूर येथील ग्रामीण रुग्णालय गाठले. येथे वैद्यकीय अधीक्षक डॉ.किरण कुमार वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.अक्षय वाठोरे यांनी सर्व जखमींवर प्रथमोपचार करून त्यांना त्यांचे गावी सुखरुप परत पाठविले.

श्रीक्षेत्र माहूर शहरापासून ते रेणुका माता मंदिर आणि श्री दत्त शिखर संस्थान पर्यंतचा ७ किलोमीटर अंतर असलेला उंच आणि नागमोडी कठीण घाट वळणदार रस्ता हा अनेक ठिकाणी नादुरुस्त असून, कठीण वळणावरील सुरक्षा भिंत, सुरक्षा कठडे अनेक ठिकाणी उकडलेल्या अवस्थेत असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्याची पाहणी करून तातडीने दुरुस्ती करावी अशी मागणी भाविकांसह वाहनचालकांकडून होत आहे.

## तलाठी शिवाजी तोटरे यांना निलंबित करण्याची मागणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.३० मे-**

मुखेड तालुक्यातील इटग्याळ सज्जाचे तलाठी शिवाजी तोटरे यांनी सेवानिवृत्त शिक्षक शेतकरी निशिकांत कोठारे यांना भ्रमणध्वनीवर अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत जीवे भरण्याची धमकी दिली होती. या प्रकरणात जिल्हा प्रशासनाकडून कोणतीही कारवाई केली नसल्याने जनताच मालक या संघटनेचे हनुमंत मामीलवाड यांनी संबंधित तलाठ्यावर निलंबनाची कार्यवाही करून संपत्तीची चौकशी करण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे अन्यथा विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगरसमोर आंदोलनाचा इशारा दिला आहे.

अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या लेंडी प्रकल्पाच्या जमीन अधिग्रहण मावेजाची प्रक्रिया सुरू आहे. योगेश निशिकांत कोठारे यांची शेत जमीन अधिग्रहण करण्यात आले होते. अनुदान वाटपाची प्रक्रिया सुरू असताना तलाठी शिवाजी तोटरे यांना नोटीस साठी त्यांनी मागणी केली होती. परंतु वारंवार कॉल करून देखील त्यांनी फोन उचलला नाही आणि दि. ११ मे २०२५ मे रोजी तलाठी शिवाजी तोटरे यांनी योगेश यांचे पिता सेवानिवृत्त शिक्षक ज्येष्ठ नागरिक निशिकांत कोठारे यांना फोन कॉल करून अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करीत जीवे मारण्याची धमकी दिली होती.

## संक्षिप्त वृत्त



### हानेगाव येथे छत्रपती शिवाजी महाराजस्व समाधान अभियान

**हानेगाव** -हानेगाव ग्रामपंचायत कार्यालय येथे दिनांक २९ मे रोजी हाणेगाव येथील मंडळ अधिकारी व तलाठी कार्यालयाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजस्व समाधान अभियान संपन्न झाले. दरवर्षी शासनाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या या अभियानाला जनतेतून प्रतिसाद मिळत असताना दिसत आहे शासनाचे भूमिका सर्व प्रमाणपत्र एकाच ठिकाणी देण्यात यावा यासाठी याची सुरुवात करण्यात आली याचाच भाग म्हणून हाणेगाव येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष हानेगाव ग्रामपंचायतीचे सरपंच सौ शारदादेवी राठोड हे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून लक्ष्मणराव बेंजलवार मंडळ अधिकारी हाणेगाव व तसेच हाणेगावचे तलाठी श्री महेश पदाजी व दिलीप पाटील बंदखडके माजी जि प सदस्य प्रतिनिधी नांदेड, पी. जी .राठोड प्राचार्य इंद्राबाई देशमुख ज्युनिअर कॉलेज हाणेगाव व ग्रामपंचायत उपसरपंच मुजीपोद्दिन चमकुडे, कोकलगावचे तलाठी सोना गायकवाड, शिळवणीचे तलाठी वर्षा शितोळे, वझर चे तलाठी सोमनाथ वंजे, वझरच्या पोलीस पाटील सौ ज्योती गोखले, आधीजण उपस्थित होते यावेळी श्री बेंजलवार लक्ष्मणराव यांनी महाराजस्व समाधान अभियानाबद्दल सविस्तर अशी यावेळी नागरिकांना माहिती सांगितली तर यावेळी जिवंत सातबारा १५ हयात प्रमाणपत्र ४०० फेरफार नक्कल २५ व तसेच जातीचे प्रमाणपत्र रहिवासी प्रमाणपत्र१०, शिधापत्रिका २, संजय गांधी निराधार ८, उत्पन्नाचे प्रमाणपत्र १०,, श्रावण बाळ योजना ५, सातबारा होल्डिंग अशा विविध शासकीय प्रमाणपत्राची यावेळी वाटप करण्यात आले यावेळी शासनाच्या विविध योजनांची माहिती सांगण्यात आली. श्रावणबाळ योजना, संजय गांधी निराधार योजना, हयात प्रमाणपत्र शिधापत्रिका, पानंद रस्ते याविषयी माहिती सांगण्यात आली तर यावेळी जनतेने मांडलेल्या समस्याचे प्रश्नाचे निवारण करण्यात आले व त्यांना सविस्तर अशी माहिती सांगण्यात आली कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री लक्ष्मणराव बेंजलवार मंडळ अधिकारी हाणेगाव यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार हाणेगावचे तलाठी श्री महेश पदाजी यांनी केले यावेळी सर्व सेतू केंद्राचे पदाधिकारी व तसेच ग्रामपंचायत कार्यालयाचे पदाधिकारी व तसेच यावेळी अनिल राठोड भीमराव आडेकर आदीजन उपस्थित होते

# जिल्ह्यात एकही बालविवाह होणार नाही याची दक्षता घ्या : जिल्हाधिकारी कर्डिले

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.३० मे-**

जिल्हा बालविवाह मुक्त करण्यासाठी सर्वांनी समन्वय साधून एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. बालविवाह निर्मूलन ही चळवळ अधिक सक्रिय करण्यासाठी सर्वांचे योगदान महत्त्वाचे असून जिल्ह्यात एकही बालविवाह होणार नाही याची सर्वांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

बालविवाह निर्मूलन जिल्हा कृती दलाच्या माध्यमातुन बालविवाह निर्मूलन करण्यासाठी महिला व बालविकास विभाग, पंचायत, आरोग्य, शिक्षण, महिला व बाल कल्याण विभाग (जि.प.), उमेद या सर्व विभागांच्या संयुक्त विद्यमाने तयार करण्यात आलेला बालविवाह मुक्त नांदेड जिल्हा हा कृती आराखडा प्रभावीपणे राबविण्यासाठी संबंधित सर्व विभागांनी बालविवाह निर्मूलन चॅम्पियन्स ची नियुक्ती केली आहे. या सर्व विभागाच्या चॅम्पियन्ससाठी एकदिवसीय प्रशिक्षण जिल्हाधिकारी कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली नुकतेचे २८ मे रोजी हॉटेल सिटी सिंफोनी नांदेड येथे संपन्न झाले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मंजुषा कापसे, शिक्षणाधिकारी प्रा. श्रीमती सविता बिरगे, महिला व बाल कल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रशांत थोरात, उपशिक्षणाधिकारी रामचंद्र पाचंगे, परिवीक्षा अधिकारी गजानन जिंदमवार, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी विद्या आळणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

बालविवाहाच्या कोणत्याही प्रकरणात दिरंगाई होणार नाही याबाबत सर्वांनी कटाक्षाने कायद्याचे पालन करावे. बालविवाहात कोणतेही बालक ओढले जाणार नाही यासाठी सर्वांनी सतर्क राहून कार्य करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिल्या. बालविवाह निर्मूलन जिल्हा कृती आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत सूचना देऊन प्रशिक्षणार्थ्यांशी जिल्हाधिकारी कर्डिले यांनी मनमोकळा संवाद साधला.

या प्रशिक्षणात आराखडयाची अंमलबजावणी, पाठपुरावा, नियोजन, माहिती विश्लेषण, समन्वय, मूल्यमापन आणि संनियंत्रण संदर्भातील गुगल फार्मवर देखरेख तालुका निहाय, बालविवाहाची कारणे व विभाग निहाय उपाय व हॉटस्पॉट गावाची ओळख, महाराष्ट्रातील बालविवाहाचे प्रमाण परिणाम, सक्षम कार्यक्रम आढावा, बालहक्क, बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६, असुरक्षित बालकांची ओळख, बालविवाह प्रकरण हाताळणे हेतु कार्यवाही व पाठपुरावा, किशोरवयीन मातांसाठी सहाय्य करण्यासाठी यंत्रणांचे बळकटीकरण विभागांचा दृष्टिकोण व समन्वय, बालविवाह निर्मूलन चॅम्पियन्सची भुमिका आणि जबाबदारी, कम्युनिकेशन किट, युनिसेफचे-बालविवाह समाप्त करण्यासाठी जागतिक कार्यक्रम, बालविवाह निर्मूलन जिल्हा कृती आराखडा कार्यान्वयन योजना तयार करणे, साप्ताहिक देखरेखीचे फॉरमेट तयार करणे, जिल्हा कृती दल बैठकीसाठी अहवाल तयार करणे, जिल्हा कृती आराखड्यासाठी सहाय्य व नियोजन, महिती संकलन आणि विश्लेषण, प्रेरणादायी व सकारात्मक प्रकरणांचे दस्तऐवजीकरण आदी विषयांवर हे प्रशिक्षण घेण्यात आले.

या प्रशिक्षणासाठी जिल्ह्यातील पंचायत विभाग, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, महिला व बाल कल्याण विभाग (जि.प.), जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयांतर्गत जिल्हा बाल संरक्षण अधिकारी कार्यालय कर्मचारी, चाईल्ड लाईन १०९८ कर्मचारी, राष्ट्रीय किशोर स्वास्थ्य कार्यक्रम (ठघडघ), महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद अभियान) यांनी नियुक्त केलेल्या एकूण बालविवाह निर्मूलन चॅम्पियन्स यांना प्रशिक्षण देण्यात आले.

# पावसाळ्यापूर्वी विद्युत तारा व उपकरणांची दुरुस्ती करावी

**तभा वृतसेवा**
**किनवट , दि.३० मे-**

प्रभाग क्रमांक २ मधील विद्युत तारा, उपकरणे, वितरण व्यवस्था व इन्सुलेशनची अत्यंत जीर्ण अवस्था असून लवकरात लवकर दुरुस्ती न झाल्यास पावसाळ्यात विद्युत पुरवठा खंडित होऊ शकतो तसेच नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे महावितरणच्या अधिकाऱ्यांना तत्काळ दखल घेऊन उपाययोजना करण्याच्या सूचना द्याव्यात अशी मागणी माजी नगरसेविका सौ. अनुसया मधुकर अन्नेलवार यांनी निवेदनाद्वारे केली आहे.



माजी नगरसेविका अनुसया अन्नेलवार यांचे आ. भीमराव केराम यांना निवेदन

या संदर्भात त्यांनी आमदार भीमराव केराम यांची भेट घेऊन एक सविस्तर निवेदन सादर केले. सदर निवेदनात त्यांनी नमूद केले आहे की, प्रभाग क्रमांक २ मधील अनेक भागांत विद्युत तारा झाडांमध्ये अडकलेल्या आहेत, काही ठिकाणी इन्सुलेशन पूर्णतः झिजलेले असून वायरमधून थेट टेन्शन येत आहे. यामुळे लहान मुले, वृद्ध आणि सामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच, यापूर्वीही अशा स्थितीत काही लहान मोठे अपघात घडलेले आहेत. माजी नगरसेविका अन्नेलवार यांनी मागणी केली आहे की, प्रभाग क्रमांक २ मध्ये महावितरणने संपूर्ण तपासणी करून जुने खांब, झिजलेल्या वायर, कमकुवत इन्सुलेशन व झाडांमध्ये अडकलेल्या तारा यांचे तातडीने निराकरण करावे. पावसाळ्याच्या तोंडावर अशा स्थितीने गंभीर परिणाम होऊ शकतात. या निवेदनाची दखल घेत आमदार भीमराव केराम यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांशी तातडीने संपर्क साधून आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना देण्याचे आश्वासन दिले. तसेच, नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कोणतीही तडजोड न करता सर्व यंत्रणा सतर्क राहाव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले. स्थानिक नागरिकांनी माजी नगरसेविका अन्नेलवार यांच्या या पुढाकाराचे स्वागत केले असून महावितरणने लवकरात लवकर आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# अवकाळी पावसामुळे शेकडो हेक्टरवरील भुईमुग मातीमोल

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.३० मे-**

गेल्या आठ दिवसांपासून सुरु असलेल्या अवकाळी पावसाने मराठवाड्यात सर्वत्र जोरदार हजेरी लावली. यात राज्यातील अनेक भागातील शेती पिकांना मोठा तडाखा बसल्याचे पहावयास मिळाले. नांदेड तालुक्यातील रहाटी, सोमेश्वर आदी परिसरातील शेतकऱ्यांच्या हाता-तोंडाशी आलेला भुईमुग पिकाचा घास या अवकाळी पावसाने हिरावून नेला आहे. कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्याचे आधीच कंबरडे मोडलेले असतांना अवकाळी पावसाने मात्र त्यावर कहर केला आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ शासनाकडून हेक्टरी ५० हजार रुपये नुकसानभरपाई म्हणून देण्यात यावी. या मागणीसाठी रहाटी येथील शेतकरी उद्धव बोकारे, आनंदा बोकारे, काशिनाथ बोकारे, संतोष बोकारे यांच्यासह इतर शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

गेल्या दहा ते बारा दिवसांपासून मराठवाड्यात वादळीवाऱ्यासह बरसणाऱ्या अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला आहे. या वादळी वाऱ्यात अनेकांच्या घरावरील पत्रे उडाली आहेत. तर वीज पडून मृत्यू झाल्याच्या घटनाही घडल्या आहेत. रहाटी, सोमेश्वर भागात सतत बरसणाऱ्या या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान केले आहे. नगदी पीक म्हणून परिचित असलेल्या भुईमुग पिकाचे शेकडो हेक्टरवरील पिक नेस्तनाबुत झाले आहे. तर जनावरांच्या वैरणाचाही प्रश्न मोठा गंभीर बनल्याने या भागातील पूर्णतः कोलमडून गेला आहे. वारंवार बळीराजावर नैसर्गिक संकट कोसळण्याची मालिका गेल्या सात वर्षांपासून सुरुच आहे. शासनाकडून देण्यात येणारी नुकसान भरपाईची मदत ही तोकडी पडत असून शेतकऱ्यांना भरीव मदत देवून पुन्हा उभारी द्यावी अशी मागणी निवेदनकर्त्या शेतकऱ्यांनी केली आहे. भुईमुग पिकाचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तात्काळ शासनाकडून ५० हजाराची नुकसान भरपाई म्हणून आर्थिक मदत देण्यात यावी अशी मागणी रहाटी आणि सोमेश्वर भागातील शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केलेल्या निवेदनात केली आहे. तात्काळ मदत न मिळाल्यास या भागातील शेतकऱ्यांना आंदोलनाचा पत्करावा लागेल, असेही निवेदनात नमुद केले आहे. सदर निवेदनाच्या प्रती उपविभागीय अधिकारी, तहसीलदारांना देण्यात आल्या आहेत. या निवेदनावर आनंदा पुंडलिकराव बोकारे, उद्धव माधवराव बोकारे, संतोष बाबुराव बोकारे, काशिनाथ आनंदा बोकारे यांच्यासह इतर शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# जिल्हा रुग्णालयात मासिक पाळी स्वच्छता दिवस साजरा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.३० मे-**

जिल्हा रुग्णालय येथे मासिक पाळी स्वच्छता दिवस आज साजरा करण्यात आला. यावेळी मासिकपाळी संदर्भात समाजामध्ये असणारे गैरसमज याविषयी माहिती देण्यात आली. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. एन. आय. भोसीकर, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. एस. एम पेरके, निवासी वैद्यकीय अधिकारी (बा.सं) डॉ. आर.एस.बुट्टे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. एच. के. साखरे, श्रीमती डॉ. पुष्पा गायकवाड, तसेच बाह्यरुग्ण विभागाच्या मेट्रन सहाय्यक अधिसेविका श्रीमती सुनिता राठोड नर्सिंग महाविद्यालयाच्या प्राचार्य श्रीमती सुनिता बोथिकार तसेच आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्ट चा उजास उपक्रमाचे जिल्हा समन्वयक स्वाती महानंदा सुरेश व संवादक सुकेशनी टालमाणी हे यावेळी उपस्थित होते.

निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. साखरे, डॉ. पुष्पा गायकवाड व श्रीमती धनश्री अर्जुनराव गुंडाळे राष्ट्रीय किशोर स्वास्थ कार्यक्रम समुपदेशक यांनी मासिकपाळी संदर्भात माहिती देऊन मासिक पाळी स्वच्छता दिवस का साजरा केला जातो, मासिक पाळी विषयी समाजात असलेले समज गैरसमज बद्दल मार्गदर्शन केले. मासिक पाळी म्हणजे काय ? व सॅनेटरीपॅडचा उपयोग याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच मासिक पाळी मध्ये काय काळजी घेतली पाहिजे, आहार कसा घ्यावा, योगा आरोग्यासाठी किती महत्वाचा आहे याविषयी माहिती दिली, तसेच कवितेतुन व का का कुमारी ह्या नाटिकेच्या माध्यमातून मासिक पाळी विषयी समाजामध्ये असणारे गैरसमज याविषयी खूप छान प्रकारे संदेश दिला आहे. या विषयीवर नर्सिंग महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी, रुग्ण, नातेवाईक यांना माहिती सांगितली.



हदगाव - केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शहा यांचे नांदेड येथे शंखनाद कार्यक्रम स्थळी स्वागत करताना हदगाव भाजपा तालुका अध्यक्ष बाळा पाटील.

# ग्रामीण साहित्यीक बालाजी पेटेकर तिनशे पुतळे देऊन करणार गुणवंताचा सन्मान



**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि.३० मे-**

बहुजनांच्या उद्धारक,महिलांच्या हातात प्रथमच तलवार देऊन महिलांची फौज निर्माण करणाऱ्या रणरागिणी,२८ वर्षे राज्यकारभार करून भारताच्या इतिहासात एकमेव महिला राज्यकर्त्या ठरलेल्या पुण्यश्लोक महाराणी अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सवानिमित्य ३०० व्या जयंतीचे औचित्य साधून सामाजिक कार्य करणारे,गुणवंत विद्यार्थी व विविध स्पर्धेमध्ये प्राविण्य मिळवलेल्या गुणवंतांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे ३०० पुतळे भेट देऊन सन्मान करण्यात येणार असल्याची माहीती बालाजी पेटेकर यांनी दिली.

स्वतः शिल्पकार,चित्रकार असलेल्या बालाजी पेटेकर यांनी स्वतः ह्या पुतळ्याचे मॉडेल बनवले असून सामाजिक सेवेच्या भावनेतून हा उपक्रम त्यांनी हाती घेतला आहे. महाराणी अहिल्यादेवीचा पुतळा समोर ठेवून त्यांचा आदर्श, मानवतावादी दृष्टिकोन, सर्व समाजाप्रती असलेली समाजोनतीची तळमळ,निस्वार्थ सामाजिक कार्याचा वसा त्यांच्या पुतळ्यातून ही प्रेरणा मिळावी हा त्यांचा हेतू .अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती वर्षभर महाराष्ट्रा सह इतर राज्यातही मातोश्री अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जन्मोत्सव मोठ्या दिमाखाने हर्ष उल्हासात साजरा करण्यात येत आहे. या त्रिशताब्दी जन्मोत्सव वर्षानिमित्त विविध ठिकाणी विविध जिल्ह्यात विविध तालुका पातळीवर,वेगवेगळे उपक्रम राबवले जात आहेत. या सामाजिक उपक्रमातून महामानवांचे विचार प्रत्येकाच्या घराघरात पोहोचावे या उद्देशाने विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. त्यापैकी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य विचारधारा सर्व स्तरापर्यंत जावी म्हणून बालाजी पेटेकर खतगावकर यांनी ३०० व्या जयंतीनिमित्त ३०० पुतळे देऊन सन्मान करण्याचे ठरवले आहे. त्यांच्या या निस्वार्थ भावनेतून करण्यात येणाऱ्या समाजपयोगी उपक्रमाचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# देगलूर मध्ये प्लास्टिक विरोधात धडक कारवाई

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि.३० मे-**

शासनाने प्लास्टिकवर बंदी घातली असली तरी शहरात सर्रासपणे प्लास्टिकचा वापर केले जातं आल्याची माहिती मिळताच पथक कारवाई सज्ज झाले.नगरपालिकेची प्लास्टिक विरोधातील कारवाई थंडावल्याने साऱ्यांचेच फावत असल्याचे दिसत आहे. यामुळे येथे प्लास्टिक बंदीचा पुरता फज्जा उडाला आहे.

शहरातील दुकानांसह विशेषतः मिठाईच्या दुकानांमध्ये सर्रासपणे प्लास्टिक पिशव्याचा वापर सुरू आहे. नगरपालिकेने काही महिन्यांपूर्वीच प्लास्टिक पिशव्याचा वापर करणाऱ्या व्यावसायिकांना दणका देत दंडात्मक कारवाई करण्यात आली. या कारवाईच्या धसक्याने प्लास्टिकचा वापर करणाऱ्या व्यावसायिकांचे धाबे दणाणले होते. मात्र आता ही कारवाई थंडावली असल्याने त्यामुळे बाजारपेठेत सर्रासपणे प्लास्टिक पिशव्यांचा वापर केला जात होते पावसाळी हंगामाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत



खरेदीसाठी ग्राहकांची झुंबड उडत आहे. याच गर्दीचा फायदा घेत काही व्यावसायिक बिनधास्तपणे ग्राहकांना प्लास्टिक पिशव्या देत असल्याचे निदर्शनास येत आहे.

देगलूर नगर परिषदेअंतर्गत प्लास्टिक बंदी मोहीम राबवण्यात आली होती. तसेच नगरपरिषदेकडून चार दुकानात दोन हजार रुपयाची दंड लावण्यात आले. यावेळी पथकात रमाकांत बाचे, शंकर रोयलावार,शंकर पुसाणे, जब्बार कुरेशी,अजय कडलवार, संकेत कंतेवार व इतर कर्मचारी मिळून ही मोहीम राबवण्यात आली आहे.

तरुण भारत
छोटे उस्ताद



## तुम्हाला माहिती आहे का?

● डॉ. जयंत विष्णू नारळीकर (१९ जुलै, १९३८ - २० मे २०२५) हे भारतीय खगोलशास्त्रज्ञ व लेखक होते. त्यांचा जन्म कोल्हापूर येथे झाला. त्यांचे वडील रँग्लर विष्णू वासुदेव नारळीकर हे एक प्रसिद्ध गणितज्ञ, वाराणसी येथील बनारस हिंदू विद्यापीठाच्या गणित शाखेचे प्रमुख होते. त्यांची आई सुमती विष्णू नारळीकर ह्या संस्कृत विदुषी होत्या. नारळीकरांचे शालेय शिक्षण वाराणसीत झाले. डॉ. नारळीकर हे अचानक आणि अपघाताने घडलेले पण आपली नाममुद्रा कोरलेले साहित्यिक आहेत. 'नारायण विनायक जगताप' या उलट्या क्रमाने आपल्या नावाची आद्याक्षरे होणाऱ्या टोपण नावाने त्यांनी विज्ञानकथा स्पर्धेत भाग घेतला होता, हे विशेष!

## अशी पाखरे येती

# शिअर वॉटर

**निशिकांत मायी / ९८८११५२४३९**




आपल्या लांबलचक पंखांच्या वैशिष्ट्यांमुळे आणि पाण्याच्या लाटांवर पुढे सरकताना त्याच पंखांचा वापर करणारे पेट्रेल वंशातील मध्यम आकाराचे शिअर वॉटर नामक समुद्री पक्षी जागतिक स्तरावर समुद्रात आढळून येतात. हे पक्षी समशीतोष्ण आणि थंड पाण्यात अधिक आहेत. साधारणपणे ३५ ते ६५ सें.मी. लांबीचे, सडपातळ शरीरयष्टीचे शिअर वॉटर समुद्रातील लहान प्राणी, कीटकांसोबत इतर सागरी जीवांवर आपला उदरनिर्वाह करतात. त्याचमुळे ते आपले वास्तव्य समुद्रकिनाऱ्याजवळच करतात. स्थलांतर करणाऱ्या पक्ष्यांमध्ये त्यांचा समावेश होतो.

प्रजनन हंगामामध्ये ते प्रामुख्याने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करतात. लाटांवर सरकण्याच्या सवयीमुळे त्यांना शिअर वॉटर म्हटले गेले असावे. लांब पंख असल्याने हे पक्षी उडताना आपल्या पंखांना ताठ ठेवून उड्डाण भरतात. पाण्याच्या अगदी जवळून उडताना लाटांच्या टोकांना कापत कापत पुढे जातात. कमीत कमी सक्रीय उड्डाणासह लाटांच्या आघाडीवरून पुढे जाण्याच्या त्यांच्या या तंत्राला ?'मॅन्क्स शिअर वॉटर?' असेही नाव आहे. हे पक्षी १४ हजार किमीपेक्षाही जास्त अंतर कापतात. एका अभ्यासात असेही आढळले की, टॅग केलेले काही पक्षी दरवर्षी तब्बल ६४ हजार किमीपर्यंत किंवा याहीपेक्षा जास्त अंतर कापून गेले आहेत. वसाहती प्रजनन स्थळांवर रात्रीचे ते मुक्कामी असतात. बिळांमध्येच ते आपली घरटी बांधतात. मादी शिअर वॉटर एकच पांढरे अंडे घालते. शिअर वॉटरच्या काही प्रजाती ७० मीटर खोलीपर्यंत डायव्हिंग करतात. शिअर वॉटरच्या सुमारे ३० प्रजाती आहेत. शिअर वॉटर ही प्रजाती अतिशय नम्र असून गडद तपकिरी रंगाच्या या पक्ष्याच्या पंखाखाली चंदेरी झाक असल्याचे आढळते.

**शिअर वॉटर नामक समुद्री पक्षी जागतिक स्तरावर समुद्रात आढळून येतात. हे पक्षी समशीतोष्ण आणि थंड पाण्यात अधिक आहेत. साधारणपणे ३५ ते ६५ सें.मी. लांबीचे, सडपातळ शरीरयष्टीचे शिअर वॉटर समुद्रातील लहान प्राणी, कीटकांसोबत इतर सागरी जीवांवर आपला उदरनिर्वाह करतात. त्याचमुळे ते आपले वास्तव्य समुद्रकिनाऱ्याजवळच करतात. स्थलांतर करणाऱ्या पक्ष्यांमध्ये त्यांचा समावेश होतो.**


## Word Puzzle

Fill the words given below in following frame.
SMILE . EAST . TEETH . HEAT . MERIT . TEAK



Previous Word Puzzle Answer : Crab, Bear, Rabbit, Crow

## शब्दकोडे




**आडवे शब्द :–** 2. पक्ष्यांचा मंजुळ, मधुर असा आवाज 4. धोबी,, कपडे धुणारा, परीट 5. नकली, बनावटी 8. एकाग्र दृष्टीने बघणे, रागगढ्यानरील एक टोक

**उभे शब्द :–** 1. देशात चलन म्हणून चालणारे नाणे 2.सरळ आणि दोन्ही बाजूला धार व पुढे चिंचोळे टोक असलेले एक हत्यार 5. महानगर पालिकेत नगरसेवकांनी निवडलेला अध्यक्ष 6. डोके, कपाळ

**मागील अंकातील म्हणीत गुंतली म्हणचे उत्तर**
• काळीज थरारणे • लगाम घालणे • शेरास सव्वा शेर • हातावर तुरी देणे • री ओढणे • दृष्टी आड सृष्टी • मन मारणे


## वंडर गर्ल
## गौरी निर्मला अविनाश ठवकर

**संजय पेंडसे/९४२२४४३२९५**



**बालमित्रांनो,** लहानपणी आपण लुटुपुटूची लढाई खेळतो, मस्ती करतो, धावतो, पडतोही! परंतु, लहानपणी सहज गंमत म्हणून जो खेळ आपण खेळतो तो पुढे जाऊन आपला महत्वाकांक्षी निर्णय होईल, असं आपल्याला माहितीदेखील नसतं. आजची आपली वंडर गर्ल गौरी अशीच तिच्या दादाशी म्हणजे आकाश ठवकरशी लढाई खेळत असे. खेळता खेळता तिला कुस्तीची आवड निर्माण झाली. मग काय दादाबरोबर धावणे, क्रिकेट खेळणं असे छंद ती जोपासायला लागली. आजवर गौरीने १४ व्या वर्षापर्यंत कुस्तीच्या एकूण ९६ मॅचेस खेळल्या आहेत. याची सुरुवात तिने चौथ्या वर्षीच केली. कापसीच्या कुस्ती मैदानावर ती रोज सराव करते. कुस्तीमधील तिच्या गुरू आहेत निकिता लांजेवार! तिला वैयक्तिक मार्गदर्शन करतात महेश सर! गौरीने अभ्यास करताना आपला हा कुस्तीचा छंदही सुरू ठेवला. आज तिच्याकडे चार चषक, १५ पदकं ज्यामध्ये सुवर्ण आणि रौप्य पदकांचा समावेश आहे. रवींद्र हजारे यांच्या कुस्तीच्या मैदानावर ती सराव करते. कुस्तीबरोबरच तिला दांडपट्ट्याचीही आवड आहे. गौरी गाणंही छान म्हणते. दहा वर्षांच्या तिच्या कुस्ती प्रवासामध्ये तिचा हातदेखील मोडला, पायाला इजा झाली पण, तिने आपली कारकिर्द घडवली. पुढे जाऊन गौरीला इंडियन आर्मीमध्ये सहभागी व्हायचं आहे आणि देशाची सेवा करायची आहे. बघा बरं, अगदी मस्तीची लढाई खेळताना आज गौरीने आपली कारकिर्द घडवली आहे. ती नेहमीच मार्गदर्शन घेते कोमल प्रिन्सि आणि प्रमोद मारोडकर या शिक्षकांचं! आपल्या वंडर गर्लची महत्त्वाकांक्षा पूर्ण होण्यासाठी गौरीला खूप शुभेच्छा!

## प्रश्नसंच - १४



### तरुण भारतचा अभिनव उपक्रम
# ज्ञानांजली!

**संतश्रेष्ठ** गजानन महाराज यांच्या चरित्राविषयी सविस्तर जाणून घेण्यासाठी श्रीगजानन महाराज अध्ययन समूह, नागपूरच्या सहकार्याने तरुण भारतच्या वतीने, 'ज्ञानांजली' हा अभिनव उपक्रम सुरू आहे. श्री गजानन विजय या ग्रंथावर आधारित १० प्रश्न दर शनिवारी आकांक्षा पुरवणीत प्रसिद्ध केले जातील. अचूक उत्तर निवडण्यासाठी चार पर्यायही दिले जातील. ज्ञानांजलीतील सर्व १० प्रश्नांची अचूक उत्तरं देणाऱ्या भाग्यवंत भक्तांची नामावली पुढच्या आकांक्षामध्ये प्रकाशित करू. ही प्रश्नावली तुम्हाला गूगल फॉर्म स्वरूपातच सोडवायची आहे. प्रिंट किंवा हस्तलिखित स्वरूपात तरुण भारत कार्यालयाकडे ती पाठवू नये. आपली ज्ञानसेवा श्रींच्या चरणी रुजू करण्याची ही सुवर्णसंधी आहे. प्रत्येक शनिवारी गूगल फॉर्म मिळविण्यासाठी 'तरुण भारत नागपूर' या आमच्या व्हॉट्स ॲप चॅनेलला फॉलो करा. अधिक माहितीसाठी सुरेखा देशपांडे ९८२२४४४२४५ या क्रमांकावर संपर्क करा. जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...

### प्रश्नसंच क्र. १३ चे भाग्यवान विजेते

**एकूण ५०४ जणांनी प्रश्नसंच सोडविला त्यापैकी खालील भाविकांनी पैकीच्या पैकी गुण प्राप्त केलेत.** ज्योती साठे, अस्मिता तलाठी, पुष्पलता गावडे, कविता देशपांडे, अतुल देवगडे, रवींद्र टोंगळे, मीना खेडेकर, रंजना धांडे, स्नेहल अवचट, पुष्पा खेडेकर, अनघा बिराजदार, शोभा कुळकर्णी, प्रभाकर खेडकर, मनिषा लिगदे, शुभांगी सूर्यवंशी, अर्चना भोसले, अथर्व पिंगळे, आराधना पिंगळे, उमेश कुळकर्णी, कालिंदी गलगलकर, सुनिता जोगळेकर, दीपाली पाटील, सर्वेशा खेडेकर, अनिल पाटील, अलका देशमुख, शकुंतला ढुमणे, मंजुषा कठाळे, साक्षी पांडे, नीता कुळकर्णी, श्रध्दा भारत, जयंत भारत, अनुजा देसाई, सुलोचना येवले, आरती देशपांडे, मधुरा कथने, स्वाती पंधे, ऋषिकेश शिरभावीकर, कुंजलता सरनाईक, दीपा म्हाळगी, मनाली बोरकर, सीमा धर्माधिकारी, पद्मजा कवीमंडन, कुमुद मेटकर , असरानी सुतार, स्वाती भस्मे, विजया कुमठेकर, स्नेहल लोये, नारायण तायडे आणि सुनिता देशपांडे!

**श्रीगजानन विजय ग्रंथातील ओवीतील शब्द बदलला आहे त्या जागी ओवीतील शब्द लिहा.**

**१) समर्थ म्हणाले गाईस। बाई कोणा न द्यावा त्रास।। तू या सोडून मठास। कोठेही जाऊ नको ॥**
अ) सुरभीस ब) धेनूस क) गौस ड) पयस्विनीस

**२) आपुले हे दिव्यदर्शन। हेच माझे धनमान ॥ सर्वदा घडो चिंतन। आपुल्या दिव्य मूर्तीचे ॥**
अ) दिव्यचरण ब) दिव्यपादुका क) दिव्यस्पर्श ड) दिव्यदर्शन

**३) आईची करिता सेवा । तो प्रिय होतो वासुदेवा ॥ पुंडलिकाचा ठेवावा । इतिहास तो डोळ्यांपुढे ॥**
अ) मातेची ब) जननीची क) जन्मदात्रीची ड) मातोश्रींची

**४) कधी वागावे पिशापरी । कधी भटकावे वनांतरी ॥ कधी शिरावे जाऊन घरी । एखाद्याचा अवचीत ॥**
अ) जंगलांतरी ब) काननी क) कांतारी ड) अरण्यी

**५) महाराज बसले ज्या ठिकाणी । तीच यावी भूमी ॥ मध्यभागा म्हणूनी । हे करणे भाग पडले ॥**
अ) पृथ्वी ब) मेदिनी क) धरा ड) वसुंधरा

**६) राम मंदिरासमोर । एक वडाचा होता पार ॥ शिष्यांसहित साधुवर । तेथे जाऊन बैसले ॥**
अ) पिंपळाचा ब) चिंचेचा क) कडुनिंबाचा ड) आवळ्याचा

**७) मग काय विचारता । अवघे हर्षले तत्त्वता ॥ झाली तयारी हां हां म्हणता । रुपये हजार झाले जमा ॥**
अ) शंभर ब) लाख क) पाचशे ड) पन्नास

**८) वा पाहून बाटुकाला । बैल नाही पुढे गेला ॥ कारटे आमुच्या कुळाला । काळे उगे लावू नको ॥**
अ) घराण्याला ब) परंपरेला क) रीतीला ड) नावाला

**९) यावरी म्हणती पोरे । तुमचे भाषण ऐकिले सारे ॥ गावीचे लोक अत्यादरे । परमहंस म्हणती या ॥**
अ) संन्यासी ब) योगयोगेश्वर क) जीवन्मुक्त ड) साधुवर

**१०) टाकून बोलता गौळणी । रागावला ना श्रीकृष्ण ॥ दयाळा बाह्य वेषांनी । तुझ्या मजला ठकविले ॥**
अ) विष्णू ब) पांडुरंग क) चक्रपाणी ड) राधाकृष्ण

**मागच्या ज्ञानांजलीतील प्रश्नावलीची उत्तरे!**
१) सत्य २) असत्य ३) असत्य ४) सत्य ५) असत्य ६) असत्य ७) असत्य ८) सत्य ९) सत्य १०) सत्य

## निसर्गाशी जोडणारा एक अनुभव!

**वैशाली हिरे-अलोणे/९४०४३ ७५१४३**



गेल्यावर्षी मला डॉ. विकास आमटे यांच्या सोमनाथ श्रमसंस्कार छावणीत सहभागी होण्याची संधी मिळाली. सर्वात जास्त आठवणीत राहिलेला आणि मनात खोलवर ठसलेला दिवस म्हणजे बीज संवर्धन व रोपवाटिका या विषयावर आधारित कार्यशाळा!

त्या दिवशी आम्ही खऱ्या अर्थाने निसर्गाच्या सान्निध्यात गेलो. विविध धान्यांचे, कडधान्यांचे, भाजीपाल्यांचे बीज हातात घेताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली. एक छोटेसे बी म्हणजे संपूर्ण जीवनाची, पोषणाची आणि भविष्याची शक्यता असते. त्या बीजांचे जतन, त्याचे संवर्धन म्हणजेच भविष्यासाठी अन्नसुरक्षेची पायाभरणी! जसे पद्मश्री डॉ. मारुती चितमपल्ली म्हणतात, निसर्ग हेच विद्यापीठ आहे. झाडं, प्राणी, पक्षी, वाऱ्याचा आवाज हे सगळं शिकवणारं आहे फक्त, शिकायची इच्छा हवी. त्या दिवशी हे विद्यापीठ प्रत्यक्ष अनुभवता आलं.

कार्यशाळेत आम्हाला बीज रुजविण्याची मूलभूत तत्त्वे शिकवली गेली. पाणी, हवा आणि उष्णता हे तीन घटक बीज अंकुरण्यासाठी अत्यावश्यक असतात. काही बिया विशेषतः गोमूत्र किंवा सेंद्रिय द्रावणात भिजवून त्यांची अंकुरण क्षमता वाढवली जाते. नंतर, त्या बिया सेंद्रिय मातीच्या मिश्रणात रोपवाटिकेत लावल्या जातात, जिथे त्यांना सुरक्षित आणि अनुकूल वातावरण मिळतं. बीज संवर्धन ही केवळ शेतीची प्रक्रिया नाही तर, सामाजिक, नैतिक, पर्यावरणीय जबाबदारी आहे.

पारंपरिक वाणांचे रक्षण, स्वावलंबी शेतीसाठी पायाभरणी, जैविक व सेंद्रिय शेतीचा आधार, भविष्यासाठी टिकवलेली अन्नसंपत्ती हे सर्व पैलू या अनुभवातून समजले. संत तुकाराम म्हणतात त्याप्रमाणे,

वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे । पक्षी ही सुस्वरे आळविती ॥

हे शब्द त्या दिवशी प्रत्यक्ष अनुभवास आले. निसर्ग हा आपला सखा आहे, याची प्रचिती आली.

छावणीत आम्हाला देशी वाणांचे ६५ प्रकारचे भात बियाणे प्रत्यक्ष पाहायला मिळाले. तसेच बहावा, शिसम, रिठा, करंज यांसारख्या देशी झाडांची हजारो रोपे सेंद्रिय मातीच्या पिशव्यांमध्ये लावण्यात आली. रासायनिक खतांचा वापर न करता झाडे कशी वाढवायची? याचे ज्ञान मिळाले. वृक्षदिंडीचा अनुभव तर अत्यंत प्रेरणादायी होता. वृक्षसंवर्धन आणि पर्यावरण रक्षणाची खरी जाणीव याच वेळी मनावर कोरली गेली.

शिबिरातील तिसऱ्या दिवशी आम्ही सर्वजण रोपवाटिकेत काम करत होतो. कोणी मातीचे घमेली भरत होते, कोणी बिया लावत होते. मी माझ्या आवडीच्या विभागात बियांची निवड आणि माहिती मिळवण्यामध्ये रमून गेले. विविध बियांचे गुणधर्म समजून घेताना समोर ठेवलेला बियांचा खोका म्हणजेही एक छोटंसं विश्वच! मुरडशेंग, फणस, बाभूळ, करंज, भेंड, रिठा, वावडिंग, बेल, अर्जुन, गुंज आणि अनेक दुर्मिळ बियाणं पाहताना उत्सुकता शिगेला पोहोचली.

गुंजाच्या बीजाचे रूप, त्याचा गोडसर पाला चाखल्यावर लक्षात आले की, हीच तर ज्येष्ठमधाची वेल आहे. याच क्षणी झाडांच्या खोडांचाही अभ्यास सुरू झाला. पेरूचे चोपडे खोड, कडुनिंबाचे खरबरीत खोड! प्रत्येक झाडाचा स्पर्श वेगळा, ओळख वेगळी! या संपूर्ण अनुभवातून एक गोष्ट ठामपणे समजली की, बीज जपणं ही सेवा आहे. केवळ जमिनीशी नव्हे तर माणसांशी आणि आपल्या भविष्यासोबत असलेली एक शाश्वत बांधिलकी!

डॉ. प्रकाश आमटे यांची एक विचारप्रेरक ओळ आठवली, सेवा म्हणजे केवळ मदत नव्हे, ती मनाच्या खोलवरून येणारी बांधिलकी असते. बीज संवर्धन म्हणजे हीच बांधिलकी निसर्गाशी, जीवनाशी आणि पुढच्या पिढ्यांशी असलेली!

निसर्गाशी असलेली ही बांधिलकी, कोण कशी जपेल सांगता येत नाही. असेच एक उदाहरण! सेवानिवृत्त आरटीओ ए. बी. राठोड यांनी त्यांच्या मुलाच्या लग्नात सर्व वऱ्हाड्यांना व आलेल्या पाहुण्यांना एकेका पाकीटामध्ये दहा-दहा जांभळाच्या बिया दिल्या आणि आजूबाजूच्या जंगल परिसरात रुजतील अशा टाकाव्यात म्हणून विनंती केली होती. तिथून निघताना त्यांनी काही बिया सोबत दिल्या होत्या. त्याच बिया आज 'तरुण भारत'च्या 'बीज अंकुरे अंकुरे' या उपक्रमासाठी शुभेच्छांसह पाठविल्या आहेत.

# बंटीची बंडखोरी

**(भाग ५३)**

**प्रीती वडनेरकर /९८२३९९४७९२**

**'बंटी, अभिनंदन'**

'कॉन्ग्रॅज्युलेशन्स बंटी'

'बंटी, शाळेतून तू पहिला आलाहेस. दहावीच्या परीक्षेत तू बाजी मारलीस.'

'थँक यू... धन्यवाद!'

प्रथम देवाच्या पाया पडून, नंतर आईबाबांचे आशिर्वाद बंटीनं घेतले. त्याला नव्याण्णव टक्के गुण मिळाले होते. प्रथम बोर्डाकडून आणि नंतर शाळेकडून अभिनंदनपर फोन आल्यामुळे बंटी सुखावला होता. 'बंटी तू दहावीचा टप्पा यशस्वीपणे पार केला आहेस. यानंतर, बारावीचा दुसरा टप्पा आणि मग करियरसाठी ग्रॅज्युएशन, पोस्ट ग्रॅज्युएशन! असंच भरघोस यश मिळवत रहा,' बाबांनी आशिर्वाद देताना म्हटलं. 'आम्हाला तुझा अभिमान आहे बाळा! खूप छान यश मिळवलंस. विजयी भव...यशस्वी भव!' आईला बोलताना गहिवरून आलं. बंटी ग्रुपनंसुद्धा भरघोस यश मिळवलं होतं. प्रत्येकाला ८० ते ९० टक्के गुण मिळाले होते. 'तुम्हा सगळ्यांचं अभिनंदन बाळांनो,' आईनं सर्वांचंच अभिनंदन केलं.

बंटीच्या बाबांनी पाच किलो केशरी पेढे आणि आईस्क्रीम पॅक्स आणून ठेवलेच होते. घरी अभिनंदन करायला येणाऱ्यांची रीघ लागली होती, प्रत्येकाला पेढा आणि आईस्क्रीम मिळत होतं. शाळेत, सोसायटीत, कॉलनीत, फुटबॉल ग्राउंडवर, जिकडे तिकडे बंटीचा सत्कार होत होता. आईच्या, बाबांच्या कॉलेजमधेही सत्कारसत्र चालूच होते. कौतुक, प्रशंसा यांचा वर्षाव सुरू होता. बंटीच्या बरोबर त्याचा ग्रुपही जिथे तिथे जात होता. जसे छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांच्याबरोबर मावळे, तसंच बंटी आणि त्याच्याबरोबर त्याचा ग्रुप, हे समीकरण ठरलेलं होतं.

बंटी आणि त्याच्या ग्रुपला दहावी बोर्डाच्या परीक्षेत घवघवीत यश मिळालेलं पाहून, सायंतारा सोसायटीतल्या गौरव आणि त्याच्या ग्रुपला अतिशय मत्सर वाटत होता.

'काय पण तोरा दाखवतोय यार बंटी! जशी काय आकाशालाच गवसणी घातली आहे. काय पण तीर मारलाय!' गौरव म्हणाला. 'अरे पण शाळेतून पहिला आलाय. त्याला कुठल्याही ज्युनिअर कॉलेजमधे सहज ॲडमिशन मिळेल. आपल्यासारखं नाही. आपण दहावी, बारावीमध्ये जेमतेम काठावर पास झालोय. आपल्याला कुठेच ॲडमिशन मिळणार नाहीये,' अक्षय म्हणाला.'जाऊ दे नं यार...विसरून जाऊ या बंटीचं नाव! काहीतरी वेगळं करू या. काहीतरी थ्रिलिंग, सेन्सेशनल!' गौरव म्हणाला.

त्याच्या म्हणण्याला ग्रुपनं दुजोरा दिला. बराच वेळ त्यांचं गुफ्तगू चालू होतं. बंटीला कौतुकानं कोणी वेगवेगळी गिफ्टस् आणून देत होते. अकरावी ज्युनिअर कॉलेजसाठी फॉर्म्स भरणं चालू केलं सगळ्यांनी! एकाच महाविद्यालयात ॲडमिशन घ्यायची, असा ठराव पास केला बंटी ग्रुपनं!

स्वप्नील सायंतारामधे रहात असला तरी त्याचा ओढा बंटी ग्रुपकडेच होता. त्यालाही दहावीला पंच्याऐंशी टक्के गुण मिळाले होते ते, केवळ बंटीमुळेच! बंटीनेच त्याला खतरनाक गेममधून बाहेर काढलं होतं. त्याच्या आयुष्याला अर्थ दिला होता, दिशा दिली होती.

'स्वप्नील, बंटीशी आणि त्याच्या ग्रुपशी मैत्री कर. त्यांच्या सहवासात राहिलास तर तुझं भलंच होईल,' स्वप्नीलची आई म्हणाली. संध्याकाळी फुटबॉल खेळून आल्यावर बंटी आणि त्याचा ग्रुप, पार्किंग लॉटमध्ये जमला होता. इकडतिकडच्या गप्पा चालू होत्या. इतक्यात स्वप्नील तिथे आला.

'बंटीSS बंटीSS एक सनसनाटी बातमी आहे,' तो म्हणाला. 'अरे स्वप्नील ये ना...ये बैस त्या स्टुलावर...ॲडमिशनचा फॉर्म भरलास का?' बंटीनं विचारलं. 'हो भरला... तुमच्याच कॉलेजमध्ये! पण बातमी वेगळीच आहे,' स्वप्नीलनं सांगितलं.'काय रे स्वप्नील, असं कोड्यात नको बोलूस. सांग नं पटकन कोणती बातमी ते!' स्वानंद म्हणाला.

'पानसुपारी...' स्वप्नील म्हणाला.

'पानसुपारी? म्हणजे काय? ही काय बातमी झाली?' यश अधीर झाला होता.'अरे कोडवर्ड आहे, रेव्ह पार्टीचा! इथून पन्नास किलोमीटरवर एक फार्महाऊस आहे. तिथे शुक्रवारी रात्री रेव्ह पार्टी आहे. मोजक्या लोकांनाच बोलावलं आहे. सायंतारामधला गौरव आणि त्याचा ग्रुप जाणार आहे,' स्वप्नीलनं पटापटा सांगितलं. 'रेव्ह पार्टी' म्हटल्यावर सर्वांनी कान टवकारले.

'काय? रेव्हपार्टी? फारच भयानक प्रकार असतो रे. पाण्यासारखा पैसा खर्च करतात. नशेसाठी काय वाट्टेल ते घेतात. ड्रग्जची नावं वाचली होती, बातम्यांमध्ये! दोन-तीन दिवस नशा टिकते म्हणतात. खाणे, दारू पिणे, ड्रग्ज घेणे, बेधुंद होऊन नाचणे...अजून माहीत नाही काय काय ते... पण आपल्या कल्पनेपलिकडचं असतं ते! सारं बेकायदेशीर, घातक असतं. काही ठिकाणी तर, सापाचं विषसुद्धा घेतात म्हणे नशेसाठी,' बंटी सांगत होता.'बापरे, फारच वाईट आहे सारं! गौरव आणि त्याचा ग्रुप इतका वाया गेलाय! खालच्या पातळीवर गेलाय? व्हेरी बॅड,' यश म्हणाला.

'मुख्य म्हणजे या ग्रुपच्या मुलांच्या पालकांना याबाबत काहीच माहीत नाहीये. त्यांना वाटतंय आपली मुलं खूपच साळसूद आहेत, संस्कारी आहेत. त्यांचं पाऊल कधीही वाकडं पडणार नाही,' स्वप्नील म्हणाला.'ते सगळं खरं असलं तरी गौरव आणि त्याचा ग्रुप असा भलत्याच मार्गाला लागणं चांगलं नाही. माणुसकीच्या दृष्टीनं आपण त्यांना मदत करायला हवी. पण, काय करणार? समजावण्याच्या खूप पलिकडे गेलेत सगळे,' बंटी हताश झाला होता.

'सोड नं यार! तू कशाला एवढं मनावर घेतोस? आपण आपल्यापुरतं बघावं. त्यांना काय करायचं ते करू दे. चला घरी उशीर झाला तर आई ओरडेल. चला बाSSय गुडनाईट!' यशनं सर्वांना भानावर आणलं. लगेच सगळ्यांची पांगापांग झाली. बंटीच्या मनात मात्र रेव्ह पार्टीचाच विषय घोळत होता. रात्री जेवताना बंटीनं विषय काढला. जेवणं झाल्यावर, बंटीच्या बाबांनी कर्नल सरंजामे सरांना फोन लावला. त्यांनी ताबडतोब पोलीस कमिशनर साहेबांना फोन लावला. सरंजामे, बंटीचे बाबा आणि बंटी, कमिशनर साहेबांच्या घरी गेले.

'आमच्यापर्यंत, आमच्या खबऱ्यानं ही बातमी पोचवली होतीच. पण 'पानसुपारी' हा कोडवर्ड आम्हाला कळला नव्हता. आमचं पथकही तयार आहेच त्यांना पकडायला! उद्या शुक्रवार आहे. उद्याच तिथे धाड घालू म्हणजे पुराव्यानिशी त्यांना पकडता येईल. पोलीस कस्टडीत घेता येईल,' कमिशनर साहेबांनी सांगितलं.

'तुमची यंत्रणा कसं काम करते, ते बघायची आम्हाला खूप उत्सुकता आहे. आम्हाला बघता येईल का?' बंटीनं उत्सुकतेनं विचारलं.'तुम्हाला कोणालाच आमच्या शोध पथकाबरोबर येता येणार नाही. मात्र, इथे ठाण्यात बसून मॉनिटरवर पाहता येईल,'

कमिशनर साहेब म्हणाले,'मात्र अतिशय गुप्तता पाळायला हवी. कोणाला कळता कामा नये.'

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी सातलाच, बंटी, बाबा आणि सरंजामे अंकल पोलीस ठाण्यात हजर झाले. फार्म हाऊसच्या बाहेर सी.सी.टीव्ही लावले होते. पोलीस इन्स्पेक्टर आणि त्यांचं पथक, फार्म हाऊसच्या बाहेर गस्त घालत होते. पण, तिथे संशयास्पद काहीच सापडलं नाही. आतमध्ये तर पूर्ण अंधार होता. रात्रीचे दहा वाजले तरी सारं शांतच होतं.

'चला, बातमी खोटी होती. परत फिरा...' इन्स्पेक्टर म्हणाले. फार्म हाऊसच्या गेटला भलं मोठं कुलूप होतं. सारे परत फिरले. 'सर... सर, हे कुलुप फोडून आत जाऊ या. काही सापडलं नाही, तर परत फिरू या,' असिस्टंट म्हणाला.



**बंटीच्या बाबांनी पाच किलो केशरी पेढे आणि आईस्क्रीम पॅक्स आणून ठेवलेच होते. घरी अभिनंदन करायला येणाऱ्यांची रीघ लागली होती, प्रत्येकाला पेढा आणि आईस्क्रीम मिळत होतं. शाळेत, सोसायटीत, कॉलनीत, फुटबॉल ग्राउंडवर, जिकडे तिकडे बंटीचा सत्कार होत होता. आईच्या, बाबांच्या कॉलेजमधेही सत्कारसत्र चालूच होते. कौतुक, प्रशंसा यांचा वर्षाव सुरू होता. बंटीच्या बरोबर त्याचा ग्रुपही जिथे तिथे जात होता. जसे छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांच्याबरोबर मावळे, तसंच बंटी आणि त्याच्याबरोबर त्याचा ग्रुप, हे समीकरण ठरलेलं होतं.**

ताबडतोब, गेटला लावलेलं भलं मोठं कुलुप फोडण्यात आलं. फार्म हाऊसच्या मागे थोडे फार लाईट चमकताना दिसले. पोलीस पथक, हातात रिव्हॉलव्हर्स घेऊन दबक्या पावलांनी चालू लागले. बरंच अंतर गेल्यावर, झाडाझुडुपांमध्ये जंगलात, दिव्यांच्या झगमगाटात रेव्ह पार्टी चालू असलेली दिसली. चरस, गांजा, हुक्का, कोकेन, एमडी अशा ड्रग्जचा सर्रास व्यापार चालू होता. सधन, उच्चशिक्षित, मोठ्या हुद्यावरचे तरूण-तरूणी, नशेत झिंगताना दिसले. पोलिसांना पाहताच त्यांना धक्का बसला. ते सैरावैरा पळू लागले. गौरव आणि ग्रुप झाडावर चढून बसला.

पोलीसांच्या पथकाने कोणालाही सोडले नाही. प्रत्येकाला अटक करून, ठाण्यामध्ये आणलं, तुरूंगात डांबलं. पोलीस अधिकाऱ्यांनी आपापले फोन्स बंद करून ठेवले. नाही तर त्यांना सोडण्याचा दबाव टाकण्यात आला असता. 'काका, आता तरी ते सुधारतील असं वाटतंय. त्यातून ते सुटतील सुद्धा पण, त्यांना चांगला धडा मिळाला हे बरं झालं. त्याबद्दल आता आपण सगळे पानसुपारी वाटून त्यांची अटक साजरी करू या,' बंटीच्या या वाक्यावर सारे हसले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# १७ घरकुल लाभार्थींना प्रातिनिधीक स्वरूपात ५ ब्रास वाळूचा परवाना

## भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचेहस्ते पावत्यांचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० मे**

घरकुल लाभार्थ्यांना बांधकामासाठी वाळू मिळत नसल्यामुळे अनेक घरकुलांचे बांधकाम रखडले होते. तसेच वाळू माफीयांकडून रेती घेणे त्यांना अशक्य असल्याने केंद्र व राज्य शासनाने घरकुल लाभार्थ्यांना ५ ब्रास वाळू मोफत देण्याचा निर्णय घेतला. हिंगोली तालुक्यातील सावरखेडा येथील १७ लाभार्थ्यांना शुक्रवारी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचेहस्ते ५ ब्रास वाळूचे परवाना पावत्या देण्यात आल्या.

केंद्र व राज्य शासनाच्या निर्णयानुसार घरकुल लाभार्थ्यांना ५ ब्रास वाळू मोफत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे लाभार्थ्यांना बांधकाम करता येणार असून या निर्णयामुळे घरकुलांचे कामही वेगात होणार आहे. येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयात शुक्रवार दि ३० मे रोजी भारतीय जनता पक्षाचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्याहस्ते प्रातिनिधीक स्वरूपात १७ लाभार्थ्यांना ५ ब्रास वाळू परवाना पावत्या देण्यात आल्या. यावेळी उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, तहसीलदार श्रीकांत भूजबळ यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना आ. मुटकुळे म्हणाले की, सध्या सर्वत्र वाळू माफीया अवैधपणे वाळू उपसा करीत असून अव्वाच्या सव्वा भावाने वाळू विक्री करीत आहे. सदरील महागडी वाळू घरकुल लाभार्थ्यांना घेणे परवडत नाही. त्यामुळे शासनाने घरकुल लाभार्थ्यांना बांधकामासाठी ५ ब्रास वाळू मोफत देण्याचा निर्णय घेतला असून त्याची अंमलबजावणी उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांच्यामार्फत करण्यात आली आहे. याचा निश्चितच गोरगरीबांना होणार असून जिल्ह्यात घरकुलांच्या कामाला गती मिळेल अशी अपेक्षा यावेळी आ. मुटकुळे यांनी व्यक्त केली.

दि ८ एप्रील २०२५ च्या शासन निर्णयानुसार उपविभागीय अधिकारी कार्यालयात वाळू घाट, वाळू स्थळ निश्चितीची बैठक घेण्यात आली होती. त्यामध्ये हिंगोली तालुक्यातील १७ वाळू घाटामधून स्थानिक वापरासाठी४१३९ ब्रास वाळू साठा उपलब्ध करून देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी दि २२ मे २०२५ रोजी मंजूर घरकुल लाभार्थी ज्यांना बांधकामासाठी सध्या वाळूची गरज आहे असे एकूण तालुक्यातील८२८ लाभार्थी यांची यादी तहसील कार्यालयास उपलब्ध करून देण्यात आली आहे. दि २३ मे ते ३० मे या कालावधीसाठी तालुक्यातील वाळू गटामधील १०० ब्रास वाळू २० घरकुल लाभार्थ्यांना अटी व शर्तीला अधीन राहून त्यांना परवाना पावती देण्यात आली आहे. संबंधित लाभार्थ्यांनी दिलेले ऑनलाईन पासेस डाऊनलोड करून संबंधीत ग्राम महसूल अधिकारी व ग्रामसेवक यांच्यामार्फत १५ दिवसांच्या आत घरकुल लाभार्थ्यांना घरपोच उपलब्ध करून द्यावेत व त्याची पोच घेऊन योग्य ती नोंद ठेवण्याचे आदेश तहसीलदार श्रीकांत भूजबळ यांनी दिले आहेत.

# २७१ कोटींच्या कामांचे मुख्यमंत्र्यांच्याहस्ते भूमीपूजन, उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० मे**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते गुरूवारी २७१ कोटी रूपयांच्या विविध विकास कामांचे भूमीपूजन आणि उद्घाटन करण्यात आले. येथील रामलीला मैदानावर आयोजित या कार्यक्रमास राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, संघटनमंत्री संजय कौडगे, डॉ अजित गोपछडे, आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी आ. रामराव वडकुते, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते रिमोटद्वारे कामांचे भूमीपूजन व उद्घाटन करण्यात आले. त्यामध्ये नगर परिषद हद्दीतील रस्ते प्रकल्प ११४ कोटी रूपये, पंचायत समिति हिंगोली नवीन इमारतीचे लोकार्पण, खर्च ११ कोटी, नामदेव महाराज मंदिर नर्सीकडे जाणाऱ्या सायन रस्त्याचे उद्धाटन १० कोटी रुपये, भूमि पूजन कामे नळ योजना ८४ कोटी रुपये, हिंगोली विधानसभा मतदारसंघात सुमारे ५२ कोटींचे रस्ते त्यामध्ये देऊळगावरामा वरूड गवळी, बेलवाडी रस्ता- (६ किमी), देवठाणा ते कापूरखेडा (४.०० किमी), उमरा ते तालुक्यापर्यंत सीमा रस्ता- (३.१० किमी), कडाटी हनवतखेडा, देऊळगाव, जे. रोड- (५.९०किमी), माहेरखेडा ते गुगुळपिंपरी ते जिल्हा सीमा रस्ता- (५.२५ किमी), तकतोडा ते धनगरवाडी रस्ता- (५.१२ किमी), जामठी ते गोंदणखेडा- (३.०० किमी), महालासपूर फुटला ते कावडदरी रस्ता- (३.१५ किमी), अडोल ते हनकदरी रस्ता (४.१० किमी) या रस्त्यांचा समावेश आहे. भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या पाठपुराव्यामुळे ग्रामीण आणि दुर्गम भागातील रस्त्यांचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

# अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दीनिमित्त प्रदर्शनीचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० मे**



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त भव्य चित्र व नाणे प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनीचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते करण्यात आले.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस हे गुरूवारी हिंगोली दौऱ्यावर आले असता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्यातील शताब्दी जयंती निमित्त चित्र व नाणे प्रदर्शनाचे उद्धाटन संपन्न झाले. तत्पूर्वी फडणवीस यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पूतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी होळकर शाळेतील विविध ऐतिहासिक चित्र संदर्भासहित दाखवण्यात आले. देवेंद्र फडणवीस यांचा ऐतिहासिक अभ्यास देखील चांगला असून प्रत्येक गोष्टीची माहिती जाणून घेतली. यावेळी त्यांच्यासोबत राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर आमदार तानाजीराव मुटकुळे, माजी आमदार गजाननराव घुगे, माजी आमदार रामराव वडकुते उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजक दिनकरराव कोकरे यांनी केले होते. कार्यक्रमाला इतिहास अभ्यासक म्हणून पंढरीनाथ ढाले हे देखील उपस्थित होते. कार्यक्रमासाठी तुकाराम नाईक, भारत ढाले, शिवम नाईक यांनी परिश्रम घेतले.



**हिंगोली- येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात शुक्रवारी मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी हळद विक्रीसाठी आणली होती. परंतु शेडमध्ये व्यापाऱ्यांच्या थप्प्या असल्याने शेतकऱ्यांना माल ठेवण्यासाठी जागा मिळत नाही. सध्या हळदीला चांगला भाव मिळत असल्याने शेतकरी हळद विक्रीसाठी आणत असतांना दिसत आहे. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीचे अर्ज निकाली काढा

हिंगोली- भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना शासनाच्या महाडिबीटी प्रणालीद्वारे राबविण्यात येत आहे. सन २०२३-२४ व २०२४-२५ या शैक्षणिक सत्रातील भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनांचे ऑनलाईन अर्ज मंजुरीसाठी दि. ३१ मे, २०२५ पर्यंत शासनाकडून मुदत देण्यात आली आहे.विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या आवेदनावर महाविद्यालयांनी पुढील कार्यवाही करुन ते समाज कल्याण विभागाकडे पाठविणे अपेक्षित आहे. परंतु बहुतांश महाविद्यालयांनी बऱ्याचशा विद्यार्थ्यांच्या अर्जावर कार्यवाही केली नसल्याची बाब समोर आली आहे. भारत सरकार शिष्यवृत्तीचे अनुसूचित जाती प्रवर्गाचे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील १०० अर्ज व २०२४-२५ मधील ८०० अर्ज अद्यापही महाविद्यालय स्तरावर प्रलंबित आहेत. सातत्याने पत्रव्यवहार, व्हॉट्सअप ग्रुपवरील संदेशाद्वारे सूचना देऊनही अर्ज मंजुरीबाबत कार्यवाही करण्यात नसल्याची गंभीर बाब पुढे आली आहे. महाविद्यालय स्तरावर व विद्यार्थी स्तरावर प्रलंबित असलेले शिष्यवृत्ती सर्व पात्र अर्ज महाविद्यालयांनी दि. ३१ मे, २०२५ पर्यंत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, हिंगोली या कार्यालयास पाठवावेत. विहित मुदतीत पात्र अर्ज सादर न केल्यास संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना जबाबदार धरुन नियमानुसार कारवाई करण्यात येईल याची सर्व महाविद्यालयांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे.

### शेतकऱ्यांनी महाडिबीटी पोर्टलवर अर्ज करावेत

हिंगोली- खरीप हंगामासाठी राष्ट्रीय अन्न सुरक्षा अणि पोषण अभियान कडधान्य व पौष्टिक तृणधान्य तसेच राष्ट्रीय खाद्यतेल-तेलबिया अभियान राबविण्यासाठी केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार सन२०२५-२६ मध्ये कार्यक्रमाची अंमलबजाणी करावयाची आहे. त्यानुषंगाने कृषी विभागाकडून चालू खरीप हंगामासाठी प्रमाणित बियाणे वितरण करण्यात येणार आहे. त्यासाठी हिंगोली जिल्ह्यातील सर्व इच्छुक शेतकऱ्यांनी महाराष्ट्र शासनाच्या महाडिबीटी पोर्टलवर अर्ज करावेत. या बियाणे वितरण कार्यक्रमासाठी राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान अंतर्गत तूर, मूग, उडीद या पिकांसाठी ५० टक्के व राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया अंतर्गत सोयाबीन पिकांसाठी १०० टक्के अनुदान देय आहे. तसेच प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर पोर्टलवर निवड करुन आपणास संदेश येईल.

### अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त मॅरेथॉन स्पर्धा

हिंगोली- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त दि ३१ मे रोजी भारतीय जनता पक्षाच्यावतीने भव्य महिला मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील गांधी चौक येथून सकाळी ७.३० वाजता या मॅरेथॉन स्पर्धेला सुरूवात होणार असून यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी आ. रामराव वडकुते यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. स्पर्धेमध्ये विजयी होणाऱ्या प्रथम विजेत्यास ५ हजार, द्वितीय ४ हजार, तृतीय ३ हजार, चौथा २ हजार तर पाचवे पारितोषिक १ हजार ठेवण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन भाजपकडून करण्यात आले आहे.

# पर्यावरण, वन आणि हवामान बदल संवर्धन परिषदेचे उमरा येथे संमेलन संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० मे**

पर्यावरण, वन आणि हवामान बदल संवर्धन परिषद इकाई (भारत सरकार) व उगम ग्रामीण विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा पातळीवरील स्वयंसेवी संस्थेचे राज्यातील पहिले एकदिवसीय संमेलन उगम येथे संपन्न झाले. या संमेलनासाठी हिंगोली जिल्ह्याबरोबर परभणी, गोंदिया, बुलढाणा, नंदुरबार आणि चंद्रपूर येथील संस्थांचा सहभाग होता. संमेलनाच्या अध्यक्षतेस्थानी राज्य संचालक प्रदीपकुमार क्षत्रिय होते तर अभय देशपांडे, मकरंद पाठक, प्रा. सारंग साळवी आणि हिरालाल पाटील यांची प्रमुख उपस्थिती होते.

स्वयंसेवी संस्थानी पर्यावरण संवर्धन करण्यासाठी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन उगम येथे करण्यात आले होते. यामध्ये प्रत्येक वर्षी तापमान वाढत आहे. जेव्हा पाऊस पडायला पाहिजे तेव्हा पडत नाही आणि जेव्हा नको वाटतो तेव्हा आवर्जून पाऊस पडतो. हा हवामानात होणारा बद्दल पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्यामुळे होत आहे. यावर मात करण्यासाठी सदरील परिषदेचे निर्मिती केंद्र शासनामार्फत करण्यात आलेली असल्याचे अभय देशपांडे यांनी सांगितले.

संमेलनात जिल्ह्यातील संस्थांची नोंदणी करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे आणि त्यांच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचे कार्य केले जाणार आहे. परिषदेच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनासाठी विविध उपक्रम स्थानिक संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात येणार असल्याचे मकरंद पाठक यांनी प्रस्तावना करताना सांगितले.

जयाजी पाईकराव यांनी सांगितले पर्यावरण संवर्धन करण्यासाठी गवताळ प्रदेशाचे संवर्धन होणे गरजेचे आहे. तसेच विविध संस्थाप्रमाणे विविध ग्रामस्तरावरील सक्रिय मंडळ, महिला गट यांची मदत घेणे गरजेचे असल्याचे सांगितले.

चंद्रपूर येथील विठ्ठलराव बदखल यांनी वन्य प्राण्याच्या उपद्रवामुळे वृक्षतोड केलेली आहे. परंतु वृक्षतोड करणे पर्याय नसून वन्यप्राण्यांना वेगळे वन निर्माण करून देणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

गोंदिया येथील ईश्वर बडोले तर संभाजी नगर येथील आनंदराव सोलकर यांनी ग्रीन एनर्जी यावर विषयावर मांडणी केली. ग्रीन एनर्जी ही प्रदूषण नियंत्रण करण्यासाठी मदतगार ठरत आहे. याचा प्रसार होणे गरजेचं असल्याचे त्यांनी सांगीतले.

संमेलनानंतर उगम संस्थेच्या परिसरामध्ये वृक्ष लागवड करण्यात आणि यासाठी खयुम पठाण, सामाजिक वनीकरण यांनी वृक्ष पुरवली. संमेलन यशस्वीतेसाठी दिशांत पाईकराव, विकास कांबळे, भीमराव भिसे, रामराव खंदारे, भीमराव पाईकराव, सिद्धार्थ निनुले, बालाजी मोरे नी परिश्रम घेतले.

## तीन दिवसापासून पावसाने मारली दडी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० मे**

जिल्ह्यात मागील तीन दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने पुन्हा एकदा उन्हाचा पारा वाढला आहे. आठवड्याच्या सुरूवातील हिंगोली, वसमत, कळमनुरी, सेनगाव तसेच औंढा नागनाथ परिसरात अवकाळी पाऊस पडला. या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. वसमत तालुक्यात केळी, हळद तर इतर तालुक्यात भूईमुगाचे नुकसान झाले. राज्यात मान्सुन यावर्षी लवकर दाखल झाला असून मान्सुनचा पाऊस मात्र हिंगोली जिल्ह्यात अद्याप पडला नाही. मागील तीन दिवसांपासून दिवसभर आभाळ आणि कडक उन्ह पडत आहे. पाऊस नसल्याने वातावरणात उकाडा जाणवत आहे.

# महावितरण कंपनीच्या आपत्कालीन व्यवस्था कक्षाचे उद्घाटन



**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, ३० मे**

पावसाळ्यामध्ये वादळी वाऱ्यामध्ये वीज, तार तुटणे, वीजेचे खाबं उन्मळून पडणे, रोहीत्र कोसळणे अशा घडण्याची शक्यता वाढते अशा परिस्थितीत वीज ग्राहकांनी वीज यंत्रणेपासून सुरक्षित राहण्यासाठी काय करावे याची माहीती देण्यासाठी महावितरण कंपनीच्या आपत्कालीन व्यवस्था कक्षाचे उद्घाटन करण्यात आले आहे.

येथील महावितरण कंपनीच्या कार्यालयात आपत्कालीन व्यवस्था कक्षाचे उद्घाटन अधीक्षक अभियंता आर एम चव्हाण यांचेहस्ते करण्यात आले. यावेळी कार्यकारी अभियंता ए ए मोरे, व्यवस्थापक डी टी लांडगे, उपकार्यकारी अभियंता रणजीत देशमुख, सहा. अभियंता एस डी बेलसरे, अमोल कामडी, जनमित्र जी के फड, अमोल नेरूला, बी जी चिभडे, डि के मगर विठ्ठल ढोकरे आदींची उपस्थिती होती.

यावेळी तुटलेल्या तारा किंवा वीजेच्या खांबास स्पर्श करणे टाळावे, वीज यंत्रापासून सुरक्षित अंतर ठेवावे, धोकादायक वीज यंत्राची माहीती तत्काळ महावितरणच्या नियंत्रण कक्षाला द्यावी असे आवाहन करण्यात आले.

# संतोष राऊत यांची इंडियन एक्सलन्स अवॉर्ड पुरस्कारासाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ३० मे**



रामपुरी येथील सुपुत्र व लाल बहादूर शास्त्री विद्यालय, वसमत येथे कार्यरत शिक्षक संतोष रामकिशन राऊत यांना दैनिक अहिल्याराज द्वारे आयोजित 'इंडियन एक्सलन्स अवॉर्ड २०२५' साठी निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्र व मध्य प्रदेशातील दोन्ही राज्यांमध्ये प्रसिध्द असलेल्या या द्विभाषिक वृत्तपत्राच्या वतीने, त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व पत्रकारितेतील उल्लेखनीय कार्यासाठी हा पुरस्कार १ जून २०२५ रोजी मलकापूर येथील भातृ मंडळ हॉलमध्ये सन्मानपूर्वक प्रदान केला जाणार आहे.

संतोष राऊत हे केवळ शिक्षक नाहीत, तर एक सामाजिक विचारवंत, संवेदनशील पत्रकार आणि साहित्यिकही आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची गुणवत्ता आणि मूल्यांचे महत्त्व शिकवण्यासोबतच त्यांनी लेखनातून समाजातील वेदना, समस्या व आशा मांडण्याचे कार्य केले आहे. त्यांची पत्रकारितेमुळे सामाजिक प्रबोधनाला नवे वळण मिळाले असून, त्यांच्या लेखणीला ग्रामीण भागाचा स्वाभिमान आणि न्याय यांचा आवाज सापडतो.'इंडियन एक्सलन्स अवॉर्ड' हा सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्याचा एक अत्यंत प्रतिष्ठित पुरस्कार आहे. या पुरस्काराद्वारे विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववान लोकांचा गौरव करण्यात येतो-ज्यात शिक्षण, साहित्य, पत्रकारिता, कला, आरोग्य, महिला सक्षमीकरण, सहकार, विधी सेवा, खेळ इत्यादींचा समावेश आहे.

संतोष राऊत यांच्या निवडीबद्दल त्यांचे सर्व मित्र परिवार तसेच सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.